**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/५७०/०२**

**श्रीमती स्नेहल सु. कदम,** **------ अपीलकर्ता**
**भारती निवास, १/५ ब, लक्ष्मण नगर,**
**कुरार व्हिलेज,मालाड (पूर्व), मुंबई-४०० ०९७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त,**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**रायगड भवन, पहिला मजला, नवी मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त,**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**रायगड भवन,पहिला मजला, नवी मुंबई.** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्रीमती स्नेहल सु.कदम यानी जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त (बालवाडी), एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई यांच्याकडे अर्ज करुन शहरी प्रकल्पातील अंगणवाडी सेविकामधून मुख्य सेविका पदावरील नेमणुकीसाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेच्या उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रतींची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना रायगड भवन, नवी मुंबई यांच्याकडे ३० दिवसांचा कालावधी उलटल्यानंतर प्रथम अपिल दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-याने सुनावणी घेतली नाही, आदेश पारित केले नाहीत. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती दिली नसल्यामुळे व्यथित होवून अपिलकाराने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक ०१ऑगस्ट,२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता युपीसीने नोटीस पाठवूनही जन माहिती अधिकारी /प्रथम अपिलीय अधिकारी तसेचअपिलकार श्रीमती स्नेहल सु.कदम,अंगणवाडी सेविका हे हजर नव्हते.

अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील गोष्टी स्पष्ट झाल्या.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतर्फे दिनांक ८.१०.२००६ रोजी अंगणवाडी सेविकेतून मुख्य सेविकेच्या पदावर भरती करण्यासाठी लेखी परिक्षा घेण्यांत आली. लेख्री परिक्षेकरिता राज्यभरातून एकूण १३०० अंगणवाडी सेविकांनी लेखी परिक्षा दिली. ज्या उमेदवारांची मुख्य सेविकेच्या पदावरील भर्तीकरिता निवड झाली नाही अशा अंगणवाडी सेविकांना लेखी

परिक्षेत गुण देताना परिक्षकांनी वस्तुनिष्ठ गुण दिलेले नाहीत व उमेदवारांचे गुण वाढविण्याबाबत भ्रष्टाचार झाला असण्याची शंका व्यक्त करण्यांत आली.

परिक्षेस बसलेल्या सर्व उमेदवारांच्या उत्तर पत्रिकांचे अवलोकन करण्याची संघटनेच्या प्रतिनिधींना परवानगी देण्याची महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटनेने दिनांक ११.१२.२००६ च्या पत्रान्वये शासनाकडे मागणी केली. त्यानुसार आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना यांनी दि.१८.१२.२००६ ते दि.२२.१२.२००६ या कालावधीत अंगणवाडी सेविकांना त्यांच्या स्वतःच्या उत्तरपत्रिका पहाण्यासाठी उपलब्ध करुन दिल्या जातील, असे संघटनेच्या सरचिटणीसांना दि. १६.१२.२००६ च्या पत्रान्वये कळविले. त्याअनुषंगाने ब-याच उमेदवारांनी स्वतःच्या उत्तरपत्रिका वर नमूद केलेल्या कालावधीत पाहिल्या आहेत. त्यामुळे जन माहिती अधिका-यांनी उमेदवारांना लेखी कळविले नाही.

मुख्य सेविकेच्या पदावरील नेमणुकीसाठी घेण्यात आलेल्या परिक्षेकरिता बसलेल्या उमेदवारांनी उत्तर पत्रिकेच्या छायांकित प्रतीच्या मागणीसाठी वैयक्तिक अर्ज करुन संघटनेच्या माध्यमातूनही उत्तरपत्रिका पहाण्यासाठी मिळण्याबाबत आग्रह धरल्यामुळे संघटनेला पत्र देऊन उमेदवारांना उत्तरपत्रिका दाखविल्या तर सर्वच उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिका पहाण्याची संधी मिळेल. यादृष्टीने आस्थापना शाखेने उमेदवारांना उत्तरपत्रिका बघण्याची कार्यवाही केली.

वरील विवेचन लक्षात घेता मुख्य सेविका पदावरील नेमणुकीसाठी एकात्मिक बालविकास सेवा योजनेतर्फे घेण्यात आलेल्या अंगणवाडी सेविकेच्या परिक्षेच्या उत्तर पत्रिकांची पहाणी करण्याची सर्व संबंधित अंगणवाडी सेविकांना संधी देण्यात आली. दरम्यानच्या कालावधीत महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटनेने मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.८२९३/२००६ दाखल केली. अंगणवाडी कर्मचारी संघटनेने, मुख्य सेविका पदावरील नेमणूकीसाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेबाबत केलेल्या तक्रारी निराधार असून,सदर लेखी परिक्षेच्या कार्यपध्दतीत पारदर्शकेतेचा अभाव आढळून येत नाही. वरील परिस्थितीत असे दिसून येते की, अर्जदाराच्या मागणीबाबत योग्य प्रकारे विचार करण्यात आला असून,अपिलकाराने उपस्थित केलेल्या मुद्दयाचे निराकरण झाले असल्यामुळे मी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई /दिनांक :-०१/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/५८३/०२**

**श्री. आर.आर.त्रिपाठी,** **------ अपीलकर्ता**
**चीफ रिपोर्टर, वेगान डेली,**
**२२० किका स्ट्रीट,**
**काळबादेवी, मुंबई.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,**
**एम.एस.ई.बी.क्षेत्रिय कार्यालय,**
**भिवंडी, ठाणे, महाराष्ट्र.**

**जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,**
**सर्कल कार्यालय, सिटीझन हॉस्पिटलसमोर,**
**धामणनाका, भिवंडी, ठाणे, महाराष्ट्र-४२१ ३०२.** **-----उत्तरवादी**

## - <u>वि वे च न -</u>

अपिलकार श्री. आर.आर.त्रिपाठी यानी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सर्कल कार्यालय, भिवंडी,ठाणे यांच्याकडे दि.३०.१०.२००६ रोजी अर्ज करुन भिवंडी विद्युत सर्कल अंतर्गत विद्युत विभाग-२ ची यादी मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, एम.एस.ई.बी. क्षेत्रिय कार्यालय, भिवंडी, ठाणे यांच्याकडे दि. २१.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय

अधिका-यांनी आदेश पारित केले नसल्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.५.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणी करिता जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सर्कल कार्यालय, भिवंडी,ठाणे हे हजर होते. सुनावणीची नोटीस युपीसीने दि.११.७.२००८ रोजी पाठवूनही अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी केलेले लेखी निवेदन व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.आर.आर.त्रिपाठी यांनी माहितीच्या अधिकारात दि.३०.१०.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा सर्कल कार्यालय, भिवंडी, ठाणे यांच्याकडे अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

" भिवंडी सर्कलमधील उपविभाग क्र.१ ते ७ अंतर्गतच्या व्यापारी व औद्योगिक मीटरधारकाची नावे, ज्यांचे विद्युत बील रु.५०,०००/-हून अधिक आहे व त्यांनी दोन वर्षापासून बिल अदा केले नाही अशा सर्व थकबाकीदारांचे विद्युत मीटर लावल्याची तारीख, संबंधित मीटर धारकाचे नांव, ज्या ठिकाणी विद्युत मीटर बसविण्यात आले त्यासंबंधीची पुराव्याची कागदपत्र इ.बाबीची माहिती विहित नमुन्यात उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी केली होती. "

त्यानुसार जन माहिती अधिका-यांनी दि.१२.१२.२००६ नुसार अपिलकारास सी.डी.मध्ये माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, एमएसईबी क्षेत्रिय कार्यालय, भिवंडी, ठाणे यांच्याकडे दि.२१.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवचेन लक्षात घेता असे दिसून येते की, भिवंडी मंडळ कार्यालय हे फ्रेन्चायसी तत्वावर चालविण्या साठी मे.टोरँट पॉवर लि.कं.यांना दि.२६.१.२००७ पासून हस्तांतरित करण्यात आले आहे. त्यानंतर तेथील सर्व वीज वितरणाचे काम ते पहात आहे असे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास दि.२२.७.२००८ च्या पत्रान्वये कळविले. तसेच मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे सोईचे होईल याकरिता कार्यालयास भेट देण्याबाबत अपिलकारास कळविले. परंतु, अपिलकार आवश्यक माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता भिवंडी सर्कल कार्यालयात हजर झाले नाहीत. अपिलातील कागदपत्रांच्या तपासणीवरुन असे दिसून येते की, अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकार श्री. आर.आर.त्रिपाठी यांनी मागितलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, भिवंडी सर्कल कार्यालय यांनी अपिलकारास उपलब्ध करुन देण्यांत यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई /दिनांक :-०५/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/५८४/०२**

**श्री. आर.आर.त्रिपाठी (पत्रकार),** **------ अपीलकर्ता**
**द्वारा-३१५, बिर्या हाऊस,**
**२६५, सरीन नरीन स्ट्रीट,**
**रिझर्व्ह बँकेजवळ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग,**
**सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**अवर सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग,**
**सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.** **-----उत्तरवादी**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. आर.आर.त्रिपाठी यानी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२२.१.२००७ रोजी अर्ज करुन अर्ध शासकीय पत्र क्र. Sec/ IT/ MC/ २००६/ ३९/GAD/Mantralaya, दिनांक २६.१२.२००६ निर्गमित करण्यासंबंधीची अनुषंगिक माहिती मागितली होती. विहित कालावधीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव, माहिती तंत्रज्ञान,यांचे कडे दि. २०.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.५.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणी करिता जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, श्री.सं.पां.भोकरे, हे हजर होते. सुनावणीची नोटीस दि.११.७.२००८ रोजी युपीसीने पाठवूनही अपिलकार सुनावणीस हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांनी केलेले प्रतिपादन व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.आर.आर.त्रिपाठी यांनी माहितीच्या अधिकारात दि.२२.१.२००७ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अर्ध शासकीय पत्र क्र. Sec/IT/MC/२००६/३९/GAD/Mantralaya, दिनांक २६.१२.२००६ बाबत इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२०.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी/

जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकार श्री.आर.आर.त्रिपाठी यांनी माहितीच्या अधिकारात यापूर्वी जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे सदर प्रकरणी माहिती मागितली असल्याचे दिसून येते. त्यानुसार जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२६.३.२००६ च्या पत्रान्वये खाली नमूद केल्याप्रमाणे अपिलकारास मुद्देनिहाय माहिती दिली असल्याचे दिसून येते.

(१) व्हिजिटेक्स फाउंडेशन यांना महाराष्ट्र आयटी, पुणे,२००७ आयोजित करण्यासाठी अर्ध शासकीय पत्र महाराष्ट्र शासनाच्या सहमतीने देण्यात आले होते.

(२) श्री. मुकेश अरोरा हे व्हिजिटेक्स फाउंडेशनचे संचालक आहेत. व्हिजिटेक्स फाउंडेशन आणि महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये कोणताही करार झालेला नाही.

(३) व्हिजिटेक्स फाउंडेशन व माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी संयुक्तपणे महाराष्ट्र आय.टी.फेअर आयोजित करावे, अशा प्रकारचा प्रस्ताव व्हिजिटेक्स फाउंडेशन यांनी दिला होता व त्यास शासनाने मंजुरी दिली होती.

(४) शासनाचा माहिती तंत्रज्ञान विभाग अशाप्रकारचे मेळावे आयोजित करीत नाही.

(५) स्टॉलच्या दराबाबत शासनाचा काहीही संबंध येत नाही, कारण आयोजक त्यांना परवडणा-या दरानुसार स्टॉलचे दर ठेवतात.

(६) व्हिजिटेक्स फाउंडेशन या कंपनीची नोंदणी इ.माहितीबाबत आपण कंपनीशी परस्पर संपर्क साधवा.

(७) शासनाने व्हिजिटेक्स फाउंडेशनच्या कार्यक्रमास दिलेल्या मान्यतेबाबतच्या टिप्पणीची प्रत सोबत जोडली आहे.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मागणी केलेल्या मुद्दयांबाबतची माहिती वर नमूद केल्याप्रमाणे अपिलकारास उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसून येते. अपिलकार सुनावणीस हजर नव्हते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई /दिनांक :-०५/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/५८८/०२**

**श्री. संतोष विठ्ठल मोहिते,** **------ अपीलकर्ता**
**८४/२, पंतनगर, पहिला मजला,**
**घाटकोपर (पूर्व), मुंबई -४०० ०७५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख वैद्यकीय अधीक्षक,**
**उपनगरीय रुग्णालय, के.बी.भाभा रुग्णालय,**
**सातवा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक,**
**डॉ.कुपर महानगर पालिका रुग्णालय, जुहू, मुंबई.** **-----उत्तरवादी**

## - <u>वि वे च न -</u>

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री.संतोष विठ्ठल मोहिते यानी जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक, कुपर महानगरपालिका रुग्णालय, जूहू, मुंबई यांच्याकडे दिनांक २२.१२.२००६ रोजी अर्ज करुन "अटक आरोपीची वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र मिळण्याबाबत " मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख वैद्यकीय अधिक्षक, उपनगरीय रुग्णालय, के.बी.भाभा रुग्णालय, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि.२८.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. मागणी प्रमाणे जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.६.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक, डॉ.सी.स.गावडे, प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख वैद्यकीय अधिक्षक, डॉ.सीमा मलिक हे उपस्थित होते. युपीसीने दि.१०.७.२००८ रोजी सुनावणीची नोटीस पाठवूनही अपिलकार सुनावणीकरिता हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केलेला लेखी अहवाल तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.संतोष मोहिते यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक, कुपर महानगरपालिका रुग्णीलय, जूहू, मुंबई यांच्याकडे दिनांक २२.१२.२००६ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

(१) श्री.सुनिल रघुनाथ पौडवाल, वय वर्षे ३२- वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र.

(२) श्री.मिर्नमोय सुनिल दत्ता, वय वर्षे ४४- वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र.

(३) श्री.सतीष जनार्दन गायकवाड, वय वर्षे ३६, वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र.

(४) वैद्यकीय प्रमाणपत्रांची ज्या रजिस्टरमध्ये नोंद घेतली त्याची साक्षांकित प्रत.

(५) वैद्यकीय तपासणी रिपोर्ट ज्या रजिस्टरमध्ये नोंद केलेला आहे त्या रजिस्ट नोंदीची मूळ प्रतीची साक्षांकित प्रत.

(६) वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र मिळणेबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक,विलेपार्ले पोलीस ठाणेतर्फे केलेल्या विनंती अर्जाची मूळ प्रतीची साक्षांकित प्रत.

(७) उपरोक्त प्रमाणपत्राचा रिपोर्ट ज्या रजिस्टर नोंद बुकामध्ये केलेला असेल त्याची सहिसुध नक्कल.

(८) प्रत्येक व्यक्तीचे वैद्यकीय रिपोर्ट प्रमाणपत्राच्या विलेपार्ले पोलीस ठाण्यास किती प्रती देण्यात आल्या.

(९) विलेपार्ले पोलीस ठाण्यास वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्राच्या मूळ, कार्बन कॉपी किंवा मूळ प्रतीची झ ेरॉक्स देण्यात आली याची माहिती.

(१०) वैद्यकीय तपासणी रिपोर्ट का देण्यांत आला नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८ (J) नुसार जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक यांनी माहिती नाकारली. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख वैद्यकीय अधिक्षक यांच्याकडे दि.२८.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराच्या मूळ अर्जामध्ये मागितलेली माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,कुपर महानगरपालिका, सर्वसाधारण रुग्णालय यांना आदेश देण्यात आले. जन माहिती अधिका-यांनी प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानुसार माहितीपोटी टपाल खर्च मिळून रु.२९/- एवढे शूल्क कुपर महानगरपालिकेच्या रुग्णालयात जमा करुन माहिती घेऊन जाण्याबाबत दि.१८.३.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले.

जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक श्री.सी.स.गावडे यांनी संपूर्ण आवश्यक सत्य माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-यांकडून नि:शुल्क माहिती मिळणे आवश्यक असताना जन माहिती अधिका-यांनी शूल्क आकारले. जन माहिती अधिकारी जाणिवपूर्वक खोटी माहिती देवून फसवणूक करीत आहेत व त्रास देत आहेत. या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मागितलेली माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक यांनी रु.२९/- एवढे शुल्क कार्यालयात जमा करण्याबाबत अपिलकार श्री.संतोष मोहिते यांना कळविले. मागितलेली माहिती नि:शुल्क देण्याबाबत अपिलकाराचा आग्रह दिसतो. नियमानुसार माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी शुल्क आकारण्यात येते. या प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी कळविल्यानुसार आवश्यक तेवढया रकमेचा भरणा करुन अपिलकारास मागितलेली माहिती प्राप्त करुन घेता येईल असे दिसते. असे असताना नि:शुल्क माहिती उपलब्ध करुन देण्याचा अपिलकाराचा आग्रह लक्षात घेता माहिती उपलब्ध करुन घेण्यात अपिलकारास स्वारस्य दिसून येत नाही, असे दिसते. अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई,**

**मुंबई,**
**दिनांक :-०६/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/५८९/०२**

**श्री. संतोष विठ्ठल मोहिते,** **------ अपीलकर्ता**
**८४/२, पंतनगर, पहिला मजला,**
**घाटकोपर (पूर्व), मुंबई -४०० ०७५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख वैद्यकीय अधीक्षक,**
**उपनगरीय रुग्णालय, के.बी.भाभा रुग्णालय,**
**सातवा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक,**
**डॉ.कुपर महानगर पालिका रुग्णालय, जुहू, मुंबई.** **-----उत्तरवादी**

## - वि वे च न -

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री.संतोष विठ्ठल मोहिते यानी जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक, कुपर महानगरपालिका रुग्णालय, जूहू, मुंबई यांच्याकडे दिनांक २२.१२.२००६ रोजी अर्ज करुन "अटक आरोपीची वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र मिळण्याबाबत " मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख वैद्यकीय अधिक्षक, उपनगरीय रुग्णालय, के.बी.भाभा रुग्णालय, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि.९.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. मागणी प्रमाणे जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.६.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक, डॉ.सी.स.गावडे, प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख वैद्यकीय अधिक्षक, डॉ.सीमा मलिक हे उपस्थित होते. युपीसीने दि.१०.७.२००८ रोजी सुनावणीची नोटीस पाठवूनही अपिलकार सुनावणीकरिता हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केलेला लेखी अहवाल तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.संतोष मोहिते यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक, कुपर महानगरपालिका रुग्णीलय, जूहू, मुंबई यांच्याकडे दिनांक २२.१२.२००६ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

(१) श्री.सुनिल रघुनाथ पौडवाल, वय वर्षे ३२- वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र.

(२) श्री.मिर्नमोय सुनिल दत्ता, वय वर्षे ४४- वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र.

(३) श्री.सतीष जनार्दन गायकवाड, वय वर्षे ३६, वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र.

(४) वैद्यकीय प्रमाणपत्रांची ज्या रजिस्टरमध्ये नोंद घेतली त्याची साक्षांकित प्रत.

(५) वैद्यकीय तपासणी रिपोर्ट ज्या रजिस्टरमध्ये नोंद केलेला आहे त्या रजिस्ट नोंदीची मूळ प्रतीची साक्षांकित प्रत.

(६) वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र मिळणेबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक,विलेपार्ले पोलीस ठाणेतर्फे केलेल्या विनंती अर्जाची मूळ प्रतीची साक्षांकित प्रत.

(७) उपरोक्त प्रमाणपत्राचा रिपोर्ट ज्या रजिस्टर नोंद बुकामध्ये केलेला असेल त्याची सहिसुध नक्कल.

(८) प्रत्येक व्यक्तीचे वैद्यकीय रिपोर्ट प्रमाणपत्राच्या विलेपार्ले पोलीस ठाण्यास किती प्रती देण्यात आल्या.

(९) विलेपार्ले पोलीस ठाण्यास वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्राच्या मूळ, कार्बन कॉपी किंवा मूळ प्रतीची झ ेरॉक्स देण्यात आली याची माहिती.

(१०) वैद्यकीय तपासणी रिपोर्ट का देण्यांत आला नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८ (J) नुसार जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक यांनी माहिती नाकारली. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख वैद्यकीय अधिक्षक यांच्याकडे दि.२८.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराच्या मूळ अर्जामध्ये मागितलेली माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,कुपर महानगरपालिका, सर्वसाधारण रुग्णालय यांना आदेश देण्यात आले. जन माहिती अधिका-यांनी प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानुसार माहितीपोटी टपाल खर्च मिळून रु.२९/- एवढे शूल्क कुपर महानगरपालिकेच्या रुग्णालयात जमा करुन माहिती घेऊन जाण्याबाबत दि.१८.३.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले.

जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक श्री.सी.स.गावडे यांनी संपूर्ण आवश्यक सत्य माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-यांकडून निःशुल्क माहिती मिळणे आवश्यक असताना जन माहिती अधिका-यांनी शूल्क आकारले. जन माहिती अधिकारी जाणिवपूर्वक खोटी माहिती देवून फसवणूक करीत आहेत व त्रास देत आहेत. या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मागितलेली माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक यांनी रु.२९/- एवढे शुल्क कार्यालयात जमा करण्याबाबत अपिलकार श्री.संतोष मोहिते यांना कळविले. मागितलेली माहिती निःशुल्क देण्याबाबत अपिलकाराचा आग्रह दिसतो. नियमानुसार माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी शुल्क आकारण्यात येते. या प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी कळविल्यानुसार आवश्यक तेवढया रकमेचा भरणा करुन अपिलकारास मागितलेली माहिती प्राप्त करुन घेता येईल असे दिसते. असे असताना निःशुल्क माहिती उपलब्ध करुन देण्याचा अपिलकाराचा आग्रह लक्षात घेता माहिती उपलब्ध करुन घेण्यात अपिलकारास स्वारस्य दिसून येत नाही, असे दिसते. अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबइ,**
**दिनांक :-०६/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/५८५/०२**

**श्री. विश्वास बाबुराव पानसरे,** **------ अपीलकर्ता**
**बी/२०३, यशोवर्धन को.ऑप.हौ.सोसायटी,**
**सेक्टर-८, प्लॉट नं.३५,**
**सानपाडा, नवी मुंबई - ७०५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ,**
**जिल्हाधिकारी, पुणे.**

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**जुन्नर उपविभाग, खेड, जि.पुणे.** **-----उत्तरवादी**

**- <u>वि वे च न -</u>**

अपिलकार श्री. विश्वास बाबूराव पानसरे यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग खेड, जि.पुणे यांचेकडे अर्ज करुन फेरफार नोंद ३१६, ४२७ याबाबत माहिती व कागदपत्रे व ७/१२ च्या नोंदीबाबत, वारसा चौकशीचा रजि.चा उतारा, मंडळ अधिकारी आपटाळे यांचे रिपोर्ट इ.बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने दि. ८.१२.२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी,जि. पुणे यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ५.१.२००७ रोजी सुनावणी आयोजित करुन दि.२५.१.२००७ रोजी सविस्तर आदेश पारित केले. उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग खेड, जि.पुणे यांचेकडून समाधानकारक योग्य कागदपत्र मिळाली नाहीत. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.५ ऑगस्ट,२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग खेड, जि.पुणे, हे हजर होते. अपिलकार श्री.विश्वास बा.पानसरे हे हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद ऐकून तसेच त्यांनी सादर केलेला लेखी अहवाल व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.विश्वास पानसरे यांनी माहितीच्या अधिकारा जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग खेड, जि.पुणे यांचेकडे अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

(१) गट क्र.३०२ क्षेत्र १ हे.५१ आर.फेरफार नोंद ३१६, तक्रार एसआर २/९८, रजि.ग्राहय नोंद दिनांक १४.७.९९ चे निर्णयाविरुध्द अपील केले असेल त्या संदर्भात तक्रारदारांना काढलेल्या नोटीसा, जाबजबाब त्याची निकाल प्रत, झालेला फेरफार याची प्रमाणित प्रत.

(२) गट क्र.३०२ क्षेत्र १ हे. ५१ आर बाबत तक्रार ग्राहय धरुन रजि.नोंद झालेली तहसिलदार, जुन्नर यांच्या शिफारशीनुसार मंजुरी, असा फेरफार नोंद ३१६ रद्द असताना मंडळाधिकारी आपटाळे यांचे निकालपत्रा वरुन शहानिशा न करता पुन्हा फेरफार नोंद ४२७ हा लावण्यासाठी एकाच क्षेत्राबाबत मंडळाधिकारी आपटाळे यांनी केलेली कार्यवाही कायदेशीर बाबीने पूर्ण केली किंवा नाही.

(३) गट क्र.३०२, क्षेत्र १ हे. ५१ आर.फेरफार नोंद ३१६ रद्द झाल्यानंतर, पुन्हा तो फेरफार नोंद ४२७, त्याच क्षेत्राबाबत नोंद लावण्याबाबत मंडळाधिकारी आपटाळे यांनी तक्रार एसआर २/९८, निकालाबाबत तहसिलदार, जुन्नर यांची पूर्व परवानगी घेतल्याची प्रमाणित प्रत.

(४) गट क्र.३०२ मधील उर्वरित क्षेत्र ०.०५ आर.दि.४ जानेवारी,२००० रोजीचा दस्तऐवजी सब रजि. जुन्नर यांचेकडून नोंदविलेला कागद, ७/१२ च्या उता-याच्या कार्यवाहीसाठी कामगार, तलाठी काले यांचेकडे आले असताना, त्यांनी त्याबाबत लावलेली नोंद ही कायदेशीर बाबतीत योग्य आहे किंवा नाही.

(५) फेरफार नोंद ३१६ रद्दबाबत कामगार, तलाठी काले यांचे दप्तरी नोंद असतांनासुध्दा फेरफार नोंद ४२७ लावण्यासाठी मंडळाधिकारी आपटाळे, तलाठी काले यांनी कायद्याचे उल्लंघन केले किंवा नाही.

(६) गट क्र.३०२ मधील फेरफार नोंद ३७५ ची नक्कल.

(७) फेरफार नोंद २३०१ ची प्रमाणित प्रत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास माहितीपोटी रु.३०/-शुल्क आकारुन माहितीच्या प्रती दिल्या. प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती अधिकाराच्या संज्ञेत येत नाही असे अपिलकारास दि.३.१०.२००६ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.२५.१.२००७ रोजी आदेश पारित केले. अपिलकारास दि.३.१०.२००६ रोजी माहिती देण्यांत आली आहे. प्रथम अपील विहित मुदतीत दाखल केलेले नाही. या कारणावरुन अपील फेटाळण्यात आले.

वरील विवेचन लक्षात घेता, जन माहिती अधिका-यांनी अर्जदारास मागणीप्रमाणे आवश्यक कागदपत्रांच्या प्रती दि.३.१०.२००६ च्या पत्रान्वये दिल्या असल्याचे दिसून येते. प्रश्न स्वरुपात मागितलेली माहिती दिली नाही. विहित कालावधीत प्रथम अपील दाखल केले नसल्याच्या कारणावरुन प्रथम अपील फेटाळण्यात आले. अपिलातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, गट क्र.३०२ मधील फेरफार नोंद क्र.३१६ नामंजूर झालेले पुन्हा फेरफार नोंद क्र.४२७ दाखल करणे चुकीचे आहे असे अपिलकाराचे म्हणणे आहे. कै.भगवान गेनू दातखिळे यांनी त्यांचे नावावरील १ हे.५६ आर. क्षेत्रापैकी १ हे.५१ आर.क्षेत्र श्री.उल्हास काशिनाथ मधे यांना खरेदी दिले. त्यामुळे कै. दातखिळे यांचे नांवावर ५ गुंठे क्षेत्र शिल्लक रहात होते. सदरच्या खरेदी खतान्वये जमिनीचा तुकडा पडत होता. म्हणून फेरफार नोंद क्र.३१६ मंडळाधिकारी यांनी रद्द केला. म्हणून श्री.उल्हास मधे यांनी उर्वरित ५ गुंठे क्षेत्राचे देखिल कै.भगवान गेनू दातखिळे यांचेकडून खरेदी खत करुन घेतले. त्यांच्या वारसाची संमती घेतली. त्यामुळे दोन्ही खरेदी खताचा एकत्रित विचार केला असता एकत्रिकरण कायद्याचा भंग होत नाही असा सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी,जुन्नर उपाविभाग, खेड (पुणे) यांनी दि.२७.३.२००६ च्या आदेशात काढलेला निष्कर्ष योग्य वाटतो. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०५/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/५८६/०२**

**श्री. विश्वास बाबुराव पानसरे,** **------ अपीलकर्ता**
**बी/२०३, यशोवर्धन को.ऑप.हौ.सोसायटी,**
**सेक्टर-८, प्लॉट नं.३५,**
**सानपाडा, नवी मुंबई - ७०५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
**तहसिलदार कार्यालय,**
**मु.पो.ता.जुन्नर, जि.पुणे.**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,**
**तहसिलदार कार्यालय,**
**मु.पो.ता.जुन्नर, जि.पुणे.** **-----उत्तरवादी**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. विश्वास बाबूराव पानसरे यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, ता.जुन्नर, जि.पुणे यांचेकडे दिनांक ०९.०१.२००७ रोजी अर्ज करुन फेरफार नोंद ३१६, ४२७ याबाबत माहिती व कागदपत्रे व ७/१२ च्या नोंदीबाबत, वारसा चौकशीचा रजि.चा उतारा, मंडळ अधिकारी आपटाळे यांचे रिपोर्ट इ.बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने दि.२६.२.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,मु.पो.ता.जुन्नर,जि. पुणे यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. उप विभागीय अधिकारी यांनी सुनावणी आयोजित करुन दि.२७.३.२००७ रोजी सविस्तर आदेश पारित केले. तहसिलदार, जुन्नर यांचेकडून समाधानकारक योग्य कागदपत्र मिळाली नाहीत. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.५ ऑगस्ट,२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार कार्यालय, जुन्नर, प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, जुन्नर, जि.पुणे हे हजर होते. अपिलकार श्री.विश्वास बा.पानसरे हे हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद ऐकून तसेच त्यांनी सादर केलेला लेखी अहवाल व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.विश्वास पानसरे यांनी माहितीच्या अधिकारा जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, जुन्नर, जि.पुणे यांचेकडे दि.९.१.२००७ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

(१) गट क्र.३०२ क्षेत्र १ हे.५१ आर.फेरफार नोंद ३१६, तक्रार एसआर २/९८, रजि.ग्राहय नोंद दिनांक १४.७.९९ चे निर्णयाविरुध्द अपील केले असेल त्या संदर्भात तक्रारदारांना काढलेल्या नोटीसा, जाबजबाब त्याची निकाल प्रत, झालेला फेरफार याची प्रमाणित प्रत.

(२) गट क्र.३०२ क्षेत्र १ हे. ५१ आर बाबत तक्रार ग्राहय धरुन रजि.नोंद झालेली तहसिलदार, जुन्नर यांच्या शिफारशीनुसार मंजुरी, असा फेरफार नोंद ३१६ रद्द असताना मंडळाधिकारी आपटाळे यांचे निकालपत्रा वरुन शहानिशा न करता पुन्हा फेरफार नोंद ४२७ हा लावण्यासाठी एकाच क्षेत्राबाबत मंडळाधिकारी आपटाळे यांनी केलेली कार्यवाही कायदेशीर बाबीने पूर्ण केली किंवा नाही.

(३) गट क्र.३०२, क्षेत्र १ हे. ५१ आर.फेरफार नोंद ३१६ रद्द झाल्यानंतर, पुन्हा तो फेरफार नोंद ४२७, त्याच क्षेत्राबाबत नोंद लावण्याबाबत मंडळाधिकारी आपटाळे यांनी तक्रार एसआर २/९८, निकालाबाबत तहसिलदार, जुन्नर यांची पूर्व परवानगी घेतल्याची प्रमाणित प्रत.

(४) गट क्र.३०२ मधील उर्वरित क्षेत्र ०.०५ आर.दि.४ जानेवारी,२००० रोजीचा दस्तऐवजी सब रजि. जुन्नर यांचेकडून नोंदविलेला कागद, ७/१२ च्या उता-याच्या कार्यवाहीसाठी कामगार, तलाठी काले यांचेकडे आले असताना, त्यांनी त्याबाबत लावलेली नोंद ही कायदेशीर बाबतीत योग्य आहे किंवा नाही.

(५) फेरफार नोंद ३१६ रद्दबाबत कामगार, तलाठी काले यांचे दप्तरी नोंद असतांनासुध्दा फेरफार नोंद ४२७ लावण्यासाठी मंडळाधिकारी आपटाळे, तलाठी काले यांनी कायद्याचे उल्लंघन केले किंवा नाही.

(६) गट क्र.३०२ मधील फेरफार नोंद ३७५ ची नक्कल.

(७) फेरफार नोंद २३०१ ची प्रमाणित प्रत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास माहितीपोटी रु.३०/-शुल्क आकारुन माहितीच्या प्रती दिल्या. प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती अधिकाराच्या संज्ञेत येत नाही असे अपिलकारास दि.३.१०.२००६ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.२५.१.२००७ रोजी आदेश पारित केले. अपिलकारास दि.३.१०.२००६ रोजी माहिती देण्यांत आली आहे. प्रथम अपील विहित मुदतीत दाखल केलेले नाही. या कारणावरुन अपील फेटाळण्यात आले.

वरील विवेचन लक्षात घेता, जन माहिती अधिका-यांनी अर्जदारास मागणीप्रमाणे आवश्यक कागदपत्रांच्या प्रती दि.३.१०.२००६ च्या पत्रान्वये दिल्या असल्याचे दिसून येते. प्रश्न स्वरुपात मागितलेली माहिती दिली नाही. विहित कालावधीत प्रथम अपील दाखल केले नसल्याच्या कारणावरुन प्रथम अपील फेटाळण्यात आले आहे. अपिलातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, गट क्र.३०२ मधील फेरफार नोंद क्र.३१६ नामंजूर झालेले पुन्हा फेरफार नोंद क्र.४२७ दाखल करणे चुकीचे आहे असे अपिलकाराचे म्हणणे आहे. कै.भगवान गेनू दातखिळे यांनी त्यांचे नावावरील १ हे.५६ आर. क्षेत्रापैकी १ हे.५१ आर.क्षेत्र श्री.उल्हास काशिनाथ मधे यांना खरेदी दिले. त्यामुळे कै. दातखिळे यांचे नांवावर ५ गुंठे क्षेत्र शिल्लक रहात होते. सदरच्या खरेदी खतान्वये जमिनीचा तुकडा पडत होता. म्हणून फेरफार नोंद क्र.३१६ मंडळाधिकारी यांनी रद्द केला. म्हणून श्री.उल्हास मधे यांनी उर्वरित ५ गुंठे क्षेत्राचे देखिल कै.भगवान गेनू दातखिळे यांचेकडून खरेदी खत करुन घेतले. त्यांच्या वारसाची संमती घेतली. त्यामुळे दोन्ही खरेदी खताचा एकत्रित विचार केला असता एकत्रिकरण कायद्याचा भंग होत नाही असा सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी,जुन्नर उपाविभाग, खेड (पुणे) यांनी दि.२७.३.२००६ च्या आदेशात काढलेला निष्कर्ष योग्य वाटतो. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०५/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/५८२/०२**

**श्री. महेंद्र जनार्दन चव्हाण,** **------ अपीलकर्ता**
**८२/२, चाळके चाळ, ताडवाडी,**
**स्वदेशी मिल रोड, सायन,**
**चुनाभट्टी, मुंबई - ४०० ०२२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**२५, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अधिक्षक अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**२५, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.** **-------उत्तरवादी**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. महेंद्र जनार्दन चव्हाण यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्य अभियंता यांचे कार्यालय, मुंबई बांधकाम मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, फोर्ट, मुंबई यांचेकडे दि.१७.१.२००७ रोजी अर्ज करुन अधिक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) परिमंडळ, मुंबई मंडळांतर्गत दि. ०१ जानेवारी,१९९५ ते दि.०१ फेब्रुवारी, २००६ या कालावधीत गट क व गट ड मधील पदे सरळसेवेने भरल्याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) मंडळ, मुंबई यांचेकडे दि.२७.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०५.०८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीची नोटीस दि.११.७.२००८ रोजी युपीसीने पाठवूनही जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार सुनावणीकरिता हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.महेंद्र जनार्दन चव्हाण यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा मुख्य अभियंता यांचे कार्यालय, मुंबई बांधकाम मंडळ, मुंबई यांचेकडे अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

मुंबई सार्वजनिक बांधकाम परिमंडळा अंतर्गत दि.१.१.१९९५ ते दि.१.२.२००६ या कालावधीत गट क व गट ड मधील पदे, रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरिता मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील ॲप्लीकेशन क्र.११६४६/११७२४/१९९६ प्रकरणी,रिक्त पदे सरळ सेवेने भरण्याच्या कार्यपध्दतीबाबत सूचना दिल्या आहेत. रिक्त पदे भरताना (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदे वगळून) रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडून उमेदवाराची ज्येष्ठता यादी प्राप्त करुन, त्याच बरोबर सर्व प्रसार माध्यमातून (वर्तमानपत्रातील जाहितरातीद्वारे, दूरदर्शन, रेडीओ, नोटीसबोर्ड इ.) प्रसिध्दी देऊन उमेदवारांकडून अर्ज मागविण्यांत यावेत व विहित कार्यपध्दतीनुसार उमेदवारांची पारदर्शकपणे निवड करण्यांत यावी असे आदेश आहेत. या आदेशाची अंमलबजावणी केली असल्यास यासंबंधीची कागदपत्र, वर्तमानपत्रातील जाहिरातीच्या प्रतीची मागणी केली. गट क व गट ड मधील पदे भरण्यास सक्षम असणा-या नियुक्ती अधिका-यांची नांवे, त्याचे अधिकार व कर्तव्ये इ.माहिती भारतीय राज्य घटनेच्या मूलभूत अधिकार कलम १६ प्रमाणे सर्व संबंधित उमेदवारांना समान संधी देण्यात आल्याबाबतची केलेल्या कार्यवाहीची माहिती, नेमणूक करण्यात आलेले एकूण उमेदवार, त्यांची पदनामे, मागासवर्गीयांच्या गटानुसार तसेच सर्वसाधारण उमेदवारांची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. म्हणून अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घेतली नाही. माहिती दिली नाही.

मुंबई सार्वजनिक बांधकाम परिमंडळांतर्गत /प्रादेशिक विभागांतर्गत सर्वसाधारणपणे १७ नियुक्ती प्राधिकारी आहेत. इतक्या मोठया प्रमाणातील माहिती मिळवून अर्जदारास मुंबई मंडळ कार्यालयामार्फत माहिती देणे शक्य होत नाही. म्हणून अर्जदाराचा माहितीचा अधिकार अर्ज सर्व नियुक्ती प्राधिका-यांकडे पाठवून अर्जदाराने प्रत्येक नियुक्ती अधिका-यां कडे संपर्क साधावा. अर्जदारास परस्पर माहिती द्यावी असे जन माहिती अधिकारी यांनी दि.३.२.२००७ व दि. ५.२.२००७ च्या पत्रान्वये सर्व नियुक्ती प्राधिकारी तसेच अपिलकारास कळविले. खुद्द मुंबई सा.बां.मंडळातील गट क व गट ड मधील पदावर नेमणूक केलेल्या उमेदवारांच्या नावांची पदनामासह दि.२५.४.२००७ च्या पत्रान्वये यादी अपिलकारास दिली आहे. परंतु सरळ सेवा भरती संबंधी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शनानुसार अवलंबिण्यात आलेल्या कार्यपध्दतीबाबत माहिती दिलेली दिसत नाही.

वरील विवेचन लक्षात घेता मी असे आदेश देतो की, खुद्द मुंबई सा.बां.मंडळातील गट क व गट ड ची रिक्त पदे भरण्यापूर्वी अर्जदाराच्या मागणीनुसार सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सुचनानुसार विहित कार्यपध्दती अवलंबिण्यात आली किंवा कसे याबाबतची अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी माहिती द्यावी. अपिलकाराने मागितलेल्या माहितीची व्याप्ती लक्षात घेता प्रत्येक नियुक्ती अधिका-याकडे आवश्यक माहितीसाठी संपर्क साधवा असे

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दिलेले उत्तर समर्पक असून, नियमानुसार योग्य वाटते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०५/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६०९/०२**

**श्री. सौमिल ए.पटेल,** **------ अपीलकर्ता**
**५४, एच.के.हाऊस,**
**आश्रम रोड,अहमदाबाद-३८० ००९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ५१.** **-----उत्तरवादी**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. सौमिल ए.पटेल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (अभियांत्रिकी विभाग) यांचेकडे दि.९.२.२००७, १२.२.२००७, २२.३.२००७ व दि. १६.४.२००७ रोजी अर्ज करुन चौहान बिल्डर व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व बृहन्मुंबई महानगर पालिका या उभयतांमध्ये झालेल्या पत्रव्यवहाराबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल करण्याऐवजी थेट राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.८.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (अभियांत्रिकी विभाग) श्री. युवराज नाकाडे तसेच श्री.सुनिल बेंद्रे हे हजर होते. सुनावणीची नोटी दि.१८.७.२००८ रोजी युपीसीने पाठवूनही अपिलकार श्री.सौमिल पटेल हे हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचा युक्तिवाद ऐकून तसेच त्यांनी सादर केलेला लेखी अहवाल व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.सौमिल पटेल यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडे एकूण चार अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

(१) सांताक्रूझ (पश्चिम) एस.व्ही.रोड, खीरा नगर समोरील प्लॉट नं.१०६ ते ११६ आणि ११८ ते १४७ बृहन्मुंबई महानगपालिकेच्या एस.आर.ए.अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत विकसित करण्याचे कंत्राट मे.चव्हाण बिल्डर्स, भारत गृहनिर्माण यांना देण्यात आले. याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका (एस.आर.ए.) यांनी मे.चव्हाण बिल्डरला दिलेल्या एल.ओ.आय.ची प्रत.

(२) याबाबत मे.चव्हाण बिल्डर आणि बृहन्मुंबई महानगरपालिका (एस.आर.ए.) यांच्यामध्ये झालेल्या संपूर्ण पत्रव्यवहाराच्या प्रती.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिका (एस.आर.ए.) /चव्हाण यांनी ॲडव्हान्स बिल्डरकडून प्राप्त केलेल्या संमती पत्राची प्रत.

(४) एल.ओ.आय.देण्यापूर्वी ७०% रहिवाश्यांकडून घेतलेल्या संमतीपत्राची प्रत.

(५) झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत क्र.१०६ ते ११६ आणि ११८ ते १४७ प्लॉटपैकी किती प्लॉट विकासाकरिता घेण्यात आले आहेत.

(६) किती प्लॉट शिल्लक आहेत.

मागितलेली माहिती विहित कालावधीत प्राप्त झाली नसल्याने अपिलकाराने दि.१४ मे,२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (१) अनुसार जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नाही तर अर्जदारास प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करता येते. परंतु सदर तरतुदीनुसार अपिलकाराने विहित कार्यपध्दतीचा अवलंब केलेला नाही असे दिसून येते. आयोगाकडील द्वितीय अपिलाच्या सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन जन माहिती अधिका-याने खालीलप्रमाणे युक्तिवाद केला.

माहिती अधिकार अर्जास दि.९.३.२००७ व दि.१६.४.२००७ रोजी उत्तर पाठविण्यांत आले. अपिलकर्ते यांची मुख्य तक्रार रु.५००/- चा ड्राफ्ट अर्जासोबत पाठवून देखिल माहिती देण्यात न आल्याबाबत असून त्याबाबतीत अर्जदार यांनी मागितलेली माहिती मोठया स्वरुपाची तसेच प्रश्नात्तर स्वरुपाची आहे. तसेच अपिलकर्ते यांनी ढोबळ स्वरुपात रु.५००/- चा ड्राफ्ट पाठविल्यामुळे त्यांना उपरोक्त पत्राद्वारे नियमित

कालावधीमध्ये उत्तर दिले. अपिलकारास पाहिजे असलेली माहिती घेण्यासाठी अभिलेखाचे निरीक्षण करुन हवी असलेली माहिती/ कागदपत्रे मोजके शुल्क भरुन उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले होते. अपिलकर्ते यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे अपील न करता सरळ आयुक्त, राज्य माहिती आयोगाकडे अपील केले. तसेच अपिलकार हे अभिलेखाचे निरीक्षण करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांचेकडे न आल्यामुळे कार्यवाही करणे शक्य झाले नाही, असे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले.

वरील विवेचन लक्षात घेता सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागणी केलेली कागदपत्र देणे सुलभ व्हावे याकरिता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित कागदपत्र तपासण्याकरिता प्रथम उपलब्ध करुन द्यावीत. अपिलकार श्री.सौमिल पटेल यांनी कागदपत्रांची तपासणी करुन आवश्यक कागदपत्रांच्या प्रतीची मागणी करावी. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी विहित शुल्क आकारुन मागणीनुसार आवश्यक कागदपत्रांच्या प्रती अपिलकारास द्याव्यात.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०८/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६१३/०२**

**श्री. महेंद्र चौरारीया,** **------ अपीलकर्ता**
**सी-७११, दोस्ती लिली, दोस्ती एकर्स,**
**वडाळा (पूर्व), मुंबई- ४०० ०३७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था मुंबई (१) शहर,**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,**
**जीपीओ समोर, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक,**
**सहकारी संस्था एफ.एन.वॉड,**
**मल्होत्रा हाऊस, मुंबई-४०० ००१.** **-----उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. महेंद्र चौरारीया यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक सहकारी संस्था, एफ.एन.विभाग, मुंबई यांचेकडे दि.९.९.२००६ रोजी अर्ज करुन शालिमार व हलिमा को.ऑप.हौ.सोसायटी लि.या संस्थेची नोंदणी कागदपत्र व अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तराने व प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशा अन्वये समाधान झाले नसल्याने, अपूर्ण माहिती दिली असल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७ मे,२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.८.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, एफ.एन.विभाग, मुंबई, श्री. बाळ परब, प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई (१) शहर श्री.एल.एस.लष्कर, तसेच अपिलकार श्री.महेंद्र चौरारिया हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.महेंद्र चौरारिया यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.९.९.२००६ रोजी अर्ज करुन खालील एकूण ९ मुद्दयांबाबत माहिती मागितली होती.

(१)  फॉर्म " झेड " शालिमार को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.

(२)  शालिमार को.ऑप.हौ.सोसायटी प्रतिनिधी नेमणूक प्रतिज्ञापत्र.

(३)  नमुना " वाय " शालिमार को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.

(४) टायटल सर्टिफिकेट शालिमार को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.

(५) आर्किटेक्ट प्लॅन शालिमार को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.

(६) होम स्पेस डेव्हलपर्स यांनी श्री.डी.सी.खुराना यांना शालिमार को.ऑप.हौ. सोसायटी लि. चे नोंदणीबाबत प्राधिकृत केल्याचे प्रतिज्ञापत्र.

(७)  हलिमा को.ऑप.हौ. सोसायटी लि. आक्युपेशन सर्टिफिकेट.

(८)  हलिमा को.ऑप.हौ. सोसायटी लि. या संस्थेच्या नोंदणीबाबत डी.सी.खुराना यांना प्राधिकृत केल्याचे प्रतिज्ञापत्र.

(९)  नमुना " आय " हलिमा को.ऑप.हौ. सोसायटी लि.

जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक सहकारी संस्था यांनी दि.१९.१.२००७ व दि.२२.२.२००७ च्या  पत्रान्वये मुद्दा क्र. १, ३, ४, ७ व ९ बाबत माहिती दिली.  मुद्दा क्र.२, ५, ६ व ८ बाबत माहिती उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिका-याने अपिलकारास कळविले.  यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि. ३.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले.  सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन अपिलकारास म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली. शालिमार व हलिमा को.ऑप. हौ.सोसायटी या संस्थांच्या धारिकेतील माहिती अपिलकारास जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक सहकारी संस्था यांनी दि.२२.२.२००७ च्या पत्रान्वये छायांकित प्रती दिलेल्या आहेत.  म्हणून प्रथम अपिलीय अधिका-यांनी तसे आदेश पारित करुन अपिलकाराचे प्रथम अपील फेटाळले.  यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१४ मे, २००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने शालिमार व हलिमा को.ऑप. हौ.सोसायटी या संस्थां संबंधी एकूण ९ मुद्दयांबाबत जन माहिती अधिका-याकडे माहिती मागितली होती. त्यापैकी ५ मुद्यांबाबत जन माहिती अधिका-याने अपिलकारास दि.२२.२.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. उर्वरित ४ मुद्यांबाबत माहिती उपलब्ध नाही असे कळविले.  परंतु सदर ४ मुद्यांची माहिती का उपलब्ध होऊ शकत नाही.  सदर मुद्यांची माहिती देण्यासाठी काय प्रयत्न केले याबाबत जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय

अधिकारी यांनी काहीही भाष्य केलेले नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झ ााल्यापासून ३० दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास उर्वरित चार मुद्यांची माहिती द्यावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०८/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६१७/०२**

**श्री. संभाजी प्रभाकर टेकवडे,** **------ अपीलकर्ता**
**५, म्युनिसिपल बिल्डिंग, ग.द.आंबेकर मार्ग,**
**भोईवाडा, राम मंदिराजवळ, मुंबई- ४०० ०१२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**एल.वॉर्ड यांचे कार्यालय, लक्ष्मणराव यादव मंडई,**
**एस.जी.बर्वे मार्ग, कुर्ला (प.) मुंबई-४०० ०७०.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**वरिष्ठ निरीक्षक (दुकाने आस्थापना),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई-४०० ०७०.** **-----उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. संभाजी प्रभाकर टेकवडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक (दुकाने आस्थापना), बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे दि.३०.११.२००६ रोजी अर्ज करुन आपत्कालिन व्यवस्थापन विभागातर्फे खरेदी व वाटप केलेल्या आपत्कालिन वस्तू व अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दि.१२.१२.२००६ च्या पत्रान्वये दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, एल विभाग, कुर्ला महानगरपालिका, मुंबई यांच्याकडे दि.१०.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१२.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, एल विभाग, श्री.नरेंद्र रा.बरडे, जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक, श्री.प्र.द.जानवलकर व श्री.मो.श.मुणगेकर, तसेच अपिलकार श्री. संभाजी टेकवडे हे हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.संभाजी टेकवडे यांनी माहितीच्या अधिकारात दि.३०.११.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक (दुकाने आस्थापना) यांच्याकडे अर्ज करुन आपत्कालिन विभागातर्फे खरेदी केलेल्या व वाटप केलेल्या आपत्कालिन वस्तू व नागरी सुविधा केंद्रातील पावत्या व रक्कम, दुकाने व आस्थापना विभागातील वरिष्ठ निरीक्षक, श्री.एम.एस.मुणगेकर यांच्या कार्यालयीन कामकाजापासून त्यांचा हजेरीपट, कार्ड पंचिंग, फिल्ड बुक, दैनंदिन कार्यालयीन कामकाजाची नोंद घेतलेल्या नोंदवहया यांच्या प्रती, श्री. मुणगेकर यांनी एकूण रद्द केलेल्या प्रमाणपत्राच्या तसेच एकूण नवीन दिलेल्या प्रमाणपत्राच्या महिन्याप्रमाणे अहवाल, श्री. मुणगेकर यांनी फी भरल्याशिवाय नवीन ओळखपत्र दिलेली आहेत अशा प्रमाणपत्रांच्या बाबत सर्व कागदपत्र. श्री. मुणगेकर यांच्या दालनामधील संगणकबाबातची आवश्यक ती शिफारस व मंजुरीची सर्व कागदपत्र.

अपिलकाराने वरीलप्रमाणे मागितलेल्या माहितीबाबत जन माहिती अधिका-यांनी दि.१२.१२.२००६ च्या पत्रान्वये अपिलकारास उत्तर दिले. अपिलकाराने मागितलेल्या माहितीप्रमाणे प्रती उपलब्ध करुन देण्याकरिता एकूण रु. १३,७८८/- इतके शुल्क सहायक आयुक्त, एल विभाग, कुर्ला, मुंबई यांच्या कार्यालयात रोख अधिदान खिडकीवर दि. २२.१२.२००६ पर्यंत धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा बँकर्स धनादेशाच्या स्वरुपात अथवा रोखीने भरणा करावा असे अपिलकारास कळविण्यांत आले. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, एल विभाग, यांच्याकडे दि.१०.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घेऊन दि.५.२.२००७ रोजी आदेश पारित केले. त्यामध्ये अपिलकारास कागदपत्रांची तपासणी करण्याकरिता योग्य ती तारीख व वेळ १५ दिवसांच्या आत जन माहिती अधिका-यांनी दयावी व अपिलकारास मागणीप्रमाणे कार्यालयातील उपलब्ध कागदपत्र आवश्यक ते शुल्क आकारुन माहिती देण्यांत यावी, असे आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाप्रमाणे माहिती मिळली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकाराने जन माहिती अधिका-यांकडे दि.३०.११.२००६ च्या पत्रान्वये मागणी केलेल्या माहितीचे तसेच जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१२.१२.२००६ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तराचे अवलोकन केले असता, अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व जन माहिती अधिका-याने माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता आकारणी केलेले शुल्क नियमानुसार योग्य वाटते. तरी अपिलकाराने आवश्यक ते शुल्क भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी अथवा संबंधित कागदपत्रांची तपासणी करुन आवश्यकतेप्रमाणे शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी. जन माहिती अधिका-यांनी नियमानुसार अपिलकारास कागदपत्रांची तपासणी करण्याची परवानगी

द्यावी व त्यानंतर मागणीप्रमाणे आवश्यक ते शुल्क आकारुन अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. या परिस्थिती मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६१८/०२**

**श्रीमती कलावती रघुनाथ खरात,** **------ अपीलकर्ता**
**द्वारा-रघुनाथ मारुती खरात,**
**२२/१५५५, अभ्युदय नगर,मुंबई- ४०० ०३३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, सातारा**

**जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, सातारा.** **------ उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्रीमती कलावती रघुनाथ खरात, यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, जि.सातारा यांच्याकडे दि.०७.१२.२००६ रोजी अर्ज करुन महाराणी सईबाई भोसले सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या.लोणंद संबंधी भूखंड वाटपातील गैरव्यवहार / अर्जदारास भूखंड न मिळणेबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने दि.२६.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलावर आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.६.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१२.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सातारा यांच्या वतीने सहायक निबंधक सहकारी संस्था, ता. खंडाळा, श्री.एस.एस.चपटे हे हजर होते. सुनावणीची नोटीस युपीसीने दि.२२.७.२००८ रोजी पाठवूनही अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-याने केलेला युक्तिवाद व सादर केलेला लेखी अहवाल तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्रीमती कलावती खरात यांनी माहितीच्या अधिकारात दि.७.१२.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सातारा यांच्याकडे अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

(अ) महाराणी सईबाई भोसले सहकारी गृहनिर्माण संस्था बाबत आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे यांच्या कार्यालयास सदर संस्थेच्या संदर्भात जिल्हा उप निबंधक, सातारा कार्यालयाने लिहिलेल्या दि.१८.५.२००५ च्या पत्राची प्रत.

(ब) सदर संस्थेच्या भूखंडाचे गैर शासनमान्य व्यक्तिंना वाटप केले ही वस्तुस्थिती जिल्हा उपनिबंधक कार्यालयास संबंधितांनी केव्हा कळविली व त्यावर सदर कार्यालयाने कोणती कार्यवाही केली याबाबतची माहिती. सहायक निबंधक सहकारी संस्था, खंडाळा यांनी जो अहवाल जिल्हा उपबिनंधक, सातारा कार्यालयास सादर केला असेल त्या अहवालाची प्रत.

(क) अपिलकाराने सहायक निबंधक सहकारी संस्था, खंडाळा यांच्या कार्यालयास दि.११.८.२००६ रोजी लिहिलेल्या अर्जावर जिल्हा उप निबंधक, सातारा यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती.

(ड) संस्थेने भूखंड वाटपात केलेला गैरव्यवहार लक्षात घेता शासनमान्य सभासदांसाठी असलेला भूखंड शासनाची पूर्व परवानगी न घेता अवैधरित्या ठेवलेला आहे. संबंधित भूखंडावर अवैधरित्या राहात आहेत. याची जाणीव संबंधितांना करुन देण्यात आली किंवा कसे याची माहिती देणे. आतापर्यंत अशी जाणीव करुन देण्यात आली नसेल तर आता ती करुन देण्यात येईल किंवा कसे याबाबतची माहिती.

सहायक निबंधक सहकारी संस्था, सातारा यांनी अपिलकारास दि. ७.१२.२००६ च्या अर्जाच्या अनुषंगाने द दि.१५.२.२००७ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे माहिती दिली.

(अ) महाराणी सईबाई सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.लोणंद या संस्थेच्या भूखंड वाटपाच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ७८ अन्वये कार्यवाहीचे आदेश दि.२७.९.१९९५ च्या आदेशाने संचालक मंडळ बरखास्त करण्याची कार्यवाही करण्यात आली होती. या कार्यवाहीच्या अनुषंगाने संस्थेच्या वतीने विभागीय सह निबंधक सहकारी संस्था,पुणे यांच्याकडे अपील दाखल करण्यात आले होते. त्यावर विभागीय सह निबंधक सहकारी संस्था, पुणे यांनी त्याचें दि.७.१२.१९९५ च्या आदेशान्वये संस्थेचे अपील मंजूर करुन सहायक निबंधक सहकारी संस्था, खंडाळा यांनी दि.२७.९.१९९५ रोजी दिलेले आदेश रद्दबादल केले.

(ब) भूखंड देणे, हस्तांतरण करणे अगर काढून घेणे याबाबतची कार्यवाही सहायक निबंधक सहकारी संस्था कार्यालयाच्या स्तरावर होत नाही.

(क) भूखंड वाटप, वापर, हस्तांतरण अथवा परत घेणे याची अनुषंगिक कार्यवाही सहायक निबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयामार्फत होत नाही.. सदरचे आदेश मा.जिल्हाधिका-यांना आहेत.

(ड) भूखंड वाटप, वापर, हस्तांतरण अथवा परत घेणे याची अनुषंगिक कार्यवाही सहायक निबंधक सहकारी संस्था, खंडाळा यांच्यामार्फत होत नाही. त्यामुळे अशा पध्दतीने हस्तांतरण झालेल्या सदस्यांवर कार्यवाही करण्याचे अधिकार सदर कार्यालयास नाहीत.

जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे अपिलकाराने दि.२६.२.२००७ रोजी जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, सातारा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलावर आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ६.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती व जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिका-याने अपिलकारास दि.१८.५.२००५ च्या पत्राची प्रत दिलेली दिसून येत नाही. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१८.५.२००५ च्या पत्राची प्रत उपलब्ध करुन द्यावी. उर्वरित मुद्दयांबाबतची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाशी संबंधित असल्याचे जन माहिती अधिका-यांनी त्यांच्या दिनांक १५.२.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास दिलेले उत्तर समर्पक वाटते. वरील परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६१९/०२**

**श्री. प्रकाश गोविंद नवाथे,** **------ अपीलकर्ता**
**२०४, राजबाग प्लॉट नं.२७१,**
**दत्तूचंद सोसायटी, सर भालचंद्र मार्ग,**
**माटुंगा, मुंबई- ४०० ०१९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**मनपा/ एफ उत्तर विभाग, ९६ भाऊ दाजी मार्ग,**
**माटुंगा, मुंबई- ४०० ०१९.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इमारती व कारखाने),**
**मनपा/ एफ उत्तर विभाग, ९६ भाऊ दाजी मार्ग,**
**माटुंगा, मुंबई- ४०० ०१९.** **------ उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री.प्रकाश गोविंद नवाथे, यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इमारती व कारखाने), मनपा/ एफ उत्तर विभाग, माटुंगा, मुंबई यांच्याकडे दि. २२.१.२००७ रोजी अर्ज करुन बेकायदेशीर अतिक्रमण व बेकायदेशीर बांधकाम इ.बाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दि.७.२.२००७ च्या पत्रान्वये दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, मनपा/ एफ उत्तर विभाग, माटुंगा, मुंबई यांच्याकडे दि.०१.०३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. म्हणून अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.७.०५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १२.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इमारती व कारखाने) मनपा/ एफ उत्तर विभाग, श्री.सु.अ.तारकर, प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, एफ उत्तर विभाग, श्री.सुहास करवंदे, तसेच अपिलकार श्री.प्रकाश नवाथे हे हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.प्रकाश गो.नवाथे यांनी माहितीच्या अधिकारात दि.२२.१.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इमारती व कारखाने), मनपा/ एफ उत्तर विभाग, माटुंगा, मुंबई यांच्याकडे अर्ज करुन पुढील माहिती मागितली.

(१) ब्लॉक नं.२०१/२०२ ला लागून असलेला स्लोप/सज्जा टेनंटन/ बिल्डर किशोर छेडा यांनी भिंत बांधून बंद केला आहे. तसेच २०१ ची मल्टी परपज रुम आणि स्लोप यामधील भिंत पाडण्यांत आली असून, स्लोप ब्लॉकमध्ये समाविष्ट करण्यांत आला आहे. या सर्व गोष्टी बिल्डरला बी.सी.सी.मिळाल्यानंतर करण्यात आल्या आहेत. याबाबत कोणती कारवाई करण्यात येणार ?

(२) बिल्डर किशोर छेडा यांनी पहिल्या मजल्यावर उघडी भिंत बांधून बंद केल्यामुळे पॅसेजला मिळणारा उजेड, एअर व्हेन्टिलेशन पूर्णपणे बंद झाले आहे. याबाबत कोणती कारवाई करणार ?

(३) बिल्डरने आपल्या पर्सनल लिफ्टच्या बाजूला सोसायटीच्या आवारात उतरण्यासाठी असलेल्या मार्गावर बसविलेला कोलॅप्सिबल दरवाजा रात्री कुलूप लावून बंद केला जातो. याच मार्गावर देवधर रोडवर उघडणारा लहान दरवाला रात्री कुलूप लावून बंद केला जातो. यावर कोणती कारवाई करणार ?

(४) मोटारींना ये-जा करण्यासाठी बिल्डरने देवधर रोड आणि भालचंद्र रोड यांच्या जंक्शनवर चौथा दरवाजा उघडला आहे. या दरवाजाला परवानगी दिली आहे काय, परवानगी दिली नसल्यास कोणती कारवाई करणार ? परवानगी दिली असल्यास त्याची साक्षांकित प्रत.

अपिलकाराने वरीलप्रमाणे मागितलेल्या माहितीस जन माहिती अधिका-याने दि. ७.२.२००७ च्या पत्रान्वये उत्तर दिले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, एफ उत्तर विभाग, यांच्याकडे दि.१.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घेतली नाही. माहिती दिली नाही. म्हणून व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ७.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिका-यांकडे केलेल्या तक्रारीस अनुसरुन राजबाग इमारतीतील अनधिकृत बांधकामासंदर्भात दखल घेऊन मनपाच्या ३५१ कलमानुसार नोटीस बजावून, कार्यवाही करुन अपिलकारास माहिती दिली. सदर इमारती मधील अनधिकृत बांधकामाची अपिलकाराने तक्रार केली आहे. सदर बांधकाम हे सकृतदर्शनी अनधिकृत असल्याचे आढळून येत नाही. तरी

अपिलकाराने स्वतः सहाय्यक अभियंता (इमारती व कारखाने) यांच्या कार्यालयातील अधिका-यांबरोबर संयुक्त पहाणी करावी व त्यांना अभिप्रेत असलेली अनधिकृत बांधकामे निदर्शनास आणून द्यावीत. जेणेकरुन पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.७.२.२००७ च्या पत्रान्वये दिलेले उत्तर समर्पक असून, नियमानुसार असल्याचे दिसते. सदर परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६२०/०२**

**श्री. चंद्रकांत उदयचंद मेहता,** **------ अपीलकर्ता**
**बी-५०२, रिव्हर पार्क,**
**पश्चिम द्रूतगती मार्ग,**
**कांदिवली (पूर्व), मुंबई- ४०० १०१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी,**
**दुरुस्ती व पुनर्रचना विभाग, ३ रा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी कार्यकारी अभियंता,**
**दुरुस्ती व पुनर्रचना विभाग, ३ रा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------ उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री.चंद्रकांत उदयचंद मेहता, यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा निवासी कार्यकारी अभियंता, मुंबई इमारती दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, गृहनिर्माण भवन, मुंबई यांच्याकडे दि.२२.९.२००६ रोजी अर्ज करुन दुरुस्ती व पुनर्रचनेच्या कामासाठी विकासकास म्हाडा मार्फत ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे धोरण, दुरुस्ती व पुनर्रचना योजने अंतर्गत विकासकाकडून सन १९९२ ते २००६ पर्यंत अधिकचे एकूण किती गाळे प्राप्त झाले आहेत, इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. मागणीप्रमापणे जन माहिती अधिका-यां कडून माहिती प्राप्त झाली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी यांच्याकडे दि.२५.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.७ मे,२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १२.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्रचना मंडळ श्री.एच.एम.थोरात, तसेच अपिलकार श्री.चंद्रकांत मेहता तसेच त्यांच्या वतीने युक्तीवाद करण्याकरिता त्यांचे वकील एस.डी.दिघे हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.चंद्रकांत मेहता यांनी माहितीच्या अधिकारात दि.२२.९.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा निवासी कार्यकारी अभियंता, मुंबई इमारती दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्याकडे अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

(१) दुरुस्ती व पुनर्रचना योजने अंतर्गत बांधकामाकरिता विकासकास म्हाडामार्फत ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे धोरण. (२) दुरुस्ती व पुनर्रचना योजने अंतर्गत विकासकाकडून सन १९९२ ते आजतागायत म्हाडाकडे विकासकाकडून अधिकचे एकूण किती गाळे प्राप्त झाले. (३) दुरुस्ती व पुनर्रचना योजने अंतर्गत विकासकाकडून प्राप्त झालेल्या अधिकच्या गाळयांचे वाटप करण्याबाबत म्हाडाचे काय धोरण आहे. (४) अधिकच्या गाळयाच्या वाटपाबाबतची विभागनिहाय सविस्तर माहिती. (५) दुरुस्ती व पुनर्रचना योजने अंतर्गत गाळे हस्तांतरण केल्यासंदर्भात शास्ती लावण्याबाबतचे धोरण. (६) सन १९९२ ते आजतागायत एकूण हस्तांतरित केलेल्या गाळयांची संख्या, गाळे धारकांची नांवे, विभाग व क्षेत्र. (७) वर्षनिहाय १९९२ ते आतापर्यंतची विभागनिहाय प्रतिक्षा यादी. ज्यांना गाळे वाटप करण्यांत येणार आहे अशा प्रतिक्षा यादीवरील व्यक्तिंची नांवे. (८) सदर योजने अंतर्गत सन २००३ पर्यंत गाळे वाटपाच्या आदेशाच्या प्रती.

अपिलकाराने वर नमूद केलेली माहिती विविध अधिका-यांशी संबंधित असल्यामुळे निवासी कार्यकारी अभियंता यांनी सर्व संबंधित अधिका-यांना अपिलकाराचा अर्ज पाठवून परस्पर माहिती देण्याबाबत दि.७.१०.२००६ च्या पत्रान्वये कळविले. दुरुस्ती व पुनर्रचना योजनेंतर्गत विकासकाकडून प्राप्त झालेले अधिकचे क्षेत्राबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी कार्यकारी अभियंता, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी अपिलकारास दिनांक १८.१२.२००६ च्या पत्रान्वये दिली. इतर मुद्दयांबाबतची माहिती संबंधित अधिका-यांकडून अपिलकारास प्राप्त झाली नसल्यामुळेअपिलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घेतली नाही, आदेश पारित केले नाहीत, माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७ मे,२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकाराने दि.२२.९.२००६ च्या पत्रान्वये मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता निवासी कार्यकारी अभियंता, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी विकासकाकडून प्राप्त झालेल्या अधिकच्या क्षेत्रा बाबतची माहिती दिली. अपिलकाराने मागितलेल्या इतर मुद्दयांबाबतची माहिती विविध अधिका-यांशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिका-याने अपिलकाराचा अर्ज सर्व संबंधित अधिका-याकडे पाठूवन अपिलकारास

माहिती देण्याबाबत दि.७.१०.२००६ च्या पत्रान्वये कळविले. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) अंतर्गतच्या माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांची दि.१८.९.२००६ च्या आदेशान्वये यादी प्रसिध्द केली. अपिलकाराने मागणी केलेली माहिती सदर विविध जन माहिती अधिका-यांशी संबंधित असल्याचे दिसते. तेव्हा आवश्यक मुद्दयांबाबत माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता अपिलकाराने सर्व संबंधित जन माहिती अधिका-यांकडे संपर्क साधणे आवश्यक वाटते. मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, वांद्रे, मुंबई यांनी अपिलकारास ३० दिवसांच्या आंत आवश्यक ती माहिती देण्याबाबत सर्व संबंधित जन माहिती अधिका-यांना सूचना द्याव्यात.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/०२/०२**

**श्री. प्रमोद एच.रुंगठा,** **------ अपीलकर्ता**
**फ्लॅट नं.५, यशोधन फ्लॅट नं.२४१,**
**सेक्टर नं.३, चारकोप,**
**कांदिवली (प.), मुंबई- ४०० ०६७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**म्हाडा, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपनिबंधक सहकारी संस्था (३),**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**म्हाडा, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१** **------ उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार ॲड.प्रमोद रुंगठा यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,आर विभाग सहकारी संस्था यांचेकडे दि.२१ जुलै,२००६ रोजी अर्ज करुन चारकोप साकेत सहकारी गृहनिर्माण सोसायटी लि.च्या अध्यक्षांच्या गैरकारभाराबाबत दि.१९.६.२००६ रोजी केलेल्या तक्रार अर्जावरील कार्यवाहीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह निबंधक सहकारी संस्था, मुंबई विभाग, मल्होत्रा हाऊस फोर्ट, मुंबई यांचेकडे दि.१४.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.६.१२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर यापूर्वी दि.१८.६.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली होती. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच

अपिलकार श्री.प्रमोद रुंगठा यापैकी कोणीही हजर नव्हते. त्यामुळे सदर सुनावणी तहकूब करुन दि.११.८.२००८ रोजी आयोजित केली. परंतु यावेळीही सदर अपिलातील कोणीही सुनावणीकरिता हजर राहिले नाहीत.

अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता असे दिसून येते की, अपिलकार ॲड.प्रमोद रुंगठा यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,आर विभाग, सहकारी संस्था यांचेकडे दि.३१.७.२००६ रोजी अर्ज करुन चारकोप कांदिवली (प.) येथील प्लॉट १२४, सेक्टर-४ मधील चारकोप साकेत सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष श्री.शामराव जेधे, सहायक पोलीस आयुक्त यांच्या मनमानी कारभार, पदाचा दुरुपयोग, अपिलकार व त्यांच्या वडिलांना १० वर्षापासून त्रास देऊन ताणतणावात ठेवले. संस्थेच्या असोसिएट मेंबरशीपकरिता रु.१०/- प्रवेश फी चा भरणा केला असता पावती दिली नाही. बेकायदेशीर कामे करुन घेण्याकरिता अपिलकारास संस्थेचा विधी सल्लागार म्हणून नेमणूक केली. अध्यक्ष गुन्हेगारीदृष्टीने संस्थेचे काम करतात म्हणून त्यांचे विरुध्द कारवाई करावी. मालमत्ता कराच्या रुपाने संस्थेने मोठी रक्कम बृहन्मुंबई महापालिकेसव देणे बाकी असताना अध्यक्षांनी संस्थेची मोठी रक्कम हडप केली. सदर सहकारी गृहनिर्माण संस्थेला दिवाळखोरीपासून वाचविण्याकरिता केलेल्या कार्यवाहीची माहिती संस्थेतील शिपायास कोणतेही अधिकार नसताना तो शिपाई संस्था चालवितो. उघडउघडपणे अपिलकारास धमक्या देतो. पोलिसात गुन्हेगारी तक्रारी नोंदविल्या. संस्थेचा पत्रव्यवहार या शिपायाच्या सहीने करण्यात येतो. संस्थेच्या इमारतीची थर्ड ग्रेड दुरुस्ती करणे, पेंटींग करण्याकरिता मोठया रकमेची संस्थेला गरज असताना संस्था कोणाचाही सल्ला घेत नाही. यावरुन संस्थेच्या या बेकायदेशीर, मनमानी कारभाराबाबत चौकशी करण्याची अपिलकाराने दि. १९.६.२००६ च्या पत्रान्वये केलेल्या तक्रारीसंबंधी, केलेल्या कार्यवाहीची मुद्देनिहाय माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने दि.१४.९.२००६ रोजी सह निबंधक, सहकारी संस्था यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घेऊन आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ६.१२.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता चारकोप साकेत गृहनिर्माण संस्थेच्या अध्यक्षांच्या कारभाराबाबत अपिलकाराची मुख्य तक्रार आहे. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकाराच्या तक्रारी बाबत काय कारवाई केली हे जाणून घेऊन आदेश पारित करण्याकरिता सदर प्रकरणी दोन वेळा सुनावणी आयोजित केली. सुनावणीची नोटीस यु.पी.सी.ने पाठविली. परंतु दोन्ही वेळा अपिलकार, जन माहिती अधिकारी,

प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीकरिता हजर राहिले नाहीत. यावरुन अपिलकारास माहिती प्राप्त करुन घेण्यात स्वारस्य दिसून येत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-११/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/३९९/०२**

**श्री. कोंडया यल्लाय्या कोल्हापुरे, ------ अपीलकर्ता**
**रुम नं.११/बी, प्लॉट नं.२, सुलेमान मनीयार चाळ,**
**शंकर घाणेकर मार्ग, गोखले रोड दक्षिण,**
**दादर, मुंबई- ४०० ०२८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१. ------ उत्तरवादी**

**- <u>वि वे च न -</u>**

अपिलकार श्री. कोंडया यल्लाय्या कोल्हापुरे यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला, गृहनिर्माण भव-न, वांद्रे मुंबई यांचेकडे दि.२.२.२००७ रोजी अर्ज करुन माहिम विभागातील प्लॉट क्र.९७२, ९७३, ९७४, ९७५, ९७६ पुनर्रचना/ पुनर्बांधणी करण्यासाठी विकासकाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे सादर केलेल्या आराखडयाची साक्षांकित प्रत उपलब्ध करुन देण्याची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी मागितलेली माहिती दिली नसल्याने अपिलकाराने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल करण्याऐवजी राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.५.२००७ रोजी अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,गृहनिर्माण भवन, वांद्रे मुंबई श्री.डी.बी.पाटील हे हजर होते. अपिलकार श्री.कोल्हापूरे हे हजर नव्हते.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी सादर केलेली लेखी माहिती तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.कोंडया यल्लाप्या कोल्हापूरे यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे मुंबई यांचेकडे दि.०२.०२.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

" गोखले रोड (एस) शंकर घाणेकर मार्ग, दादर (प.), मुंबई येथील टी.एस.पी.४ माहिम विभागातील प्लॉट क्र.९७२, ९७३, ९७४, ९७५ आणि ९७६ बृहन्मुंबई विकास नियंत्रण अधिनियम क्र. ३३(७) किंवा ३३ (१०) अंतर्गत पुनर्बांधणीकरिता प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेची साक्षांकित प्रत. विकासकाने सादर केलेल्या आराखडयाची प्रस्तावातील प्रत. जर प्रस्ताव सादर केला असेल त्याबाबतची सद्यःस्थिती. मातोश्री रेलटोलर्स प्रा.लि.या विकासकाने प्रस्तावित ओम सिध्दी को.ऑप.हौसिंग सोसायटीच्या बांधकामाकरिता प्रस्ताव सादर केला आहे काय ? प्रस्ताव मंजूर करण्यात आले किंवा याबाबतची सद्यःस्थितीची माहिती मागितली. "

मागितलेली माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३.०० ते ५.३० या वेळेत कार्यालयात येऊन संबंधित कागदपत्रांची पहाणी करावी. त्यानंतर आवश्यक शुल्क आकारुन मागितलेली कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास दि.५.३.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. त्यानुसार अपिलकाराने कार्यालयातील कागदपत्रांची पाहणी केली किंवा कसे याबाबत अपिलात कागदपत्र उपलब्ध नसल्याने समजून येत नाही. अपिलकाराने दि.१७.५.२००७ च्या अपिलासोबत चलन क्र.११२९, दि. २० मार्च, २००७ सोबत जोडलेले आढळून येते. यावरुन अपिलकाराने सदर चलनानुसार माहितीसाठी महाराष्ट्र बँकेत रु.२९५/- इतक्या रकमेचा भरणा केलेला दिसतो.

वरील विवेचन लक्षात घेता मागितलेली माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता अपिलकाराने रु.२९५/- एवढी रक्कम महाराष्ट्र बँकेत भरुन चलनाची प्रत सादर केली. अपिलकारास पाहिजे असलेल्या माहितीपोटी एकूण रु.३२०/- एवढे शुल्क भरुन माहिती घेऊन जाणेबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास दि.७.८.२००८ च्या पत्रान्वये कळविलेले दिसते. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ (६)च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास फरकाच्या रकमेची मागणी न करता माहिती उपलब्ध करुन द्यावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-११/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/३०८/०२**

**श्री. सुधाकर तुकाराम साटम,** **------ अपीलकर्ता**
**साटम ऑप्टीक्स, ४८/दुकान नं.२ व ४,**
**वरळी,बी.डी.डी.चाळ, मुंबई- ४०० ०१८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक,**
**वरळी विकास विभाग चाळी यांचे कार्यालय,**
**चाळ क्र.५२, डॉ.जी.एम.भोसले मार्ग,**
**वरळी, मुंबई- ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक,**
**वरळी विकास विभाग चाळी यांचे कार्यालय,**
**चाळ क्र.५२, डॉ.जी.एम.भोसले मार्ग,**
**वरळी, मुंबई- ४०० ०१८.** **------ उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री.सुधाकर तुकाराम साटम, यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, वरळी विकास विभाग चाळी यांचे कार्यालय, वरळी, मुंबई यांचेकडे दि.२३.१०.२००६ रोजी अर्ज करुन बी.डी.डी.चाळीमधील निवासी खोल्या १ मार्च,१९९५ ते सप्टेंबर,२००६ दरम्यान व्यापारी गाळयामध्ये रुपांतरित केल्यासंबंधीची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक, वरळी विकास विभाग चाळी यांचे कार्यालय, वरळी, मुंबई यांचेकडे दि.२०.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्री.सी.बी.पाटील, वरळी विकास विभाग हे हजर होते. अपिलकार श्री.सुधाकर साटम हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.सुधाकर साटम यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, वरळी विकास विभाग चाळी यांचेकडे दि.२३.१०.२००६ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

(१) बी.डी.डी.चाळीमध्ये १९९५ पूर्वी ज्या खोल्या व्यापारी होत्या त्यांची सविस्तर यादी. गाळेधारकाचे नांव, बिल्डिंग क्रमांक, खोली क्रमांक व धंद्याचे स्वरुप.

(२) निवासी खोल्या पाडून व्यापारासाठी शटर लावण्याची वेदरशेडची परवानगी किती जणांना देण्यात आली व देताना कोणते निकष लावणत आले याची व खोल्यांची माहिती. गाळेधारकाचे नांव, बिल्डिंग क्रमांक, खोली क्रमांक, पूर्वीचे भाडे व सद्याचे भाडे, पूर्वीचा धंदा व सध्याचा धंदा.

(३) दिनांक ३० सप्टेंबर,२००६ पर्यंत निवासी जागा व्यापारासाठी करण्याची किती प्रकरणे प्रलंबित आहेत व का ?

(४) दिनांक३० सप्टेंबर,२००६ पर्यंत किती निवासी गाळे व्यापारासाठी वापरले जातात त्यांचे बिल्डिंग क्रमांक, खोली क्रमांक व सध्या आकारात असलेले भाडे.

जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता सन १९९५ ते ३०.९.२००६ पर्यंतची मागितलेली माहिती फार मोठया प्रमाणात आहे. अपिलकारास सदर माहिती देण्यास कांही कालावधी लागणार असल्याचा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी युक्तिवाद केला. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागितलेली माहिती प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तीन महिन्यांच्या आंत द्यावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-११/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६२२/०२**

**श्री. अशोक दिवान,** **------ अपीलकर्ता**
**पार्क व्हयू, फ्लॅट लं.३/३१५ पारी रोड,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०६१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई.** **------ उत्तरवादी**

**- <u>वि वे च न -</u>**

अपिलकार श्री. अशोक दिवान, यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगपालिका, अंधेरी यांचेकडे दि.३१.१.२००७ रोजी अर्ज सादर करुन सेनसेशनल/ मानसी उपहारगृहाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिल्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगपालिका यांचेकडे अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील विहित कालावधीत दाखल करणे आवश्यक होते. परंतु तसे न करता अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (१) चा उल्लेख करुन दि.३०.४.२००७ रोजी अपील केले. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करता येते. अपिलकाराने दाखल केलेल्या अपिलाचा कालावधी लक्षात घेऊन दि.१२.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच अपिलकार श्री.अशोक दिवान हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.अशोक दिवान यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचेकडे दि.३१.१.२००७ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली.

(१) सेनसेशनल/ मानसी उपहारगृहाबाबत अपिलकाराने त्यांचे वकील श्री.अनिल गवसमार्फत दि.४.१२.२००६ रोजी वैद्यकीय आरोग्य अधिका-यांकडे केलेल्या तक्रारीवर काय कार्यवाही करण्यांत आली.

(२) सेनसेशनल/ मानसी उपहारगृहाचा परवाना नुतनीकरण करु नये, परवाना मंजूर करु नये.

(३) सेनसेशनल/ मानसी उपहारगृहास दिलेला परवाना काढून घ्यावा. उपहारगृह चालविण्यासाठी परवान्याचे नुतनीकरण करु नये याबाबत काय कार्यवाही करण्यात आली.

अपिलकाराने मागितलेल्या माहितीबाबत विधी अधिका-याचा (Legal Officer) नव्याने सल्ला घेण्यात येत आहे. त्यानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल असे जन माहिती अधिका-याने अपिलकारास दि.२०.२.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपिलकाराचे समाधान झाले नाही. त्यामुळे अपिलकाराने अधिनियमातील विहित तरतुदीचा अवलंब न करता राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले असे दिसते.

वरील विवेचन लक्षात घेता अपिलकार श्री.अशोक दिवान यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप प्रश्नोत्तर स्वरुपाचे दिसते. अपिलकाराने मागितलेल्या माहितीबाबत विधी अधिकारी यांचा नव्याने सल्ला घेण्यात येत असून, त्यानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी दि.२०.२.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. त्यानंतर रु.३०/-एवढे शुल्क आकारुन अपिलकारास माहिती दिली असल्याचे दि.२२.२.२००७ च्या जन माहिती अधिका-यांच्या पत्रावरुन दिसून येते. परंतु जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दिलेल्या माहितीच्या प्रती अपिलातील कागदपत्रावर नसल्याने दिलेली माहिती परिपूर्ण आहे किंवा कसे याची पडताळणी करता आली नाही. शहरी दिवाणी न्यायालयातील फिर्याद क्र.५८३६/१९९७, दि.२५.१.१९९९ व फिर्याद क्र. २३५१/२०००, दि.३.२.२००३ रोजी फिर्यादीने मागे घेतली असल्याचे विधी अधिकारी, बृहन्मुंबई यांच्या दिनांक १०.१०.२००६ च्या पत्रावरुन दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६२३/०२**

**श्री. अशोक दिवान,** **------ अपीलकर्ता**
**पार्क व्हयू, फ्लॅट लं.३/३१५ पारी रोड,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०६१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,**
**इमारत प्रस्ताव विभाग,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**वांद्रे (प.), मुंबई -४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,**
**इमारत प्रस्ताव विभाग,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**वांद्रे (प.), मुंबई -४०० ०५०.** **------ उत्तरवादी**

## - <u>वि वे च न -</u>

अपिलकार श्री. अशोक दिवान, यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता (इमारती व कारखाने), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे दि.१३.३.२००७ रोजी अर्ज करुन सिटी सर्व्हे क्र.२२३ चकाला अंधेरी येथील सेनसेशनल/ मानसी उपहारगृहाचे अनधिकृत बांधकाम शहरी दिवाणी न्यायालयात फिर्याद क्र.५८३६/१९९७ प्रलंबित असतांना नियमित करण्यात आल्याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता प्रथम कागदपत्रांची तपासणी करावी. त्यानुसार फोटो प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील असे जन माहिती अधिका-याने अपिलकारास दि.१७.३.२००७ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-याने माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने अधिनियमातील तरतुदीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (इमारती व कारखाने) प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल करणे आवश्यक होते. परंतु तसे न करता अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले. अपिलकाराने दाखल केलेल्या अपिलाचा कालावधी लक्षात घेऊन सदर अपिलावर दिनांक १२.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका श्री.व्ही.एल.जोशी तसेच अपिलकार श्री. अशोक दिवान हे हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.अशोक दिवाण यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता (इ.व का.) बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे दि.१३.३.२००७ रोजी अर्ज करुन सेनसेशनल/ मानसी उपहारगृहाच्या अनधिकृत बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकारास हवी असलेली माहिती देणे सुलभ व्हावे म्हणून कागदपत्रांची तपासणी करावी व त्यानंतर आवश्यकतेनुसार कागदपत्रांच्या फोटो प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील असे जन माहिती अधिका-याने अपिलकारास दि. १७.३.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.४.२००७ रोजी अपील केले.

वरील विवेचन लक्षात घेता अपिलकाराने सेनसेशनल/ मानसी उपहारगृहाच्या अनधिकृत बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. कागदपत्रांची तपासणी करुन आवश्यक कागदपत्रांच्या फोटोप्रती प्राप्त करुन घेण्याबाबत अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.१७.३.२००८ च्या पत्रान्वये कळविले. परंतु त्यानुसार अपिलकार कागदपत्रांची तपासणी करण्याकरिता कार्यालयात उपस्थित राहिल्याचे अपिलातील कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास तपासणीकरिता कागदपत्र उपलब्ध करुन द्यावीत. त्यानंतर अपिलकाराच्या मागणीप्रमाणे कार्यालयात उपलब्ध कागदपत्रांच्या फोटो प्रती अपिलकारास द्याव्यात. अपिलकाराने कागदपत्रांची तपासणी करण्याकरिता जन माहिती अधिका-यांच्या कार्यालयात उपस्थित रहावे व तपासणी करुन उपलब्ध कागदपत्रांच्या फोटो प्रती प्राप्त करुन घ्याव्यात.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६२४/०२**

**श्री. अशोक गुलाटी,** **------ अपीलकर्ता**
**जीवा देवशी इमारत, तळमजला क्र.७ व ८,**
**रानडे रोड पोस्ट ऑफीसच्या मागे,**
**दादर, मुंबई- ४०० ०२८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप महापालिका आयुक्त,**
**झोन II एफ/साऊथ वॉर्ड कार्यालय,**
**डॉ.आंबेडकर मार्ग, परेल, मुंबई -४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक महापालिका आयुक्त,**
**जी/ नॉर्थ वॉर्ड, हरिश्चंद्र येवले मार्ग,**
**दादर, मुंबई -४०० ०२८.** **------ उत्तरवादी**

## - <u>वि वे च न -</u>

अपिलकार श्री. अशोक गुलाटी, यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इमारती प्रस्ताव (शहरी)- III ई वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका भायखळा, मुंबई यांचेकडे दि.९.४.२००७ व दि.१२.४.२००७ रोजी अर्ज करुन प्लॉट क्र.६१, टी.पी.एस.-४, माहिम विभाग येथील इमारत बांधकामाचा मूळ आराखडा उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिका-याने दि. २१.५.२००७ रोजी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने सहायक महापालिका आयुक्त, जी/उत्तर विभाग, दादर, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-याने माहिती दिली नसल्याने अपिलकाराने दि. २५.५.२००७ रोजी माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १२.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी यांच्या वतीने सहायक अभियंता (इ.व का.) जी/उत्तर विभाग हे हजर होते. सुनावणीची नोटीस यु.पी.सी. ने दि. २२.७.२००८ रोजी पाठवूनही अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांनी केलेले प्रतिपादन व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.अशोक गुलाटी यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ई वॉर्ड, भायखळा, मुंबई यांचेकडे दि.९.४.२००७ व दि.१२.४.२००७ रोजी अर्ज करुन, टी.पी.एस.-४, माहिम विभागच्या प्लॉट क्र.६१ वरील इमारत बांधकामाचा १९४५ पूर्वीचा मूळ आराखडा, त्यानंतर इमारतीच्या बांधकाम आराखडयात तसेच सांडपाण्याच्या व्यवस्थेत काही बदल करुन इमारतीचे बांधकाम करण्यात आले किंवा कसे याबाबत माहिती मागितली होती.

अपिलकाराने इमारत बांधकामाची सन १९४५ पूर्वीचा मूळ आराखडा मागितला. अपिलकाराने मागितलेली माहिती सन १९४५ पूर्वीची असल्याने कार्यालयात सन १९४५ पूर्वीची कागदपत्र उपलब्ध नाहीत. त्यामुळे मागणी केलेली माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२१.५.२००७ च्या पत्रान्वये कळविले.

वरील विवेचन लक्षात घेता अपिलकाराने माहिम विभागातील टी.पी.एस.च्या प्लॉट क्र.६१ वरील इमारत बांधकामाचा सन १९४५ पूवीच्या मूळ आराखडयाची (Original Plan) मागणी केली. कार्यालयात सन १९४५ पूर्वीची कागदपत्रे उपलब्ध नसल्याने जन माहिती अधिका-याने अपिलकाराची मागणी नाकारली. यावरुन मागणी केलेली माहिती उपलब्ध करणे जन माहिती अधिका-याच्या Beyond Control असल्याचे दिसते. तेव्हा या प्रकरणी अपिलकारास दि. २१.५.२००७ च्या पत्रान्वये दिलेले उत्तर योग्य वाटते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील फेटाळण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६२८/०२**

**श्रीमती नलिनी अच्युत भांडारकर,** **------ अपीलकर्ता**
**४०३, समुद्र मंथन सहकारी गृहनिर्माण संस्था,**
**१६१/ब/१, जुहू वर्सोवा लिंक रोड,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहकार आयुक्त व**
**निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, म.रा.**
**नवीन मध्यवर्ती इमारती, पुणे-१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था,**
**के/पश्चिम विभाग, मुंबई उपनगरे,**
**गृहनिर्माण भवन, तळमजला, कक्ष क्र.६९ (अे),**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------ उत्तरवादी**

**- <u>वि वे च न -</u>**

अपिलकार श्रीमती नलिनी अच्युत भांडारकर यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, मुंबई उपनगरे, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांचेकडे दि.५.१२.२००६ रोजी अर्ज करुन समुद्र मंथन सहकारी गृहनिर्माण संस्था, अंधेरी, मुंबईबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती नाकारली. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे यांचेकडे दि.२१.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी आयोजित करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१३.४.२००७ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१२.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, मुंबई श्री. प्रसाद ओक तसेच अपिलकार श्रीमती नलिनी भांडारकर हया हजर होत्या.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्रीमती नलिनी भांडारकर यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, यांचेकडे दि.५.१२.२००६ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली.

(१) सहकारी गृहनिर्माण संस्थेतील ज्या व्यक्तिचे सभासदत्व वादग्रस्त असते आणि त्याबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ट असून निर्णयाच्या प्रतिक्षेत असेल अशी व्यक्ती अधिकृत सभासद आहे का ? आणि अशा व्यक्तिला संस्थेच्या कार्यकारिणीच्या अध्यक्ष पदावर नियुक्त करता येते का ?

(२) संस्थेच्या इमारतीतील वादग्रस्त, न्यायप्रविष्ट सदनिकेचे हस्तांतरण, विक्री किंवा भाडयाने देणरे इ. व्यवहारावर न्यायालयाचा स्थगिती आदेश असताना अशी वादग्रस्त सदनिका भाडयाने देता येते का ? किंवा अशा सदनिकेची बाजारभावाने विक्री करता येते का ? व या व्यवहारासाठी पॉवर ऑफ ॲटर्नीचा उपयोग करता येतो का ?

(३) सहकारी गृहनिर्माण संस्थेतील न्यायप्रविष्ठ प्रकरणी सदनिका भाडयाने दिली किंवा विकली तर त्याची माहिती उपनिबंधकांना कळविण्याची व संस्थेच्या स्तरावर कायदेशीर कारवाई करण्याची जबाबदारी कार्यकारिणीच्या पदाधिका-यांची असते किंवा नसते ? अशावेळी कार्यकारिणीला संबंधितांवर कोणती कारवाई करता येईल ?

(४) कार्यकारिणीच्या अध्यक्ष पदावर असलेल्या व्यक्तिला स्वतःच्या वैयक्तिक वादग्रस्त सभासदत्वाचा न्यायालयीन खटला लढविण्यासाठी संस्थेला गुंतवून अधिकृत सभासदांनी संस्थेच्या खात्यावर जमा केलेल्या मासिक मेंटेनन्सच्या रकमेचा वापर करता येतो का ?

(५) शासकीय गृहनिर्माण योजनेतून मिळालेल्या सदनिकेचा उपयोग स्वतःच्या परिवाराला रहाण्यासाठी करण्याची अट असते त्या अटीचा भंग करुन शासकीय योजनेतील सदनिका भाडयाने देवून स्वतः इतरत्र रहात असलेल्या मूळ सभासदाने त्याच्या भाडेकरुला पॉवर ऑफ ॲटर्नी दिली म्हणून त्या भाडेकरुला संस्थेच्या पंचवार्षिक कार्यकारिणीमध्ये को-ऑप्ट करुन घेता येते का ?

(६) ज्या संस्थेच्या कार्यकारिणीवरील पाच पदाधिका-यांपैकी दोघांच्या सभासदत्वाचा वाद न्यायप्रविष्ठ आहे, एक पदाधिकारी पोटभाडोत्री आहे आणि दोन अधिकृत सभासद आहेत, अशी कार्यकारिणी अधिकृत आहे की अनधिकृत आहे ?

वरील प्रश्नांची उत्तरे सहकार कायद्यानुसार माहितीच्या स्वरुपात अपेक्षित असून, त्याबाबत कोणती कारवाई होऊ शकेल ? कोणत्या खात्यातर्फे याचे मार्गदर्शन आणि त्यासंबंधीचे जी.आर.इत्यादीची सविस्तर माहिती देण्याची अपिलकाराने विनंती केली.

अपिलकार यांनी मागणी केलेली माहिती प्रश्नावलीच्या स्वरुपात असल्याने सदरची माहिती माहितीच्या अधिकारांतर्गत नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२५.१.२००७ रोजी कळविले. यामुळे अपिलकाराने सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे यांचेकडे दि.२१.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी घेण्याबाबत शासकीय माहिती अधिकारी, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.मिलिंद टांकसाळे यांनी शासकीय माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई शहर-३, मुंबई यांना दि.१३.३.२००७ च्या पत्रान्वये कळविले. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (३), मुंबई यांनी दि.५.४.२००७ रोजी सुनावणी आयोजित करुन दि.१३.४.२००७ रोजी आदेश पारित केले. अपिलकार यांनी मागितलेली माहिती प्रश्नात्तर स्वरुपात असून, सदरची माहिती ही उपनिबंधक, के/पश्चिम विभाग, मुंबई या कार्यालयाच्या अभिलेख कक्षेमध्ये किंवा त्यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नाही. समुचित संस्थेस शासनाद्वारे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष भरीव अर्थसहाय्य नसल्याने तिचा " शासकीय प्राधिकरण " यामध्ये समावेश होत नाही. अशी भूमिका घेऊन प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकाराचे प्रथम अपील फेटाळले.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ (एफ) व (जे) येथे माहितीची व्याख्या स्पष्ट केली आहे. अपिलकाराने मागितलेल्या माहितीचे प्रश्नोत्तर स्वरुप लक्षात घेता सदर व्याख्येत मोडत नाही असा जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी काढलेला निष्कर्ष योग्य वाटतो. अपिलकाराने मागितलेली माहिती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमानुसार तपासून सदर अधिनियमाशी संबंधित तज्ञाच्या सल्ल्याने माहिती देणे आवश्यक दिसते. तरी याप्रमाणे तपासणी करुन सहकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अपिलकारास माहिती द्यावी अशी आयोगाची शिफारस आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६२९/०२**

**श्रीमती हेमलता डी. धनवानी,**
**फ्लॅट नं.१०४,वर्सोवा सी ग्रीन प्रिमायसेस को.ऑप.हौ.सो.लि.**
**रहेजा कॉम्प्लेक्स, सेव्हन बंगल्यासमोर,**
**वर्सोवा,अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०६१.** ------ अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी,**
**के/पश्चिम वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एस.व्ही.रोड, अंधेरी (प.),मुंबई-४०० ०५३.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक महापालिका आयुक्त,**
**के/पश्चिम वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**बेस्ट डेपोसमोर,एस.व्ही.रोड,**
**अंधेरी (प.),मुंबई-४०० ०५३.** **------ उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्रीमती हेमलता डी.धनवानी वैद्यकीय आरोग्य अधिकारी, के/पश्चिम विभाग यांचेकडे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये दि.१४.२.२००७ रोजी अर्ज करुन स्टमक II उपहारगृहास दिलेल्या लायसन बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि.१२.३.२००७ च्या पत्रान्वये दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, के/पश्चिम विभाग,अंधेरी, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे दि.१७.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घेतली नाही, माहिती दिली नाही. या कारणास्तव अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१४ मे,२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त,के/पश्चिम विभाग, श्री.अ.शा.खोजे, जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी, के/पश्चिम विभाग, डॉ.र.प्र.डेंगळे हे हजर होते. सुनावणीची नोटीस दि.२२.७.२००८ रोजी यु.पी.सी.ने पाठवूनही अपिलकार सुनावणीकरिता हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्रीमती हेमलता धनवानी यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचेकडे दि.१४.२.२००७ रोजी अर्ज करुन अंधेरी (प.) सेव्हन बंगलो समोरील प्लॉट क्र.२६ वरील रहेजा कॉम्प्लेक्स मधील वर्सोवा सी ग्रीन प्रिमायसेस को.ऑप.हौ.सो.लि.मधील दुकान क्र.७,८,९ स्टमक-२ उपहारगृहा साठी दिलेल्या लायसेन्सबाबत अनुषंगिक एकूण २५ मुद्दयांची प्रश्नात्तर स्वरुपाची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास दि.१२.३.२००७ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती आवश्यक शुल्क भरुन घेणेबाबत कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, के/पश्चिम विभाग यांचेकडे दि.१७.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलकाराने मागितलेली माहिती दि.१२.३.२००७ च्या पत्रान्वये दिली असल्याचे नमूद करुन माहितीपोटी आवश्यक शुल्काचा भरणा करावा. कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ९.०० ते दुपारी १.०० या वेळेत कार्यालयात येऊन संबंधित उपहारगृहाच्या लायसन्सची प्रत प्राप्त करुन घ्यावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दि.१३.४.२००७ च्या पत्रान्वये कळविले.

वरील विवेचन लक्षात घेता अपिलकाराने दि.१४.२.२००७ च्या पत्रान्वये मागितलेली माहिती जन माहिती अधिका-याने दि.१२.३.२००७ च्या पत्रान्वये दिली असल्याचे दिसते. सदर माहितीचे अवलोकन केले असता एकूण २५ मुद्दयांपैकी काही माहिती विविध जन माहिती अधिकारी यांचेशी संबंधित दिसते. सदर माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता अपिलकाराने विहित शुल्क भरुन संबंधित अधिका-यांशी संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घ्यावयाची आहे हे स्पष्ट होते. यावरुन अपिलकारास माहिती देण्यात जन माहिती अधिका-यांकडून कुचराई झाल्याचे दिसून येत नाही. या प्रकरणी जन माहिती अधिका-याने दिलेले उत्तर समर्पक असून, प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या उत्तरात काही बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील फेटाळण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६३०/०२**

**श्री.गणेश विठ्ठल देवमाने,,**
**१२१-B-७, हलिमा व्हीला,**
**वाकोला मशीद,पं.जवाहरलाल नेहरु रोड,**
**सांताक्रूझ (पू.), मुंबई- ४०० ०५५.** **------ अपीलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक (सेवा व प्रकल्प),**
**महापालिका मुख्य कार्यालय, विस्तारित इमारत,**
**३ रा मजला, महापालिका मार्ग,मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अभियंता,**
**इमारत प्रस्ताव (शहर) वॉर्ड,**
**भायखळा, मुंबई-४०० ००८.** **------ उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री.गणेश विठ्ठल देवमाने यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (इमारती व प्रकल्प),डी वॉर्ड,बृहन्मुंबई महानगरपालिका, भायखळा, मुंबई यांचेकडे दि.१३.४.२००६ रोजी अर्ज करुन सारनाथ को.ऑप.हौ.सोसायटीची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक (सेवा व प्रकल्प) यांचेकडे दि.२३.६.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दिलेल्या उत्तराने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१२.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अभियंता यांचेवतीने कार्यकारी अभियंता (इ.प्र.) श्री.श्रीनिवास शिंत्रे, प्रथम अपिलीय

अधिका-यांच्या वतीने उप प्रकल्प अधिकारी (इ.व प्र.) श्री.सस्ते हजर होते. सुनावणीची नोटीस दि.२२.७.२००८ रोजी यु.पी.सी.ने पाठवूनही अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.गणेश वि.देवमाने यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (इमारती व प्रकल्प),बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे दि.१३.४.२००६ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

" भूलाभाई देसाई रोडवरील जे.के.अपार्टमेंट, रेमंड शॉप,जे.के.हाऊस, जे.के.स्टाफ क्वार्टर्स, सारनाथ सोसायटी, अे आणि बी ब्लॉक वार्डन विभागासंबंधीची फाईल क्र.ईबी/६२४१/अे एस सी क्र.७६४ च्या फाईवरील मान्यता, मंजूर आराखडा (plan), आयओडी, इ. माहिती मागितली होती. " संबंधित फाईलचा दक्षतेने/ मेहनतीने जाणिवपूर्वक शोध घेतला असता संबंधित फाईल सापडत नसल्याने अपिलकारास मागितलेली माहिती देता येत नाही. अपिलकाराने मागितलेल्या माहिती संबंधीच्या फाईलचा शोध घेण्याकरिता काही कालावधी लागणार आहे. फाईलचा शोध लागेल तेव्हा अपिलकारास कळविण्यांत येईल व मागणी केलेली माहिती देण्यात येईल. म्हणून अपिलकाराचा माहितीच्या अधिकाराचा अर्ज निकालात काढण्यात येत असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास दि.१२.६.२००६ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक (अभियंता सेवा व प्रकल्प) यांचेकडे दि.२३.६.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले.

जन माहिती अधिका-याने अपिलकारास दि.१२.६.२००६ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन जन माहिती अधिका-यांनी पुन्हा संबंधित फाईलचा मेहनतीने शोध घ्यावा. याबाबत अपिलकारास दोन आठवडयात अवगत करावे. फाईल उपलब्ध झाल्यास विहित शुल्क आकारुन आवश्यक कागदपत्रांच्या प्रती अपिलकारास द्याव्यात अशा प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना सूना दिल्या व तसे अपिलकारास कळविले. मागितलेली माहिती अद्याप उपलब्ध करुन दिलेली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता अपिलकाराने दि.१३.४.२००७ च्या पत्रान्वये मागितलेली सारनाथ सोसायटी, जे.के.स्टाफ क्वार्टर्स, जे.के.हाऊस, रेमंड शॉप, जे.के.अपार्टमेंट्स संबंधीची माहिती जवळजवळ २० वर्षापूर्वीची जुनी माहिती असल्याने संबंधित फाईल शोधूनही सापडत नाही. संबंधित फाईल सापडल्यानंतर अपिलकारास माहिती देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकारास कळवून त्यांचा माहितीचा/ प्रथम अपिलीय अर्ज निकालात काढला. त्यानंतर अपिलकारास कांहीही कळविण्यांत आलेले नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपिलकारास मागणीप्रमाणे जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६३१/०२**

**श्री. रफिक बाबू मुलानी,** **------ अपीलकर्ता**
**रुम नं.५०१, ५ वा मजला,**
**शांतीनगर को.ऑप.हौसिंग सो.लि.**
**गॅरेज गल्ली, टिळक भवन जवळ,**
**एस.बी.मार्ग, मुंबई- ४०० ०२८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.** **------ उत्तरवादी**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. रफिक बाबू मुलानी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मुंबई यांचेकडे दि.३०.१२.२००६ रोजी अर्ज करुन श्री.मोहन धोत्रे, कल्याण आयुक्त यांच्याविरुध्द केलेल्या चौकशी अहवालाच्या प्रतींची मागणी केली. जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारली. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मुंबई यांचेकडे दि.३१.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१६.४.२००७ रोजी पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.९.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१३.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, श्री.चं.श.गोसावी, जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, श्रीमती शैलजा शिरोडकर हजर होत्या. सुनावणीची नोटीस दि.२१.७.२००८ रोजी यु.पी.सी.ने पाठवूनही अपिलकार सुनावणीकरिता हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी यांनी केलेले प्रतिपादन व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री. रफिक बाबू मुलानी यांनी माहितीच्या अधिकारात दि.३०.१२.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, यांचेकडे अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

" श्रीमती पद्मा म्हात्रे, कनिष्ठ लिपिक यांनी कल्याण आयुक्त श्री. मोहन धोत्रे यांच्या विरुध्द केलेल्या तक्रारीची श्रीमती संजीवनी कुट्टी, प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य तथा चौकशी अधिकारी यांनी चौकशी पूर्ण केली असून अहवाल शासनाला सादर केलेला आहे. त्या चौकशी अहवालाची प्रत कृपया देण्यांत यावी. "

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८ (१), (ज), (झ), (स) या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी दि.२४.१.२००७ च्या पत्रानुसार माहिती नाकारण्यात येत असल्याचे अपिलकारास कळविले. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, यांचेकडे दि.३१.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २७.२.२००७ रोजी सुनावणी आयोजित करुन दि. १६.४.२००७ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती देण्यास नकार दिला त्याचे समर्थन करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकाराने दि. ३१.१.२००७ चे अपील फेटाळले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे समर्पक व नियमानुसार असल्याने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील अमान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१३/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६३५/०२**

**श्री. विश्वास विलासराव वायचळ, ------ अपीलकर्ता**
**५०१, पदव्युत्तर वसतीगृह,**
**आर.ए. पोद्दार रुग्णालय,**
**वरळी, मुंबई- ४०० ०१८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता,**
**आर.ए. पोद्दार मेडीकल कॉलेज (आयुर्वेदिक)**
**वरळी, मुंबई- ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,**
**आर.ए. पोद्दार मेडीकल कॉलेज (आयुर्वेदिक)**
**वरळी, मुंबई- ४०० ०१८. ------ उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. विश्वास विलासराव वायचळ, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, आर.ए. पोद्दार मेडीकल कॉलेज (आयुर्वेदिक) वरळी, मुंबई यांचेकडे दि. २८.२.२००७ रोजी अर्ज करुन आवक /जावक कामाच्या कार्यपध्दतीसंबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि.३०.३.२००७ च्या पत्रान्वये दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने दि.५.४.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, आर.ए. पोद्दार मेडीकल कॉलेज आयुर्वेदिक)वरळी, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.११.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१३.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, रा.आ.पोद्दार वैद्यक महाविद्यलाय, डॉ.पी.यु.देशमुख, जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, रा.आ.पोद्दार वैद्यक महाविद्यलाय, श्री.एच. व्ही. वाडले हे हजर होते. सुनावणीची नोटीस दि.२१.७.२००८ रोजी यु.पी.सी.ने पाठवूनही अपिलकार श्री.विश्वास वायचळ हे सुनावणीसाठी उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवैळी प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री. विश्वास वायचळ यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांचेकडे दि.२८.२.२००७ रोजी अर्ज करुन एकूण १३ मुद्दयांबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि. ३० मार्च,२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. त्यामध्ये मुद्दा क्र.२, ३६, ८, ११, १२ व १३ अनुसार कॉलेज मधील अन्य विद्यार्थ्यांशी संबंधित अपिलकाराने माहिती मागितली. अपिलकाराने मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाची असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ११ अनुसार माहिती नाकारण्यात आली. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता यांचेकडे दि. ५.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. मुद्दा क्र.५ बाबतची माहिती, चौकशी पूर्ण झाल्यानंतर देण्यांत येईल. अन्य सर्व मुद्दयांची माहिती प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ३०.३.२००७ च्या पत्रान्वये कळविली आहे असे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकारास दि. २७.४.२००७ च्या पत्रान्वये कळविले.

द्वितीय अपिलाच्या सुनावणीचेवेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी लेखी निवेदन सादर केले. त्यानुसार अपिलकाराने दि. १३.६.२००५, २६.६.२००६, १६.८.२००६ व ११.१०.२००६ रोजी सादर केलेल्या अर्जावर चौकशी पूर्ण झाली असून, याबाबत अपिलकारास दि. ३.३.२००८ च्या पत्रान्वये माहिती कळविण्यांत आली. तसेच, अपिलकाराच्या दि. २८.२.२००७ च्या अर्जातील मुद्दा क्र. ७, ९, १० बाबतची माहिती वैद्यकीय अधिकारी यांनी अपिलकारास दिली. यावरुन अपिलकारास जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्यात कुचराई केल्याचे आढळून येत नाही. अपिलकार दि. १३.८.२००८ रोजी सुनावणीकरिता हजर नव्हते. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढयांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१३/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६२५/०२**

**श्री. व्रजलाल एन. राठोड,** **------ अपीलकर्ता**
**१० बी, II आराम नगर, वर्सोवा रोड,**
**अंधेरी, मुंबई- ४०० ०६१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य अधिकारी/ EM II,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------ उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. व्रजलाल एन.राठोड, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक -२, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे, मुंबई यांचेकडे दि. ३.१.२००७ व दि. २२.३.२००७ रोजी अर्ज करुन आराम नगर विभाग १ व २, वर्सोवा, अंधेरी, मुंबई येथील अपिलकाराला गाळा हस्तांतरण करण्याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि.२६.२.२००७ रोजी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी (मिव्य-२) तथा अपील अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे, मुंबई यांचेकडे दि.२८.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २.४.२००७ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १२.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीची नोटीस दि.२२.७.२००८ रोजी यु.पी.सी.ने पाठवूनही जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार सुनावणीस हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री. व्रजलाल राठोड यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक -२, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे, मुंबई यांचेकडे दि. ३.१.२००७ व दि. २२.३.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

(१) आरामनगर, विभाग-२, जे.पी.रोड वर्सोवा, अंधेरी, मुंबई येथील अपिलकाराचा गाळा हस्तांतरण करण्यासाठी किती कालावधी लागणार,

(२) आरामनगर मधील विभाग-१ व २ मधील किती गाळे दि.१ जून, २००३ ते दि. ३१.१२.२००६ या कालावधीत हस्तांतरित करण्यांत आले,

आरामनगर मधील विभाग-१ व २ वर्सोवा, अधेरी संबंधीच्या पुनर्विकासासाठी आरामनगर गाळेधारक असोसिएशन यांनी प्रस्ताव सादर केला होता. त्यास प्राधिकरणाने दि. ४.१.२००७ रोजी अटी व शर्तीनुसार मंजुरी दिली. ही बाब धोरणात्मक असल्याने प्राधिकरणाचे धोरण निश्चित झाल्यानंतर गाळे हस्तांतरण/ नियमितीकरण करण्याचा यथायोग्य विचार केला जाईल. तत्कालिन मा. उपाध्यक्ष यांचे मौखिक सुचनेनुसार आरामनगर विभाग १ व २ वर्सोवा, अंधेरी येथील गाळे हस्तांतरण व नियमितीकरण करण्याची प्रक्रिया बंद ठेवण्यात आली. सदरची प्रक्रिया पुनःश्च केव्हा पासून चालू होईल किंवा त्यास किती कालावधी लागेल हे वरिष्ठ पातळीवर जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंतचा कालावधी सांगणे शक्य नाही, असे अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी उत्तर देऊन, आरामनगर विभाग १ व २ मधील गाळे दि. १.६.२००३ ते ३१.१२.२००६ या कालावधीत नियमित / हस्तांतरित केल्याची एकूण ६१ लोकांची यादी अपिलकारास दिली.

जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने व्यथित होऊन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी यांचेकडे दि. २८.२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२८.३.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलकार सुनावणीकरिता हजर होते. अपिलकाराचा हस्तांतरणाचा अर्ज २००३ या वर्षीचा आहे. याबाबत अपिलकार यांनी मिळकत व्यवस्थापक-२ यांचेकडे दि. २०.३.२००७ रोजी पुन्हा माहिती अधिकारांतर्गत अर्ज दिला आहे. इतरांचे गाळे हस्तांतरण होत असताना अपिलकाराचा गाळा का हस्तांतरण केला जात नाही याची माहिती द्यावी असे प्रथम अपिलाच्या सुनावणीचेवेळी अपिलकाराने युक्तिवाद केला. कायद्यातील तरतुदी व म्हाडाच्या परिपत्रकानुसार गाळे हस्तांतरणाबाबत सविस्तर उत्तर अपिलकारास १५ दिवसांचे आंत दयावे असे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २.४.२००७ रोजी आदेश पारित केले.

वरील विवेचन तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास दिलेल्या एकूण ६१ गाळे हस्तांतरणाची यादी लक्षात घेता " इतरांचे गाळे हस्तांतरित होतात. अपिलकाराचा गाळा का हस्तांतरित केला जात नाही " हा

अपिलकाराचा मुद्दा रास्त वाटतो. याबाबत ही धोरणात्मक बाब आहे. तत्कालिन उपाध्यक्षांनी मौखिकरित्या दिलेल्या सुचनानुसार विभाग १ व २ चे गाळे हस्तांतरणाचे काम बंद ठेवले आहे. ते केव्हा चालू होईल हे सांगता येत नाही अशी जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास उडवाउडवीची उत्तरे दिलेली दिसतात. गाळे हस्तांतरणाचे काम बंद ठेवले असेल तर इतर ६१ लोकांचे गाळे कसे हस्तांतरित करण्यात आले. या उत्तरात विसंगती आढळून येते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनीही अपिलकाराच्या मुख्य मुद्दयास बगल दिलेली दिसते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, आराम नगर विभाग १ व २ मधील इतरांचे ६१ गाळे हस्तांतरित/ नियमित करण्यात आले असतांना अपिलकाराच्या गाळा हस्तांतरणाबाबतच्या मागणीबाबत अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-२ यांनी माहिती द्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६३६/०२**

**श्री. दिलीप मुरलीधर गांगुर्डे,** **------ अपीलकर्ता**
**द्वारा-सोहनसिंग कोहली प्रतिष्ठान,२९ च्या बाजूला,**
**क.दा.गायकवाड नगर, रावळी कॅम्प,**
**सायन कोळीवाडा, मुंबई- ४०० ०२२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहमुख्य अधिकारी,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन. वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन. वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. दिलीप मुरलीधर गांगुर्डे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांचेकडे दि. १२.११.२००६, ४.१.२००७ व दि. १२.१.२००७ रोजी अर्ज करुन सायन प्रतिक्षा नगर संक्रमण शिबीर येथील अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश पारित करुनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१३.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता सहायक माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक, संक्रमण शिबीर दुरुस्ती व पुनर्रचना, मुंबई तसेच अपिलीकार श्री.दिलीप गागुंर्डे हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.दिलीप गांगुर्डे यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांचेकडे अर्ज करुन सायन प्रतिक्षानगर संक्रमण शिबीरातील घुसखोरांविरुध्द नोंदविण्यात आलेल्या एफ.आय.आर.ची प्रत, घुसखोरांकडून वसूल केलेला दंड, संक्रमण शिबीर येथील सन १९९० ते २००६ पर्यंतच्या क्षेत्र नोंदवहयाच्या प्रती, भाडेकरु / गाळे धारकाची यादी इत्यादी माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागितलेली माहिती विहित कालावधीत दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. अपिलकाराने मागितलेली माहिती सात दिवसांचे आंत द्यावी असे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केले. परंतु जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास मागितलेली माहिती विहित वेळेत दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशाचे पालन केले नाही. प्रकरण दि.१३.८.२००८ रोजी सुनावणीचेवेळी लेखी पत्र दाखल करुन अपिलकाराने मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध आहे. माहितीपोटी अपिलकाराने शुल्काचा भरणा कार्यालयात करताच सदर माहिती त्यांना देण्यात येईल असे आयोगाच्या निदर्शनास आणले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास नियमानुसार कागदपत्रांची तपासणी करण्यास परवानगी द्यावी. त्यानंतर कार्यालयात उपलब्ध असलेल्या व अपिलकारास हव्या असलेल्या तेवढयाच कागदपत्रांच्या फोटोप्रती उपलब्ध करुन द्याव्यात.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१३/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६३९/०२**

**श्री. जयंत रामचंद्र पटवर्धन, ------ अपीलकर्ता**
**३/ डी, माधवनगर सोसायटी,**
**भवानी शंकर मार्ग, दादर, मुंबई- ४०० ०२८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक महापालिका आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**जी/उत्तर वॉर्ड, हरिश्चंद्र येलवे मार्ग,**
**दादर, मुंबई- ४०० ०२८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**इमारती व कारखाने, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**जी/उत्तर वॉर्ड, हरिश्चंद्र येलवे मार्ग,**
**दादर, मुंबई- ४०० ०२८. ------- उत्तरवादी**

- **वि वे च न** -

अपिलकार श्री. जयंत रामचंद्र पटवर्धन, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इमारती व कारखाने) बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग, दादर, मुंबई यांचेकडे दि. १६.१२.२००६ रोजी अर्ज करुन माधवनगर सोसायटीच्या मालकीच्या चाळीतील अनधिकृत बांधकामाबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१८.१.२००७ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक महापालिका आयुक्त, जी/उत्तर विभाग, दादर, मुंबई यांचेकडे दि. २५.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २२.२.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. परंतु प्रथम अपलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१३.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणी करिता जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई

महानगरपालिका, जी/उत्तर विभाग, दादर, श्री. सी.बी.शेंडे तसेच अपिलकार श्री. जयंत रामचंद्र पटवर्धन हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचें म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.जयंत पटवर्धर यांनी माहिती अधिकारात दि.१६.१२.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग, दादर, यांचेकडे अर्ज करुन खालील माहिती मागितली.

(१) दि.१०.३.२००६ ते १६.१२.२००६ या कालावधीची माधवनगर सोसायटीच्या मालकीच्या चाळीतील ज्या बांधकामासंबंधी तक्रार आहे ते कायद्याच्या दृष्टीने अधिकृत आहे की अनधिकृत आहे याचा खुलासा.

(२) न्यायालयाने अनधिकृत बांधकामास परवानगी दिली आहे का ?

(३) न्यायालयाने दुरुस्ती कामाकरिता परवानगी दिली. अनधिकृत बांधकाम केल्यास ते ते पाडू नये याबाबत महापालिकेस काही आदेश दिले आहेत का ?

(४) न्यायालयाने अनधिकृत बांधकाम करण्यास परवानगी दिली नसेल, अनधिकृत बांधकाम पाडू नये असे आदेश दिले नसल्यास बांधकाम पाडण्यास कोणतही अडचण येते याचा खुलासा करावा.

(५) वरिष्ठांशी याबाबत पत्रव्यवहार केला असल्यास त्याच्या साक्षांकित प्रती.

(६) संबंधितांवर ३५४ अन्वये नोटीस बजावण्याच्या दिनांकापासून विधी विभागाशी संपर्क साधून काही लेखी विचारणा केली असल्यास त्याची प्रत. नसल्यास पत्रव्यवहार का केला नाही.

(७) न्यायालयाच्या आदेशाचा ढालीसारखा उपयोग करुन घेतला असल्यास त्यासंबंधीची माहिती विधी अधिका-यास कळविण्याची जबाबवारी कोणाची त्या अधिका-याचे नांव, पदनाम इ. माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिलेल्या माहितीने अपिलकाराचे समाधान झाले नाही. तयामुळे प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त यांचेकडे दि.२५.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२२.२.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. परंतु आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास दि.१९.१.२००७ च्या पत्राने उत्तर दिले. त्यामध्ये माधवनगर संस्थेच्या मालकीच्या चाळीतील बांधकामाला ३५४ ए

ची नोटीस दिली असल्याचे नमूद केले आहे. परंतु याबाबत पुढे काय कारवाई केली. सदर बांधकामास मा.न्यायालयाने परवानगी दिली का ? सदर बांधकाम कायद्याचे दृष्टीने अधिकृत की अनधिकृत आहे. मा.न्यायालयाच्या आदेशामध्ये जी कामे करण्यास परवानगी दिली आहे त्या कामामध्ये अपिलकाराने तक्रार केलेल्या बांधकामाचा उल्लेख केला आहे असे संदिग्ध उत्तर दिलेले दिसते. याबाबत सुस्पष्ट अशी जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास माहिती दिलेली दिसत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, मा. न्यायालयाचे आदेशाबाबत महानगरपालिकेच्या विधी अधिकारी यांचा सल्ला घेऊन अपिलकारा सुस्पष्ट माहिती द्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१३/०८/२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६४५/०२**

**श्री. अतुल रमणिकलाल माथुरीया,** **------ अपीलकर्ता**
**बी-११, शिव छाया,३३, सर एम.व्ही.रोड,**
**अंधेरी (प.) मुंबई- ४०० ०६९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक,**
**सहकारी संस्था, रुम नं.६९, तळमजला,**
**म्हाडा इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक,**
**सहकारी संस्था के.पूर्व विभाग, मुंबई,**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जीपीओ समोर,**
**फोर्ट, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. अतुल रमणिकलाल माथुरिया यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, के पूर्व विभाग, मुंबई यांचेकडे दि.६.२.२००७ रोजी अर्ज करुन अंधेरी (पूर्व) येथील माथुरिया अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण सोसायटी लि.च्या प्रशासकाच्या कामकाजाबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था (३), वांद्रे, मुंबई यांचेकडे दि.२३.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १३.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली होती. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी यांच्यावतीने श्री.डी.एम.गोसावी, सहकारी अधिकारी हजर होते. अपिलकार अतुल माथुरिया हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांनी सादर केलेला लेखी अहवाल व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.अतुल माथुरिया यांनी माहितीच्या अधिकारात दि. ६.२.२००७ रोजी अर्ज करुन जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था यांचेकडे खालील माहिती मागितली होती.

" मथुरिया को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.या संस्थेच्या प्रशासकांनी केलेले कामकाज, घेतलेले निर्णय व रद्द केलेले निर्णय, प्रशासकाचा कालावधी, प्रशासकाच्या कालावधीत प्रशासकाने घेतलेले मानधन व प्रशासकाच्या सहाय्यकाने घेतलेले मानधन, नियुक्ती केलेल्या प्रशासकाची शेवटची तारीख, प्रशासकांनी संस्थेस भेट दिलेल्या तारखा, प्रशासकाच्या सहाय्यकाने संस्थेस भेट दिलेल्या तारखा, दि. ३१.३.२००६ अखेरच्या वार्षिक सर्वसाधारण सभा नियमानुसार मुदतवाढ न घेता घ्यावयाची शेवटची तारीख, दि. ३१.३.२००६ अखरेच्या वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याच्या मुदतवाढ पत्राचा आवक क्रमांक व दि. ३१.३.२००६ अखेरच्या वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याच्या मुदतवाढ पत्राचा जावक क्रमांक व दिनांक इत्यादी. "

जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २३.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.५.४.२००७ रोजी सुनावणी आयोजित करुन दि.१८.४.२००७ रोजी आदेश पारित केले. अपिलकाराने ज्या संस्थेबाबत माहिती मागितली या समुचित संस्थेस शासनाद्वारे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष भरीव अर्थसहाय्य नसल्याने तिचा " शासकीय प्राधिकरण " यामध्ये समावेश होत नाही. या भूमिकेवरुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकाराचे प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ (घ) (एक) (दोन) चा आधार घेऊन माहिती नाकारली आहे. परंतु सदर अधिनियमातील कलम २ (त्र) येथील तरतूद लक्षात घेता मथुरिया अपार्टमेंट को.ऑप.हौ.सोसायटी लि. अधेरी (पूर्व) ही जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या अधिपत्याखालील/ कार्यक्षेत्रातील दिसते. त्यामुळे सदर अधिका-यांनी माहिती नाकारण्याची

घेतलेली भूमिका योग्य वाटत नाही.  याच विषयी यापूर्वी मा.मुख्य माहिती आयुक्त यांनी दि. २.१.२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलकारास कागदपत्रांची तपासणी करण्यास परवानगी देण्याच्या सूचना दिल्या होत्या.  त्यानुसार अपिलकाराने कागदपत्रांची तपासणी केली.  त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास आवश्यक ती माहिती दि. २७.३.२००८ रोजी पत्र लिहून दिली.  यामुळे अपिलकाराने दि. १.८.२००८ रोजी लेखी पत्र देऊन अपील बंद करण्याची विनंती केली असा जन माहिती अधिका-यांनी लेखी अहवाल देऊन सुनावणीच्यावेळी आयोगाच्या निदर्शनास आणले.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१३/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६५४/०२**

**श्री. उत्तम सांडव,** **------ अपीलकर्ता**
**सी-५०१, चिरायू को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.**
**केवल इंडस्ट्रीयल इस्टेटजवळ,**
**सेनापती बापट मार्ग, लोअर परेल,**
**मुंबई- ४०० ०१३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहमुख्य अधिकारी,**
**म्हाडा, गृहनिर्माण भवन.**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी,**
**म्हाडा एम.बी.आर.ॲन्ड आर बोर्ड, २ रा मजला,**
**गृहनिर्माण भवन. वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. उत्तम सांडव, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उप मुख्याधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडा, वांद्रे, मुंबई यांचेकडे दि. ७.२.२००७ रोजी अर्ज करुन सीटी सर्व्हे क्र.४/१४२, सेनापटी बापट मार्ग, लोअर परेल (प.), मुंबई येथील चिरायु सहकारी गृहनिर्माण संस्था लि.संबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. यामुळे अपिलकार यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी (आर.टी.), म्हाडा, मुंबई यांचेकडे दि.२०.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घेतली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ८.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१४.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी यांच्यावतीने श्री.के.बी.शेळके, वरिष्ठ लिपिक हजर होते. अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.उत्तम सांडव यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा उप मुख्याधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडा यांचेकडे दि.७.२.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

" सीटी सर्व्हे क्र.४/१४२, बी.आर.कॉटन मिल, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल येथील चाळीचा विकास करण्याकरिता इमारत बांधकामासाठी विकासक निश्चित केला. विकासकाने खोटे कागदपत्र बनवून (१)अरविंद भोसले, (२)प्रमोद शेलार, (३)अलका नारकर यांच्या नांवे त्या ठिकाणच्या चिरायू सहकारी सहकारी गृहनिर्माण सोसायटी लि.मध्ये अधिक सदनिका बांधून दिल्या. याबाबत अपिलकाराने सर्व कागदपत्रांच्या प्रतींची मागणी केली.

जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह मुख्याधिकारी, म्हाडा, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ८.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

दिनांक १४ ऑगस्ट, २००८ रोजी तातडीच्या कामासाठी मुंबई बाहेर जात असल्याने सुनावणीकरिता हजर राहू शकणार नाही असे अपिलकार श्री.उत्तम सांडव यांनी दि. १३ ऑगस्ट,२००८ च्या पत्रान्वये आयोगास कळविले. आयोगाकडे द्वितीय अपील केले. त्यानंतरच्या कालावधीत कार्यकारी अभियंता, जी/साऊथ/एफ/साऊथ, परेल, यांनी अपिलकारास माहिती दिली. तसेच सदर प्रकरणी अपिलकाराची कोणतीही तक्रार नाही असेही अपिलकाराने वरील दि. १३.८.२००८ च्या पत्रान्वये आयोगास कळविले. सबब, या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१४/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६५८/०२**

**श्री. संजय रतनराव पालांडे,** **------ अपीलकर्ता**
**८/६२०, एम. एच. बी. कॉलनी,**
**अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई- ४०० ०३३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष,**
**दि बेस्ट एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडिट सोसा.लि.**
**कुलाबा, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**दि बेस्ट एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडिट सोसा.लि.**
**कुलाबा, मुंबई.** **------- उत्तरवादी**

- **वि वे च न** -

अपिलकार श्री. संजय रतनराव पालांडे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सचिव, दि.बेस्ट एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडिट सोसा.लि.यांचेकडे दि.२८.१२.२००६ रोजी अर्ज करुन दि.बेस्ट एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडिट सोसायटी बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, दि.बेस्ट एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडिट सोसायटी यांचेकडे दि. २३.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १४.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, श्री.जी.एफ. मावावाला, श्री.डी.सी.कनुलकर तसेच अपिलकार श्री.संजय पालांडे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.संजय पालांडे यांनी माहितीच्या अधिकारात दि. २८.१२.२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

(१) दि.बेस्ट एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडिट सोसायटी लि.च्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत. (२) दि.बेस्ट एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडिट सोसायटी वेतनधारकांसाठी नोंदणीगृत आहे की बहुउद्देशिय महाराष्ट्र को.ऑप.सोसायटी अधिनियमांतर्गत नोंदणीकृत केली. (३) दि.बेस्ट एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडिट सोसायटीच्या सहाव्या वार्षिक अहवालाची प्रत. (४) सद्‌गुरु को.ऑप.सोसायटी येथे चिकित्सालय चालविण्याकरिता दि.बेस्ट एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडिट सोसायटी व सद्‌गुरु को.ऑप.सोसायटीमध्ये झालेल्या कराराची प्रत.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने दि.२३.२.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, दि.बेस्ट एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडिट सोसायटी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले. अपिलातील कागदपत्रांचा साकल्याने विचार करता असे स्पष्ट दिसून येते की, दि.बेस्ट एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडिट सोसायटी लि.करिता शासनाकडून प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या आर्थिक सहाय्य झाल्याचे दिसून येत नाही. सहकारी पतसंस्था आणि नागरी सहकारी बँकांना शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रितीने देण्यात येत नाही असे डॉ.शैलेश कुमार शर्मा, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय आहेत. क्रेडिट सोसायटी/ खाजगी सहकारी बँका माहितीच्या अधिनियमाच्या कक्षेत येत नसल्याचे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे अभिप्राय आहेत. तरी या क्रेडिट सोसायटीस माहितीच्या अधिकारासंबंधीच्या तरतुदी लागू होत नाहीत. परंतु अपिलार्थीवर जर अन्याय होत असेल तर तो दूर करण्यासाठी त्यांनी सहकार कायद्यान्वये सहकार विभागातील प्राधिकरणाकडे दाद मागावी. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील फेटाळण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१४/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/५९९/०२**

**श्री. रविंद्र गोविंद जयस्वाल,** **------ अपीलकर्ता**
**रा.२९२/४८, गुरुनिवास,**
**बांगडवाडी, व्ही. पी.रोड,**
**प्रार्थना समाज, मुंबई- ४०० ००४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक,**
**अभियांत्रिकी सेवा आणि प्रकल्प,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, मुख्य कार्यालय,**
**विस्तारित इमारत, ३ रा मजला, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता,**
**इमारत प्रस्ताव शहर, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**ई वॉर्ड, भायखळा, मुंबई- ४०० ००८.** **------- उत्तरवादी**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. रविंद्र गोविंद जयस्वाल, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव), बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड, भायखळा, मुंबई यांचेकडे दि. १३.११.२००६ रोजी अर्ज करुन भूखंड क्र.१३५३, एस.व्ही.पी.रोड, गिरगांव, द्वारकादास मेन्शन (फिनिक्स बिल्डिंग) प्रार्थना समाज, मुंबईच्या पुनर्बांधणी संदर्भात अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक, अभियांत्रिकी सेवाव प्रकल्प, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुख्य इमारत, मुंबई यांचेकडे दि.२९.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१९.१०.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सदर सुनावणीवर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ८.२.२००७ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तराने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ०१ ऑगस्ट, २००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता नोटीस यु.पी.सी.ने पाठवूनही जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.रविंद्र जयस्वाल यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१३.११.२००६ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

(१) सीटी सर्व्हे क्र.१३५३, एस.व्ही,पी.रोड, गिरगांव, द्वारकासदास मेन्शन (फिनॅक्स बिल्डिंग), प्रार्थना समाजच्या पुनर्बांधणीसांबंधी माहिती.

(अ) या इमारतीत सध्या अस्तित्वात असलेल्या भाडेकरुंची यादी व त्यांच्याकडून घेण्यात येणा-या भाडयाचा संपूर्ण तपशील.

(ब) ६ व ७ व्या मजल्याला आपण परवानगी दिलेली नसताना किंवा वापराची परवानगी घेतली नसतांना वापर कसा होत आहे ?

(क) दि. ६.८.१९८८ रोजी मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे तळ मजला व अधिक वरील ६ मजले मंजूर करण्यात आलेले होते. तर ७ व्या मजल्याला कोणत्या नियमाने मंजुरी दिलेली आहे.

(ड) काय इमारतीला पूर्ण झाल्याचा दाखला देण्यात आलेला आहे ?

सहाय्यक करनिर्धारक व संकलक, डी विभाग कार्यालयात भाडेकरुंची यादी, नांवे व पत्ता यांची नोंद नसते. परंतु मालमत्तेमध्ये असलेले एकूण गाळे, कर निर्धारण करण्यासाठी घेतलेले भाडे याची नोंद आहे. ही माहिती शुल्क रु.२३०/- प्रती वर्ष प्रती मालमत्ता भरुन प्राप्त होऊ शकेल असे जन माहिती अधिकारी श्री.सु.म.चव्हाण, सहाय्यक, करनिर्धारक व संकलक, डी विभाग यांनी अपिलकारास दि.१.१२.२००६ रोजी कळविले. दरम्यान अपिलकाराने दि.१६.११.२००६ रोजी अर्ज करुन पूर्वी दि.१३.११.२००६ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती मुख्य अधिकारी, ए.बी.आर.आणि आर.बोर्ड, गृहनिर्माण भवन, मुंबई यांचेकडे माहिती मागितली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास दि. १६.१२.२००६ च्या पत्रान्वये माहिती दिली. तसेच मंजूर आराखडयाचा प्रस्ताव शुल्क भरल्यानंतर उपलब्ध करुन देण्यांत येईल असे उप प्रमुख अभियंता यांनी अपिलकाराच्या दि. ८.१२.२००६ च्या अर्जासंदर्भात दि. ६.१.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक यांचेकडे दि. २९.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१९.१.२००७ रोजी सुनावणी घेतली. अपिलकाराने मागितलेले कागदपत्र उपलब्ध असून, आवश्यक शुल्क भरुन माहिती घेण्यास अपिलकारास दि. ८.१.२००७ च्या पत्रान्वये कळविले. आवश्यक शुल्क प्रदान केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या

कागदपत्रांच्या छायाप्रती देणेबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सूचना दिल्या. तसेच अपील निकालात काढण्यांत आले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येतेकी, अपिलकार श्री.जयस्वाल यांनी माहितीच्या अधिकारात जसे दि. १३.११.२००६, १६.११.२००६, २.१२.२००६, ५.१२.२००६, व १६.१.२००७ रोजी अर्ज करुन सीटी सर्व्हे क्र.१३५३, एस.व्ही.पी.रोड, गिरगांव, द्वारकादास मेन्शन (फिनिक्स बिल्डिंग) प्रार्थना समाज, मुंबईच्या इमारतीच्या पुनर्बांधणी संदर्भात माहिती मागितली. माहितीपोटी आवश्यक शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकारास कळविले. अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे समर्पक व नियमानुसार असल्याने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील अमान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१४/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६४०/०२**

**श्री. सुनिल मधुकर वाखारकर,** **------ अपीलकर्ता**
**ई- ५/बी, ००७ हायवे पार्क, ठाकूर संकूल,**
**कांदिवली (पूर्व), मुंबई- ४०० १०१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव ,**
**मुंबई विद्यापीठ,**
**फोर्ट, मुंबई-४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**विशेष कार्य अधिकारी-नि- परिक्षा नियंत्रक,**
**मुंबई विद्यापीठ परिक्षा विभाग,**
**एम.जे.फुले भवन, विद्यानगरी,**
**सांताक्रूझ (पूर्व), मुंबई- ४०० ०२८.** **------- उत्तरवादी**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. सुनिल मधुकर वाखारकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी -नि-परिक्षा नियंत्रक, मुंबई विद्यापीठ यांच्याकडे दि. १२.३.२००७ रोजी अर्ज करुन मिठीबाई व एन.एम.महाविद्यालय, विलेपार्ले येथे मार्च/ एप्रिल, २००६ मध्ये संपन्न झालेल्या तृतीय वर्ष परिक्षेसाठी काम केलेल्या परिक्षा केंद्र प्रमुखाची तक्त्यात दिलेल्या व्यक्तिंची नांवे ज्या कागदपत्रांवरुन देण्यात आली त्या कागदपत्रांच्या प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि. १०.३.२००७ च्या पत्रान्वये दिलेलया उत्तराने अपिलकाराचे समाधान झाले नाही. त्यामुळे अपिलकाराने दि. १६.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ३०.५.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपिलीय अधिकारी तथा निबंधक, मुंबई विद्यापीठ यांनी अद्याप आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २ जून, २००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १३.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय

अधिकारी तथा कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, क्रृ. व्यंकटरमणी, जन माहिती अधिकारी तथा परिक्षा नियंत्रक, मुंबई विद्यापीठ तसेच अपिलकार श्री.सुनिल वाखारकर हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व जन माहिती अधिकारी, मुंबई विद्यापीठ यांनी सादर केलेला लेखी अहवाल तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.सुनिल वाखारकर यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा परिक्षा नियंत्रक, मुंबई विद्यापीठ यांचेकडे दि. १२.३.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली.

(१) डॉ. एन.एम.वेलिंग, मिठीबाई व एन.एम.महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून तक्त्यात नमूद केलेले आहे व त्यांनी दि. २२.३.२००६ रोजी तृतीय वर्ष वाणिज्य, मार्च/ एप्रिल, २००६ परिक्षेकरिता परीक्षा केंद्र प्रमुख म्हणून काम पाहिले आहे. विद्यापिठाच्या कोणत्या नियमानुसार डॉ. एन.एम.वेलिंग यांना दोन्हीही महाविद्यालयासाठी परीक्षा केंद्र प्रमुख म्हणून काम करण्यासाठी परवानबी देण्यात आली ? नियमाची प्रत देण्यांत यावी.

(२) एन. एम. महावद्यालय, विलेपार्ले (प.), मुंबई-५६ येथे तृतीय वर्ष वाणिज्यची फक्त २२.३.२००६ रोजीच परीक्षा झाली होती का ? इतर दिवसांच्या परिक्षेसाठी विद्यार्थ्यांची कोणत्या परीक्षा केंद्रात सोय करण्यात आली होती व त्या परीक्षा केंद्रासाठी केंद्र प्रमुख म्हणून कोणी काम पाहिले.

(३) आपल्याकडे वरील महाविद्यालयाच्या ज्या उपलब्ध असलेल्या माहितीवरुन तक्ता तयार करण्यात आला आहे त्याच्या प्रती देण्यांत याव्यात.

(४) विद्यापिठाच्या तृतीय वर्षाच्या परिक्षेसाठी पदनिहाय केंद्र प्रमुख/ वरिष्ठ पर्यवेक्षक / कनिष्ठ पर्यवेक्षक व इतरांसाठी काम करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या नियमावलीची प्रत देण्यांत यावी.

अपिलकारास निश्चित कोणत्या अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षाच्या परिक्षेची माहिती पाहिजे आहे त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास दि. १.१.२००७, २२.२.२००७ रोजी पत्र पाठवून विचारणा केली होती. परंतु, त्याबाबत अपिलकाराने, जन माहिती अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक यांना काही कळविले नाही. मिठीबाई व एन.एम. महाविद्यालयात तृतीय वर्षाच्या परीक्षा, नमूद केलेल्या तारखेस झाल्या असून, त्या दरम्यान विद्यापिठाकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार परीक्षा केंद्र प्रमुख म्हणून काम केलेल्या व्यक्तिची जन माहिती अधिकारी यांनी दि.१०.३.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. अपूर्ण माहिती दिल्यामुळे अपिलकाराने दि. १६.४.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा निबंधक, मुंबई विद्यापीठ यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित करुन माहितीचा अधिकार अधिनियमानुसार देय माहिती अपिलकारास, जन

माहिती अधिकारी यांनी द्यावी असे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ९.१०.२००६ रोजी आदेश पारित केले. तरीही माहिती मिळाली नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २ जून, २००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता अपिलकाराने दि. १२.३.२००७ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास दि.१०.३.२००७ च्या पत्रान्वये दिलेल्या माहितीमध्ये तफावत दिसते. अपिलकारास मागणीप्रमाणे, जन माहिती अधिका-यांनी माहिती दिलेली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास ३० दिवसांचे आंत माहिती द्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करणयांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१४/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६४१/०२**

**श्री. सुनिल मधुकर वाखारकर,** **------ अपीलकर्ता**
**ई- ५/बी, ००७ हायवे पार्क, ठाकूर संकूल,**
**कांदिवली (पूर्व), मुंबई- ४०० १०१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव ,**
**मुंबई विद्यापीठ,**
**फोर्ट, मुंबई-४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**विशेष कार्य अधिकारी-नि- परिक्षा नियंत्रक,**
**मुंबई विद्यापीठ परिक्षा विभाग,**
**एम.जे.फुले भवन, विद्यानगरी,**
**सांताक्रूझ (पूर्व), मुंबई- ४०० ०२८.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. सुनिल मधुकर वाखारकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी -नि-परिक्षा नियंत्रक, मुंबई विद्यापीठ यांच्याकडे दि. १२.३.२००७ रोजी अर्ज करुन डॉ.वेलिंग यांनी दि.२२.३.२००६ रोजी एन.एम. व मिटीबाई महाविद्यालयात संपन्न झालेल्या तृतीय वर्ष वाणिज्य परिक्षेसाठी परिक्षा केंद्र प्रमुख म्हणून दोन्ही ठिकाणी काम करु शकतात याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि. १०.३.२००७ च्या पत्रान्वये दिलेलया उत्तराने अपिलकाराचे समाधान झाले नाही. त्यामुळे अपिलकाराने दि. १६.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ३०.५.२००७ रोजी सुनावणी आयोजित करुनही प्रथम अपिलीय अधिकारी तथा निबंधक, मुंबई विद्यापीठ यांनी अद्याप आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २ जून, २००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १३.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, क्रृ. व्यंकटरमणी, जन माहिती अधिकारी तथा परिक्षा नियंत्रक, मुंबई विद्यापीठ तसेच अपिलकार श्री.सुनिल वाखारकर हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व जन माहिती अधिकारी, मुंबई विद्यापीठ यांनी सादर केलेला लेखी अहवाल तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.सुनिल वाखारकर यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा परिक्षा नियंत्रक, मुंबई विद्यापीठ यांचेकडे दि. १२.३.२००७ रोंजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली.

(क) विद्यापीठ मान्यता पत्र क्र.concol/3A/2014, दि.१० मे,२००६ नुसार एन.एम. महाविद्यालयातील श्री. एम.एन. वेलिंग यांच्या प्राचार्य पदास दि.२.५.२००६ पासून मान्यता दिली. असे असतानासुध्दा डॉ.एन.एम.वेलिंग यांनी दि.२२.३.२००६ रोजी एन.एम.महाविद्यालय व मिठीबाई महाविद्यालातील प्राचार्य पद धारण करुन विद्यापिठाच्या तृतीय वर्षाच्या वाणिज्य परिक्षेसाठी परिक्षा केंद्र प्रमुख म्हणून काम केले होते. तसेच रुईया महाविद्यालयाचे प्राचार्य, मिठीबाई महाविद्यालयाच्या प्राचार्य पदास मान्यता नसतानाही प्राचार्य पद धारण करुन परिक्षा केंद्र प्रमुख म्हणून काम करु शकतात का ? असल्यास नियमाची प्रत द्यावी.

(ख) जन माहिती अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी-नि- परीक्षा नियंत्रक यांनी, माहिती स्वतःच्या स्वाक्षरीने पाठविणे नियमानुसार बंधनकारक असतानासुध्दा माहिती कोणीतरी for म्हणून सही करुन पाठविली आहे. पाठविलेली माहिती, माहिती अधिका-यांच्या सहीनिशी नसल्याने ती वैध आहे का ? असल्यास नियमाची प्रत द्यावी.

(ग) पर्यवेक्षक व इतरांसाठी काम करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या नियमावलीची प्रत देण्यांत यावी.

मिठीबाई व एन.एम. महाविद्यालयात तृतीय वर्षाच्या परीक्षा, नमूद केलेल्या तारखेस झाल्या असून, त्या दरम्यान विद्यापिठाकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार परीक्षा केंद्र प्रमुख म्हणून काम केलेल्या व्यक्तिची जन माहिती अधिकारी यांनी दि.१०.३.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. अपूर्ण माहिती दिल्यामुळे अपिलकाराने दि. १६.४.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा निबंधक, मुंबई विद्यापीठ यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१२ मार्च,

२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलकार श्री.वाखारकर सुनावणीकरिता हजर राहिले नाहीत. राज्य माहिती आयोगाकडे जात असल्याचे त्यांनी दि. २६.२.२००७ च्या पत्रान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांना कळविले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपील निकालात काढले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपील फेटाळल्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २ जून, २००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

एन.एम.महाविद्यालयातील प्राचार्य पदास दि.२.५.२००६ पासून मान्यता मिळाली. डॉ.वेलिंग यांनी प्राचार्य पदास मान्यता मिळण्यापूर्वी म्हणजे दि.२२.३.२००६ पासून प्राचार्य पद धारण करुन विद्यापिठाच्या परीक्षेचे केंद्रप्रमुख म्हणून काम पाहू शकतात का? याबाबत अपिलकारास माहिती द्यावी. अपिलकारास ज्या पत्रान्वये माहिती दिली त्या पत्रावर जन माहिती अधिका-यांच्या वतीने for म्हणून इतरांनी सही केली आहे. यावरुन दिलेली माहिती वैध आहे किंवा कसे असा अपिलकाराचा मुद्दा आहे. याबाबत अधिक्षक, अपिलीय अधिकारी यांचे कार्यालय, मुंबई विद्यापीठ यांनी अपिलकारास पाठविलेल्या दि.१२.४.२००७ च्या पत्रातील मुद्दा क्र.१ येथे याबाबत खुलासा केला. असे असले तरी भविष्यात जन माहिती अधिकारी यांच्या वतीने अर्जदारास माहिती देताना वैधतेच्या दृष्टीने माहिती देण्यास जन माहिती अधिका-यांची संमती घेतल्याचा पत्रात जाणिवपूर्वक उल्लेख करण्याची दक्षता घ्यावी. पर्यवेक्षक व इतर कामासाठी तयार करण्यात आलेल्या नियमावलीची अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी प्रत द्यावी. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१४/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६५१/०२**

**श्री. जगन्नाथ एच. शर्मा,** **------ अपीलकर्ता**
**चंद्रिकाबाई एच.शर्मा चाळ, रुम नं.१८२,**
**खार जवाहर नगर, साईबाबा रोड,**
**खार (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक महापालिका आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/ई वॉर्ड, प्रभात कॉलनी, पहिला मजला,**
**सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/ई वॉर्ड, प्रभात कॉलनी, पहिला मजला,**
**सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. जगन्नाथ शर्मा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, एच/ई वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, यांच्याकडे दि.१५.७.२००६ रोजी अर्ज करुन अपिलकाराने त्यांच्या खाजगी मालकीच्या जागेतील भाडेकरुनी महापालिकेची परवानगी न घेता लावलेले रोलिंग शटर काढून टाकण्याबाबत महापालिकेकडे दि. २३.२.२००६, १५.४.२००६ व २४.५.२००६ च्या अर्जान्वये केलेल्या तक्रारीवर करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक महापालिका आयुक्त, एच/ई वॉर्ड, सांताक्रूझ, मुंबई यांच्याकडे दि.३०.८.२००६ रोजी

प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ९.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १४.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सदर सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, एच/ई वॉर्ड, श्री. एस.टी.रावल, कनिष्ठ अभियंता, श्री. व्ही.एन. चामनकर, तसेच अपिलकार श्री.जगन्नाथ मिश्रा हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री. जगन्नाथ शर्मा यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, एच/ई वॉर्ड, सांताक्रूझ यांच्याकडे दि. १५.७.२००६ रोजी अर्ज करुन अपिलकाराच्या खाजगी जागेत त्यांच्या भाडेकरु / पोटभाडेकरु यांनी बेकायदेशीरपणे महापालिकेची परवानगी न घेता रोलिंग शटर लावलेले आहे. ते काढून टाकण्याबाबत अपिलकाराने केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२३.१२.२००६ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. अपिलकाराच्या तक्रारीत नमूद केलेल्या रेडिओ दुरुस्तीच्या आस्थापनेला भेट दिली व त्या आस्थापनाच्या मालकावर मुंबई दुकान व आस्थापना अधिनियमानुसार कार्यवाही करण्यात आली असे वरील दि. ३०.१२.२००६ च्या पत्रान्वये अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी कळविले आहे. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ९.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराच्या खाजगी मालकीच्या जागेत त्यांच्या भाडेकरु/ पोटभाडेकरुने अनधिकृतपणे रोलिंग शटर बसवून रेडिओ दुरुस्तीचा व्यवसाय सुरु केला असल्याचे दिसते. अपिलकाराने रोलिंग शटर काढून टाकण्याबाबत जन माहिती अधिका-यांकडे तक्रार केली. जन माहिती अधिका-यांनी रेडिओ दुरुस्तीच्या दुकानास भेट देवून संबंधित

मालकाविरुध्द दुकाने व आस्थापना अधिनियमानुसार कार्यवाही करण्यात आली असल्याचे कळविले. अपिलकाराच्या भाडेकरु/ पोटभाडेकरु यांनी अवैधरित्या लावलेले रोलिंग शटर काढून टाकले किंवा कसे याबाबत जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही भाष्य केलेले नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने रोलिंग शटर काढून टाकण्याबाबत केलेल्या तक्रारीसंबंधीची नेमकी काय कारवाई करण्यांत आली याबाबतची माहिती अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आंत जन माहिती अधिका-यांनी दयावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१४/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६५२/०२**

**श्री. जगन्नाथ एच. शर्मा, ------ अपीलकर्ता**
**चंद्रिकाबाई एच.शर्मा चाळ, रुम नं.१८२,**
**खार जवाहर नगर, साईबाबा रोड,**
**खार (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक महापालिका आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/ई वॉर्ड, प्रभात कॉलनी, पहिला मजला,**
**सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/ई वॉर्ड, प्रभात कॉलनी, पहिला मजला,**
**सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५. ------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. जगन्नाथ शर्मा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, एच/ई वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, यांच्याकडे दि.१७.६.२००६ रोजी अर्ज करुन अपिलकाराने त्यांच्या खाजगी मालकीच्या जागेतील भाडेकरुनी महापालिकेची परवानगी न घेता पोटमाळे बांधकाम केल्याबाबत महापालिकेकडे दि. २२.११.२००५ व २५.५.२००६ च्या अर्जान्वये केलेल्या तक्रारीवर करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक महापालिका आयुक्त, एच/ई वॉर्ड, सांताक्रूझ, मुंबई यांच्याकडे दि.२५.७.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय

अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ९.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १४.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सदर सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, एच/ई वॉर्ड, श्री. एस.टी.रावल, कनिष्ठ अभियंता, श्री. व्ही.एन. चामनकर, तसेच अपिलकार श्री.जगन्नाथ मिश्रा हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री. जगन्नाथ शर्मा यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, एच/ई वॉर्ड, सांताक्रूझ यांच्याकडे दि. १५.७.२००६ रोजी अर्ज करुन अपिलकाराच्या खाजगी जागेत त्यांच्या भाडेकरु / पोटभाडेकरु यांनी बेकायदेशीरपणे महापालिकेची परवानगी न घेता पोटमाळयाचे बांधकाम केले आहे. त्यांच्याविरुध्द एच/पूर्व यांनी ३५१ खाली कारणे दाखवा नोटीस दिली आहे. परंतु पुढे त्यांच्याविरुध्द कारवाई केली नाही. या अपिलकाराने केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, महानगरपालिका आयुक्त यांचेकडे दि.२५.७.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. चंद्रिकाबाई एच.शर्मा चाळीतील भाडेकरुना जिल्हाधिकारी कार्यालयाने फोटोपास दिले आहेत. यावरुन असे दिसून येते की, सदर भाडेकरुंची जागा जिल्हाधिकारी यांच्या कार्यकक्षेतील आहे. तरी याबाबत आपण जिल्हाधिकारी (अतिक्रमण) वांद्रे यांचेकडे संपर्क साधावा असे दि. ४ जानेवारी, २००६ च्या पत्रान्वये प्रथम अपिलीय अधिका-यांनी कळविले आहे. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ९.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराच्या भाडेकरु/ पोटभाडेकरु यांनी अवैधरित्या बांधलेल्या पोटमाळयासंदर्भात त्यांचेविरुध्द कारवाई करण्याची अपिलकाराची मागणी आहे. चंद्रिकाबाई एच. शर्मा चाळीतील भाडेकरुंना जिल्हाधिकारी, वांद्रे कार्यालयाकडून फोटोपास

दिलेले आहेत. त्यावरुन सदर जागा जिल्हाधिकारी यांच्या कार्यकक्षेतील दिसते. तरी अपिलकाराने या प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा असे दिलेले उत्तर योग्य वाटते. सबब, आता खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१४/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६५३/०२**

**श्री. जगन्नाथ एच. शर्मा,** **------ अपीलकर्ता**
**चंद्रिकाबाई एच.शर्मा चाळ, रुम नं.१८२,**
**खार जवाहर नगर, साईबाबा रोड,**
**खार (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक महापालिका आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/ई वॉर्ड, प्रभात कॉलनी, पहिला मजला,**
**सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/ई वॉर्ड, प्रभात कॉलनी, पहिला मजला,**
**सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५.** **------- उत्तरवादी**

- **वि वे च न** -

अपिलकार श्री. जगन्नाथ शर्मा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, एच/ई वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, यांच्याकडे दि.१५.७.२००६ रोजी अर्ज करुन अपिलकाराने त्यांच्या खाजगी मालकीच्या जागेतील भाडेकरुनी महापालिकेची परवानगी न घेता अवैधरित्या पोटमाळे बांधल्याबाबत त्यांच्या विरुध्द कारवाई करण्याबाबत महापालिकेकडे दि.२४.५.२००६ च्या अर्जान्वये केलेल्या तक्रारीवर करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक महापालिका आयुक्त, एच/ई वॉर्ड, सांताक्रूझ, मुंबई यांच्याकडे दि.१८.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.९.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १४.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सदर सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, एच/ई वॉर्ड, श्री. एस.टी.रावल, कनिष्ठ अभियंता, श्री. व्ही.एन. चामनकर, तसेच अपिलकार श्री.जगन्नाथ मिश्रा हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री. जगन्नाथ शर्मा यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, एच/ई वॉर्ड, सांताक्रूझ यांच्याकडे दि. १५.७.२००६ रोजी अर्ज करुन अपिलकाराच्या खाजगी जागेत भाडेकरु / पोटभाडेकरु यांनी बेकायदेशीरपणे महापालिकेची परवानगी न घेता पोटमाळे बांधले असल्याने त्यांच्या विरुध कारवाई करण्याबाबत अपिलकाराने केलेल्या दि. १२.३.२००४, १५.३.२००४ व २४.५.२००६ च्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ९.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराच्या खाजगी मालकीच्या जागेत त्यांच्या भाडेकरु/ पोटभाडेकरुने अनधिकृतपणे पोटमाळे बांधले आहेत. म्हणून भाडेकरु/ पोटभाडेकरु यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबत अपिलकाराने जन माहिती अधिका-यांकडे तक्रार केली. सदर तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपिलकाराने मागितली असल्याचे दिसते. अपिलकाराच्या भाडेकरु/ पोटभाडेकरु यांनी अवैधरित्या महापालिकेच्या परवानगीशिवाय पोटमाळयाचे बांधकाम केले असल्याने त्यांच्या विरुध्द कारवाई करण्याची अपिलकाराची मागणी आहे. याबाबत जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही भाष्य केलेले नाही.

या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराच्या भाडेकरु/ पोटभाडेकरु यांनी महापालिकेच्या परवानगीशिवाय अवैधरित्या केलेल्या पोटमाळयाच्या बांधकामाबाबत अपिलकाराने केलेल्या तक्रारीसंबंधी काय कारवाई करण्यात आली याबाबतची माहिती अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आंत जन माहिती अधिका-यांनी दयावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१४/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६५५/०२**

**श्री. जगन्नाथ एच. शर्मा,** **------ अपीलकर्ता**
**चंद्रिकाबाई एच.शर्मा चाळ, रुम नं.१८२,**
**खार जवाहर नगर, साईबाबा रोड,**
**खार (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक महापालिका आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/ई वॉर्ड, प्रभात कॉलनी, पहिला मजला,**
**सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/ई वॉर्ड, प्रभात कॉलनी, पहिला मजला,**
**सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. जगन्नाथ शर्मा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, एच/ई वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, यांच्याकडे दि.१४.२.२००६ रोजी अर्ज करुन अपिलकाराने त्यांच्या खाजगी मालकीच्या जागेतील भाडेकरु यांनी महापालिकेची परवानगीशिवाय अनधिकृतपणे केलेले सर्व बांधकाम पाडून टाकण्याबाबत महापालिकेकडे केलेल्या दि.२९.११.२००४, १०.२.२००५, २८.४.२००५, २२.११.२००५ व २९.१०.२००५ च्या पत्रांन्वये केलेल्या तक्रारीवर करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक महापालिका आयुक्त, एच/ई वॉर्ड, सांताक्रूझ,

मुंबई यांच्याकडे दि.२४.३.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.९.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १४.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सदर सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, एच/ई वॉर्ड, श्री. एस.टी.रावल, कनिष्ठ अभियंता, श्री. व्ही.एन. चामनकर, तसेच अपिलकार श्री.जगन्नाथ मिश्रा हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री. जगन्नाथ शर्मा यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, एच/ई वॉर्ड, सांताक्रूझ यांच्याकडे दि. १४.२.२००६ रोजी अर्ज करुन अपिलकाराच्या खाजगी जागेत भाडेकरु / पोटभाडेकरु यांनी बेकायदेशीरपणे महापालिकेची परवानगी न घेता त्यांनी केलेले सर्व बांधकाम पाडून टाकण्याबाबत अपिलकाराने केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ९.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराच्या खाजगी मालकीच्या जागेत त्यांच्या भाडेकरु/ पोटभाडेकरुने अनधिकृतपणे महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय केलेले सर्व बांधकाम पाडून टाकण्याबाबत अपिलकाराची तक्रार आहे. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३५१ अंतर्गत अपिलकाराच्या भाडेकरु/ पोटभाडेकरु यांना अनधिकृत बांधकामाबाबत कारणे दाखवा नोटीय देण्यात आली होती. त्याविरुध्द भाडेकरुंनी बी.सी.सी.सूट क्र.४३७ दाखल करुन मा.न्यायालयाकडून Injunction प्राप्त करुन घेतले होते. याबाबत विधी विभागाचा सल्ला घेऊन पुढील आवश्यक ती कारवाई करण्यात येईल असे अपिलकारास कळविले होते. मा.न्यायालयातील

सुनावणीकरिता वादी अथवा त्यांच्यावतीने बाजू मांडण्याकरिता वकील न्यायालयात हजर झाले नाहीत. यावरुन वादीस प्रकरणात स्वारस्य दिसत नाही. म्हणून बीसीसी सूट क्र.४१२९, ६२९४/०१, ४३०८/०१, ५८५९/०१, ६२८७/०१ मा. न्यायालयाने निकालात काढले. म्हणून मा. शहर दिवाणी न्यायालयाच्या आदेशानुसार अनधिकृत बांधकामाबाबत केलेल्या कारवाईची माहिती अपिलकाराने मागितली आहे. तरी या प्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती सदर आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत अपिलकास उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१४/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/२५०/०२**

**श्री. शैलेश गांधी** **------ अपीलकर्ता**
**बी-२, गोकुळ अपार्टमेंट,**
**आशा पारेख हॉस्पिटलजवळ,**
**सांताक्रूझ (प.), मुंबई- ४०० ५४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव,**
**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. शैलेश गांधी यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी, मुख्य सचिवांचे कार्यालय यांचेकडे दि. १३.१२.२००६ च्या अर्जान्वये जुलै, २००६ नंतरच्या भारतीय प्रशासकीय सेवा व भारतीय पोलीस सेवेतील अधिका-यांच्या बदल्यांसदर्भात सक्षम प्राधिकारी यांनी नोंदविलेल्या कारणांच्या पत्राच्या प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी दि. १८.१.२००७ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तराने समाधान झाले नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव, गृह विभाग यांचेकडे दि. २४.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर विहित कालावधीत आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ५.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १८.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव, गृह विभाग, श्री. सु.ज.महाजन, जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, गृह विभाग, श्री.कैलास बिलोणीकर, तसेच अपिलकार श्री.शैलेश गांधी हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.शैलेश गांधी यांनी माहितीच्या अधिकारात मुख्य सचिव कार्यालयातील जन माहिती अधिका-यांकडे दि. १३.१२.२००६ रोजी अर्ज करुन भारतीय प्रशासन सेवेतील व भारतीय पोलीस सेवेतील अधिका-यांच्या जुलै,२००६ नंतर केलेल्या बदल्यांसंबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती. सामान्य प्रशासन विभागाने अपिलकाराच्या अर्जाची एक प्रत गृह विभागातील जन माहिती अधिका-यांकडे पाठविली. जन माहिती अधिका-यांनी दि. १८.१.२००७ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे उत्तर दिले.

" भारतीय पोलीस सेवेतील अधिका-यांच्या बदल्या करण्याचे अधिकार मा. मुख्यमंत्री यांना आहेत. प्रशासकीय निकड, व्यापक जनहित व राज्यातील कायदा व सुव्यवस्था सुरळीत राखण्याच्या दृष्टीने आवश्यकता या बाबी विचारात घेऊन मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचेशी विचारविनिमय करुन याबाबत मा. मुख्यमंत्री यांच्या स्तरावर निर्णय घेतला जातो. भारतीय पोलीस सेवेतील अधिका-यांच्या बदल्या/ नियुक्त्या/ पदस्थापना याबाबतची कारणे, या विभागाच्या समक्रमांकाच्या दि. २३.११.२००६ रोजीच्या पत्रान्वये आपणांस कळविण्यात आलेली आहेत. "

अपिलकारास सक्षम प्राधिका-यांनी संबंधित फाईलवर नोंदविलेल्या कारणांच्या टिप्पणीच्या प्रती दिल्या नाहीत. मागितलेली माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलय अधिकारी यांचेकडे दि. २४.१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव, गृह विभाग, श्री. सु. ज. महाजन यांनी अपिलकाराचे प्रथम अपील श्री. रु.न.देशमुख, सह सचिव, गृह विभाग, मंत्रालय यांचेकडे हस्तांतरित केल्याचे अपिलकारास दि. ३१.१.२००७ च्या पत्रान्वये कळविले. त्यानंतर श्री.सु.ज. महाजन, सह सचिव, गृह विभाग यांनी अपिलकाराच्या प्रथम अपिलावर दि.२३.३.२००७ रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारित केले.

" अपिलकार श्री. गांधी यांना दिनांक १ जुलै,२००६ ते दिनांक ४ ऑक्टोबर,२००६ या कालावधीत भारतीय पोलीस सेवेतील अधिका-यांच्या बदल्यांबाबत कारणे नोंदविलेली टिप्पणीच्या व आदेशाच्या प्रती देण्यात याव्यात. तसेच जन माहिती अधिकारी, गृह विभाग यांनी श्री. गांधी यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यावेळी उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या आधारे माहिती दिलेली आहे. त्यामुळे त्यांना दंड करण्याची शिफारस करण्यांत येत नाही. "

वरील विवेचन लक्षात घेता अपिलकाराने मागितलेल्या माहितीच्या प्रती जन माहिती अधिका-यांनी दि.२३.३.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास उपलब्ध करुन दिलेल्या आहेत असे दिसून येते. या माहितीचे अवलोकन केले असता सदर माहिती नोव्हेंबर, २००६ पूर्वीची दिसते. ही माहिती अपिलकारास जन माहिती अधिकारी विहित कालावधीत उपलब्ध करुन देऊ शकले असते. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,

२००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. भविष्यात माहितीच्या अधिकाराच्या अर्जावर विहित कलावधीत अर्जदारास माहिती देण्याची जन माहिती अधिकारी यांनी तसेच प्रथम अपिलावर टोलवाटोलवी न करता विहित कालावधीत उचित आदेश पारित करण्याची प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशी उभयंतांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/२५१/०२**

**श्री. शैलेश गांधी** **------ अपीलकर्ता**
**बी-२, गोकुळ अपार्टमेंट,**
**आशा पारेख हॉस्पिटलजवळ,**
**सांताक्रूझ (प.), मुंबई- ४०० ५४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव,**
**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. शैलेश गांधी यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि.१३.१२.२००६ रोजी अर्ज करुन, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील भ्रष्टाचाराच्या तक्रारीच्या तपासासंदर्भात उप महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र.एसीबी/ बीएमयु/ २००६-८९, दि. २१ सप्टेंबर,२००६ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावासंदर्भात केलेल्या कार्यवाहीसंबंधी माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२१.१.२००७ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि. २१.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.३.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १८.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव, गृह विभाग, श्री. सु.ल.महाजन, जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, गृह विभाग, श्री.नि.फ.वसावे, तसेच अपिलकार श्री.शैलेश गांधी हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.शैलेश गांधी यांनी माहितीच्या अधिकारात दि. १३.१२.२००६ च्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, गृह विभाग यांनी खालीलप्रमाणे उत्तर दिले.

" महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र. एसीबी/ बीएमयु/ २००६-८९, दि.२१.९.२००६ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील भ्रष्टाचाराच्या तक्रारीच्या तपासाबाबत विशेष तपास पथकाची स्थापना करण्यासंदर्भातील प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे. तसेच महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो यांच्या प्रस्तुत पत्रावर या विभागाकडून केलेल्या कार्यवाहीबाबत आपण अर्जात नमूद केलेल्या तक्त्यात मागितलेली माहिती संबंधित नस्ती या विभागास प्राप्त होताच आपणांस देण्यांत येईल. "

मागितलेली माहिती विहित कालावधीत प्राप्त झाली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव, गृह विभाग यांचेकडे दि. २१.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो यांनी दि. २१.९.२००६ रोजी पाठविलेल्या प्रस्तावावर केलेल्या कार्यवाहीची (Action taken) तसेच यासंबंधीच्या फाईलच्या सादरीकरणाचे टप्पे, संबंधित अधिका-याचे नांव, पदनाम, त्यांनी केलेल्या कार्यवाहीचा दिनांक, सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ मधील तरतुदीनुसार विहित कालमर्यादेत सदर फाईलवर कार्यवाही केली नसल्यास अशा अधिका-या विरुध्द सुरु करण्यांत आलेल्या कारवाईच्या स्वरुपाबाबत माहिती मागितली होती. फाईलच्या Movement ची विहित तक्त्यातील माहिती जन माहिती अधिका-याने दि.१६.६.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास दिली. महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो यांच्या प्रस्तावानुसार भ्रष्टाचाराच्या तक्रारीच्या तपासाबाबत विशेष तपासणी पथक स्थापन न करता श्री.बी.के.अग्रवाल, सेवानिवृत्त अतिरिक्त मुख्य सचिव समितीकडे भ्रष्टाचाराच्या तक्रारी तपासणीकरिता सोपविण्याचा प्रस्ताव दि.२३.१.२००७ रोजी मान्य झाल्याचे दिसून येते. त्यानंतर जनहित याचिका क्र. १५६/२००६ मधील नोटीस ऑफ मोशन क्र. २०८/२००७ मध्ये मा.उच्च न्यायालयाने अंतिम आदेश प्रलंबित असल्याचे प्रस्ताव गृह विभागात प्रलंबित असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी सांगितले. महासंचालक यांनी पाठविलेला प्रस्ताव धोरणात्मक स्वरुपाचा होता. याबाबत सखोल विचाराअंती निर्णय घेण्याकरिता शासन स्तरावर बराच कालावधी लागलेला दिसतो. सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२१ मधील कलम १० च्या तरतुदी धोरणात्मक बाबीसंबंधीच्या प्रकरणी लागू नाहीत. अपिलकाराने मागितलेल्या माहितीसंबंधी जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास दि.१३.१२.२००६ च्या पत्रान्वये अंतरिम माहिती दिली. त्यानंतर

धोरणात्मक बाबींसंबंधीची नस्ती प्राप्त झाल्यानंतर अपिलकारास जन माहिती अधिकारी यांनी दि.१६ जून, २००८ च्या पत्रान्वये उत्तर दिले.

फाईल विभागात नसल्याच्या कारणावरुन जन माहिती अधिका-यांनी दि.१२.१.२००७ च्या पत्रानुसार अपिलकारास माहिती नाकारली आहे अशी अपिलकाराची तक्रार आहे. परंतु तशी वस्तुस्थिती नाही. अपिलकाराने माहिती मागितली त्याक्षणी फाईल विभागात नव्हती. संबंधित नस्ती विभागास प्राप्त होताच अपिलकारास मागितलेली माहिती देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. यावरुन असे दिसते की, फाईल शासनाच्या विचाराधीन होती. ती परत मिळाल्यानंतर माहिती देण्यात येईल असे अपिलकाराने स्पष्ट केले होते. या परिस्थितीत माहितीच्या अधिकारातील कलम ६(३) अंतर्गतचा इतर सार्वजनिक प्राधिकरणाचा मुद्दा उपस्थित होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. माहितीच्या अधिकारातील कलम ८ चा, माहिती देण्यापासून सूट देण्याचा जन माहिती अधिकारी यांनी दावाच केलेला नाही. अपिलकाराने मागितलेल्या माहितीबाबत जन माहिती अधिका-याने रितसरपणे प्रथम अंतरिम माहिती, त्यानंतर अंतिम माहिती अशी टप्प्याटप्प्याने दि.१२.१.२००७ व १६.६.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली असल्याचे स्पष्ट होते. तेव्हा जन माहिती अधिकारी यांनी असद्‌भावनेने माहिती दिली आहे असे म्हणणे उचित होणार नाही. माहिती देण्यात विलंब झाला आहे. परंतु सदर विलंब विनाकारण झालेला नाही. अपिलातील सदर वस्तुस्थिती व घटनाक्रम लक्षात घेतला असता सदर प्रकरण माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अंतर्गत येत नाही. सबब, सदर परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६७१/०२**

**श्री. रुपचंद लौंगाणी,** **------ अपीलकर्ता**
**१४७, डॉ.वेगास स्ट्रीट, २ रा मजला,**
**पो.बॉ.नं.२२६६, मुंबई- ४०० ००२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक महापालिका आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी वॉर्ड,**
**चंदनवाडी, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,**
**इमारत व कारखाने, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सी वॉर्ड, चंदनवाडी, मुंबई.** **------- उत्तरवादी**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. रुपचंद लौंगाणी यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इमारती व कारखाने), बृहन्मुंबई महानगरपालिका, सी वॉर्ड, चंदनवाडी, मुंबई यांचेकडे दि.१७.१.२००७ रोजी अर्ज करुन, डॉ.व्हिगास स्ट्रीट, काळबादेवी रोड येथील गायवाडी सदन क्र.१४७-१४९ या निवासी इमारतीत अवैधरित्या बदल करुन अनधिकृतपणे व्यापारी व्यवसाय केंद्रात रुपांतरित केल्याप्रकरणी अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक महापालिका आयुक्त, सी वॉर्ड, यांच्याकडे दि. २.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २.४.२००७ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलाची सुनावणी दि.२०.८.२००८ रोजी आयोजित करण्यात आली.

सुनावणीकरिता नोटीस यु.पी.सी.ने पाठवूनही प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी, तसेच अपिलकार हजर नव्हते.

अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकाराने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इमारती व कारखाने) यांचेकडे दि. १७.१.२००७ रोजी अर्ज करुन गायवाडी सदन येथील इमारत क्र. १४७-१४९ बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दि.२.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. १५.३.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते. महानगरपालिकेच्या २००७ च्या पूर्व तयारीच्या निवडणूक कार्यक्रमात सी विभाग येथील कर्मचारीवृंद पूर्णपणे व्यस्त होते. त्यामुळे अपिलकाराने मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाला असल्याची जन माहिती अधिका-यांनी प्रांजळपणे कबूली दिली. दरम्यानच्या कालावधीत आवश्यक ती माहिती गोळा करुन अपिलकारास दि. ६ मार्च, २००७ रोजी पोच देय डाकेने पाठविली असल्याचेही जन माहिती अधिका-यांनी सांगितले.

सन २००७ च्या महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पूर्व तयारी व नंतरच्या कामात संपूर्णपणे कर्मचारीवृंद व्यस्त होते ही बाब खरी असल्याने विलंबाने माहिती दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांना दंडित करु नये. मागितलेली माहिती अपिलकारास दि. ६.३.२००७ च्या पत्रान्वये मिळाली असल्याने ते सुनावणीकरिता हजर राहिले नाहीत असे नमूद करुन, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपील निकालात काढले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, गायवाडी सदन येथील क्र. १४७-१४९ येथील निवासी गाळयाचे व्यापारी व्यवसाय केंद्रात रुपांतरित करुन गाळेधारक महानगरपालिकेस व्यापारी तत्वावर मालमत्ता कराचा भरणा करतात याबाबत सन १९९२ चे अपील क्र. एम/९८ कडे लक्ष वेधले आहे. तसेच गाळेधारकाच्या अनधिकृत /अवैध पोटमाळयाचे बांधकाम पाडून टाकण्याबाबत

विधी विभागाचे आदेश नाहीत अशी जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास दि. ६.३.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली असल्याचे दिसून येते. मुद्दा राहतो माहिती उशिरा दिल्याबाबतचा. याबाबत महानगरपालिकेच्या सन २००७ च्या निवडणुकीच्या कामामुळे माहिती देण्यास उशीर झाल्याची जन माहिती अधिकारी यांनी कबूली दिली. असे असले तरी राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. सदर बाब लक्षात घेऊन भविष्यात अशी घटना घडणार नाही याची जन माहिती अधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यांत येत आहे. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६७२/०२**

**श्री. कनुभाई रावल,** **------ अपीलकर्ता**
**द्वारा- केन्झो एन एक्स, १४५ भुलेश्वर रोड,**
**१३९ सी, राम मंदिर बिल्डिंग,**
**मुंबई- ४०० ००२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक महापालिका आयुक्त,**
**सी वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**७६, श्रीकांत पालेकर मार्ग, मुंबई-२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**वरिष्ठ निरीक्षक (अनुज्ञापन),**
**सी वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**७६, श्रीकांत पालेकर मार्ग, मुंबई-२.** **------- उत्तरवादी**

**- विवेचन -**

अपिलकार श्री.कनुभाई रावल, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक (अनुज्ञापन) सी विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, चंदनवाडी, मुंबई यांचेकडे दि.८.१.२००७ रोजी अर्ज करुन त्यांच्या केनझो- एनएक्स, १४५ भुलेश्वर रोड, १३९-सी, राममंदिर बिल्डिंग, मुंबई येथील दुकानासमोर फेरीवाले बसतात याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१५.२.२००७ च्या पत्रान्वये अयोग्य, अपूर्ण माहिती दिली. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक महापालिका आयुक्त, सी विभाग, चंदनवाडी, मुंबई यांचेकडे दि. १३.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशानुसार माहिती प्राप्त झाली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ७ जून, २००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २०.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक, सी विभाग, श्री.के.एच.रावळ, श्री. के.डी.पाटील, तसेच अपिलकार श्री. कनुभाई रावळ हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.कनुभाई रावळ यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

(१) अपिलकाराच्या १४५ भुलेश्वर रोड येथील केनझो या दुकानासमोर फेरीवाले बसतात. त्यांना देण्यात आलेल्या (License) अनुज्ञापत्राची प्रत.

(२) अनुज्ञापत्राची वैधता (Validity of License )

(३) फेरीवाल्यांनी अनुज्ञापत्रानुसार पाळावयाचे नियम/ अधिनियम, अटी व शर्ती संबंधीची प्रत.

(४) अपिलकाराच्या दुकानासमोर फेरीवाले दुकानात जाण्याचा रस्ता अडवून बसतात हे वैध की अवैध.

(५) अपिलकाराच्या दुकानासमोरील फेरीवाले अधिकची जागा वापरतात. विक्रीच्या वस्तू टांगणी लावतात. रस्त्यावर बसतात. हे वैध की अवैध अशी माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी फेरीवाल्याच्या अनुज्ञापत्राची व इतर अनुषंगिक माहिती दिनांक १५.२.२००७ च्या पत्रान्वये दिली. सदर दिलेली माहिती अयोग्य, अपूर्ण असल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक महानगरपालिका आयुक्त, सी विभाग, यांचेकडे दि. १३.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.५.४.२००७ रोजी सुनावणी आयोजित करुन दिनांक ११.४.२००७ रोजी आदेश पारित केले. अपिलकारास अचूक व संपूर्ण माहिती एक आठवडयाच्या आत द्यावी अशा प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिकारी यांना सूचना दिल्या व तसे आदेश पारित केले. श्री.व.रा.आंबूळकर, वरिष्ठ निरीक्षक (अनुज्ञापन) यांनी अपिलकारास दि. ९.५.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. परंतु यामुळे अपिलकाराचे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने दि.७.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराच्या दुकानासमोर बसणारा फेरीवाला श्री.प्रविणचंद हरजिवनदास याच्या अनुज्ञापत्राचे नुतनीकरण करण्यांत आले. अनुज्ञापत्रक धारक फेरीवाल्यापासून उपद्रव कमी करण्याची प्रक्रिया चालू करण्यात आली. पदपथावरील अनुज्ञापत्रकधारक फेरीवाल्यांना नियमानुसार व्यवसाय करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत. तसेच हँगिंग इ. बेकायदेशीर असून, अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई करण्यांत आली. पुन्हा कारवाई करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास विलंबाने कळविले. मुख्य मुद्दा अपिलकाराच्या दुकाना समोर बसणा-या फेरीवाल्याविरुध्द कारवाई करण्याचा आहे. अपिलकारास त्यांचे दुकानात जाण्याचा रस्ता फेरीवाला अडवून बसतो. त्यामुळे अपिलकारास त्यांचे दुकानात जाण्यास अडचण होते असे दिसते. तरी या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी नियमानुसार आवश्यक ती कारवाई करुन हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपिलकारास माहिती द्यावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/३९६/०२**

**श्री. ब्रम्हदेव मिश्रा,** **------ अपीलकर्ता**
**४११, शारदा चेंबर नं.१, चौथा मजला,**
**केशवजी नाईक रोड, भट बाजार,**
**मुंबई- ४०० ००९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनियंत्रक,**
**शिधावाटप यांचे कार्यालय, डी परिमंडळ,**
**अलका बिल्डिंग, सहारा रोड,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०६९.**

**जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी,**
**शिधावाटप यांचे कार्यालय, डी परिमंडळ,**
**अलका बिल्डिंग, सहारा रोड,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०६९.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री.ब्रम्हदेव मिश्रा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी, शिधावाटप यांचे कार्यालय, डी परिमंडळ, अंधेरी, मुंबई यांचेकडे दि.१५.१.२००७ रोजी अर्ज करुन मे.अजय ऑईल सोप सेंटर यांची केरोसीन खरेदी- विक्रीची अनुज्ञाप्ती व अनामत रक्कम जप्त केल्यासंबंधीची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२५.१.२००७ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनियंत्रक, शिधावाटप यांचे कार्यालय, डी परिमंडळ, अंधेरी, मुंबई यांचेकडे दि. २३.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१६.३.२००७ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २७.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप नियंत्रक, डी परिमंडळ, अंधेरी, श्री. प्रदिप भोये, जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी, ड परिमंडळ, अंधेरी, श्रीमती उषा दिवेकर, तसेच अपिलकार श्री.ब्रम्हदेव मिश्रा हे हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.मिश्रा यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी यांचेकडे दि. १५.१.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

(१) सफेद केरोसिनची आवक ३ वर्षापासून होत नाही. परवानाधारकांनी मासिक विवरणपत्रे मुदतीत सादर केली नाहीत म्हणून उप नियंत्रक, शिधावाटप, ड परिमंडळ यांनी सदरची सफेद केरोसीनची परवाने रद्द करुन अनामत रक्कम जप्त केली आहे. नियंत्रक, शिधावाटन तसेच इतर परिमंडळातील उप नियंत्रक शिधावाटप यांनी फक्त परवाने रद्द केले. परंतु उप नियंत्रक, शिधावाटप यांनी अनामत रक्कम का जप्त केली ?

(२) अजय ऑईल ॲन्ड सोप या सेंटरने मासिक विवरणपत्रे निरंक नियमित सादर केले असताना या सेंटरचा परवाना रद्द करताना अनामत रक्कम का जप्त केली आहे ?

जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.१.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनियंत्रक, शिधावाटप, ड परिमंडळ, अंधेरी यांचेकडे दि. २३.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.६.३.२००७ रोजी सुनावणी घेऊन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. १६.३.२००७ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित केले.

" सफेद केरोसीन परवान्यासंदर्भात दि महाराष्ट्र केरोसीन डिलर्स लायसेंसिंग ऑर्डर, १९६६ च्या कलम ९ व १० मधील तरतुदीनुसार परवाना रद्द व परवानाधारकाची अनामत रक्कम जप्त करण्याच्या आदेशाबाबत पुर्नविचार करण्याचे अधिकार परिमंडळीय उपनियंत्रकांस नसल्याने, शासकीय माहिती अधिकारी, ड परिमंडळ, अंधेरी यांनी आपल्या दि. १५.१.२००७ च्या अर्जास अनुसरुन दिलेले उत्तर योग्य आहे. "

प्रथम अपिलीय अधिका-यांनी परित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

महाराष्ट्र शासनाने दि. १९.५.२००५ रोजी महाराष्ट्र फ्रिसेल केरोसिनचे विक्रेते व फेरविक्रेते (अनुज्ञापन) आदेश २००५ नव्याने पारित केले. या शासन आदेशानुसार सफेद केरोसीन परवाने नियंत्रक, शिधावाटप कार्यालय स्तरावरुन द्यावयाचे असल्याने उपनियंत्रक, शिधावाटप यांनी परिमंडळ स्तरावर दिलेले सफेद केरोसिनचे परवाने रद्द करणे क्रमप्राप्त ठरले. या नवीन आदेशानुसार अनुज्ञाप्ती नव्याने प्राप्त करणे बंधनकारक केले. त्यामुळे अजय

ऑईल सोप यांना दि. महाराष्ट्र केरोसीन डिलर्स लायसेन्सिंग ऑर्डर १९६६ अन्वये देण्यात आलेले अनुज्ञाप्ती गैरलागू ठरते. सबब, अजय ऑईल सोप यांना दिलेला परवाना रद्द करण्यावाचून अन्य पर्याय नाही. दि. महाराष्ट्र केरोसीन डिलर्स लायसेन्सिंग ऑर्डर १९६६ च्या कलम ९ व १० मधील तरतुदीनुसार उप नियंत्रक, शिधावाटप यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार अजय ऑईल सोप यांची अनुज्ञाप्ती क्र.२६ ड केडीएल (कि) ९ रद्द केली. तसेच कलम ११ नुसार प्रदान केलेल्या अधिकारानुसार अनामत रक्कम शासन जमा केली. याबाबत श्री.एस.बी.झावरे, उप नियंत्रक, शिधावाटप यांनी दि. ७.९.२००६ रोजी सविस्तर आदेश काढले. परवानाधारक अजय ऑईल सोप यांनी अनुज्ञाप्ती आदेशातील तरतुदीनुसार मासिक विवरणपत्र नियमित सादर केली नसल्याचे आढळून आले. सदर बाब लक्षात घेता उपनियंत्रक, शिधावाटप यांनी वर नमूद कारवाई नियमानुसार केली असल्याचे सदर प्रकरणी अवर सचिव, अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांनी दि. २९ जुलै, २००८ रोजी अभिप्राय दिले. सदर सर्व परिस्थिती लक्षात घेतली असता अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी नियमानुसार माहिती दिली असून, प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या आदेशात कोणताही बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२५/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६८७/०२**

**डॉ. रसिक एम. शहा,** **------ अपीलकर्ता**
**४१, सहयाद्री आरे रोड,**
**गोरेगांव (पूर्व), मुंबई- ४०० ०६३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक,**
**राज्य ग्राहक निवारण आयोग,**
**जुनी प्रशासकीय स्टाफ कॉलेज बिल्डिंग,**
**हजारीमल सोमाणी मार्ग, सी.एस.टी.समोर,**
**मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**राज्य ग्राहक निवारण आयोग,**
**जुनी प्रशासकीय स्टाफ कॉलेज बिल्डिंग,**
**हजारीमल सोमाणी मार्ग, सी.एस.टी.समोर,**
**मुंबई-४०० ००१.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार डॉ. (श्री) रसिक एम. शहा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी, राज्य ग्राहक निवारण आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे दि.२८.६.२००६ रोजी अर्ज करुन, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच/ राज्य ग्राहक मंच यांच्या कारभाराबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.७.११.२००६ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तरास अनुसरुन सुधारित माहितीचा अधिकाराचा अर्ज सादर करण्याऐवजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक, राज्य ग्राहक निवारण आयोग यांचेकडे दि. ४.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २०.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सदर सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक, राज्य ग्राहक निवारण आयोग, श्री.अ.भि.नाईक, जन माहिती अधिकारी, राज्य ग्राहक निवारण आयोग, श्रीमती आशा मारुती माने, तसेच अपिलकार डॉ. रसिक एम शहा हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार डॉ. शहा यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग यांचेकडे दि. २८.६.२००६रोजी अर्ज करुन त्यांच्या कामकाजाबाबत अनुषंगिक माहिती मागितली. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच/ राज्य ग्राहक तक्रार निवारण मंच यांच्याकडे मुंबई टेलिफोन निगम लि., बजाज इलेक्ट्रीकल, केबल ऑपरेटर, पॉलिक्लिनिक, एम.डी. रेडीओलॉजिस्ट अशा विविध संस्था व्यक्तिंविरुध्द विविध केसेस तक्रार निवारण मंचाकडे दाखल केल्या आहेत. यु.सी.पी.ए. ॲक्ट १९८६, सी.पी. एस. रुल्स १९८७ नुसार तक्रार निवारण मंचाकडे दिलेल्या अधिकाराचा दुरुपयोग करण्यात येत असल्याचे व त्यांच्या तक्रारीचे समाधानकारक निवारण होत नसल्याबाबत अपिलात नमूद केले असल्याचे दिसून येते. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी काही माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच/ राज्य ग्राहक तक्रार निवारण मंच यांच्याकडे विविध मुद्दयांबाबत विविध संस्था/ व्यक्तिंविरुध्द तक्रारी दाखल केल्या असल्याचे त्यांच्या अपिलावरुन /अर्जावरुन दिसून येते. त्यांच्या तक्रारीवर जिल्हा/ राज्य तक्रार निवारण मंचाकडून सुनावणी आयोजित करुन वारंवार पुढे ढकलण्यांत आल्या. विरोध पक्षावर ते सुनावणीकरिता हजर नसलाना काही कारवाई करण्यांत आली नाही. त्यामुळे फोरम नियम/ अधिनियमानुसार कार्यपध्दतीचा अवलंब करीत नसून कायद्याने दिलेल्या अधिकाराचा गैरवापर करण्यात येत असल्याची अपिलकाराची तक्रार दिसते. तेव्हा मंचाकडे अपिलकाराने नोंदविलेल्या अर्जात नमूद केलेल्या तक्रारी विचारात घेऊन जिल्हा/ राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती तसेच प्रचलित अधिनियमानुसार चालत असलेल्या आयोगाच्या कामाबाबतच्या पारदर्शकतेसंबंधी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक, राज्य तक्रार निवारण आयोग यांनी माहिती द्यावी. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७४६/०२**

**श्री. अली असगर मोहम्मद तहसिलदार,** **------ अपीलकर्ता**
**२९/२६, न्यु कलेक्टर कंपाऊंड,**
**गेट नं.७, मालवणी मालाड (प.),**
**मुंबई- ४०० ०६५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त,,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/उत्तर विभाग, लिबर्टी गार्डन, मामलेदार वाडी,**
**मालाड (प.), मुंबई-४०० ०६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,**
**इमारत व कारखाने, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/उत्तर विभाग, लिबर्टी गार्डन, मामलेदार वाडी,**
**मालाड (प.), मुंबई-४०० ०६४.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री.अली असगर मोहमद तहसिलदार, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का.), पी/उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मालाड, मुंबई यांचेकडे दि. १५.३.२००७ रोजी अर्ज करुन सीटी सर्व्हे क्र.६३, सीटीएस २२५४, हिस्सा क्र.३, राथोडी व्हिलेज सनविला, बी.ण्न.डी. ग्रीन हाऊस, इंगवले बंगल्यासमोर झालेले अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि.२१.५.२००७ रोजी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक महानगरपालिका आयुक्त यांचेकडे दि. १६.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २२.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, पी/उत्तर

विभाग, श्री.एम.एम.क्षीरसागर, जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, श्री. विजयकुमार शाह तसेच अपिलकार श्री.अली असगर मोहमद तहसिलदार हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.अली असगर मोहमद तहसिलदार यांनी माहितीच्या अधिकारात दि.१५.३.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, पी/उत्तर विभाग यांचेकडे अर्ज करुन सीटी सर्व्हे क्र.६३, सीटीएस २२५४, हिस्सा क्र.३, राथोडी व्हिलेज, मालाड येथे अनधिकृतपणे केलेले बांधकाम निष्कासित करण्याबाबत मागणी केली होती. सदर मोकळया जागेवर झालेल्या अनधिकृत बांधकामावर महानगरपालिका अधिनियम, ३५१ अन्वये नोटीस कारवाई करण्यात आली आहे असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि,२१.५.२००७ च्या पत्रान्वये उत्तर दिले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, पी/उत्तर विभाग, यांचेकडे दि. १६.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. आदेश पारित केले नाहीत.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, सीटी सर्व्हे क्र.३३, सीटीएस क्र.२२५४, हिस्सा क्र.३, राथोडी व्हिलेज, सनविला, बी.ण्न.डी. ग्रीन हाऊस, इंगवले बंगल्यासमोरील अनधिकृत बांधकामावर महापालिका अधिनियम, ३५१ अन्वये नोटीस कारवाई करण्यांत आली. यामुळे बांधकाम व्यवसायिक श्री.सोहेल ए.मर्चंट, पाटील व मोहम्मद रजा यांनी मा.शहर दिवाणी न्यायालयात धाव घेतली. या प्रकरणी महानगरपालिकेच्या विधी विभागाचा सल्ला घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येत असल्याचे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२५.८.२००८ रोजी लेखी अहवाल सादर केला. सदर परिस्थिती लक्षात घेता मा.शहर दिवाणी न्यायालयात सदर प्रकरणी होणारा निर्णय अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी कळवावा.

**आदेश**

**सबब, अपील निकालीात काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२२/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६६७/०२**

**श्री. चंद्रकांत वसंत परब,** **------ अपीलकर्ता**
**मध्यवर्ती वैद्यकीय संदर्भ ग्रंथालय,**
**ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय,**
**भायखळा, मुंबई- ४०० ००८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक,**
**वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन,**
**मुंबई शासकीय दंत महाविद्यालय**
**सेंट जॉर्जेस हॉस्पिटल कंपाऊंड, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन,**
**मुंबई शासकीय दंत महाविद्यालय**
**सेंट जॉर्जेस हॉस्पिटल कंपाऊंड, मुंबई-४०० ००१.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. चंद्रकांत परब यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेकडे दि.५.२.२००७ रोजी अर्ज करुन ग्रंथपाल, सहायक ग्रंथपाल, ग्रंथसूचीकार, प्रलेखाकार यांच्या ज्येष्ठतासूची संबंधीची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि. २६.२.२००७ च्या पत्रान्वये दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेकडे दि.८.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी आयोजित करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २४.३.२००७ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २०.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता नोटीस

यु.पी.सी.ने पाठवूनही प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई डॉ.डब्लू.बी.तायडे, जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई हे हजर नव्हते. अपिलकार श्री.चंद्रकांत परब हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.चंद्रकांत परब यांनी माहितीच्या अधिकारात दि. ५.२.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

(१) ग्रंथपाल, सहायक ग्रंथपाल, ग्रंथसूचीकार, प्रलेखाकार यांच्या ज्येष्ठता यादीची प्रत.

(२) श्री. कुमार दशरथ घाटुळे यांना पदोन्नती देताना कोणते निकष वापरण्यात आले. पदोन्नतीसाठी सादर केलेल्या टिप्पणीची प्रत.

(३) अपिलकारास पदोन्नती देतांना कोणते धोरण स्विकारण्यात आले.

ज्येष्ठतासूचीच्या छायांकित प्रतीसाठी रु.२६/- शुल्क संचालनालयाच्या रोख शाखेत भरण्यात यावेत. त्यानंतर प्रत देण्यात येईल. श्री.घाटुळे यांना पदोन्नती देण्यासाठी सादर केलेल्या टिप्पणीची कार्यालयीन वेळेत पहाणी करावी. पदोन्नती देतांना प्रत्येक व्यक्तिसाठी वेगळे धोरण स्वीकारले जात नाही. सेवा प्रवेशातील नियमातील तरतुदी नुसार पात्र कर्मचारी व ज्येष्ठतासूचीनुसार पदोन्नती दिली जाते अशी जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास दि.२६.२.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. परंतु यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेकडे दि. ८.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. ग्रंथपाल, सहायक ग्रंथपाल, ग्रंथसूचीकार, प्रलेखाकार यांच्या ज्येष्ठता यादीची प्रत अपिलकारास देण्यात आली. श्री. घाटुळे यांना पदोन्नती देण्यात आली त्या टिप्पणीचे अपिलकाराने स्वतः अवलोकन केले असता त्यामध्ये श्री.घाटुळे यांचे नांव नाही. श्री.घाटुळे यांचे नांव असलेली टिप्पणी पाहिजे असा अपिलकाराने युक्तिवाद केला. सदर टिप्पणीची प्रत अपिलकारास देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने श्री. कुमार दशरथ घाटुळे यांच्या पदोन्नती करिता सादर केलेल्या टिप्पणीची प्रत मागितली आहे ती त्यांना देण्यात यावी. सन १९९१ नंतर सहायक ग्रंथपाल पदावर पदोन्नती दिलेल्या कर्मचा-यांच्या नावाची यादी द्यावी. मुख्य मुद्दा अपिलकारास पदोन्नती देण्याबाबतचा दिसतो. अपिलकारास पदोन्नती मिळाली नसल्याने त्यांना पदोन्नती द्यावी म्हणून एकूण १३ अर्ज दिलेले दिसतात. तरी अपिलकाराच्या पदोन्नतीबाबत अपिलकारास जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत सविस्तर माहिती द्यावी. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२२/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६७५/०२**

**श्री. मोहन अनंत खोत,** **------ अपीलकर्ता**
**५९६/४७, गंगाराम निवास,**
**ना.म.जोशी मार्ग, भायखळा (प.)**
**मुंबई- ४०० ०२७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य अभियंता (उत्तर),**
**एम.बी.आर.आर.बोर्ड, मुंबई-४०० ०१४.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**ई विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**मुंबई-४०० ०३३.** **------- उत्तरवादी**

## - विवेचन -

अपिलकार श्री. मोहन अनंत खोत, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ई विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, काळाचौकी, मुंबई यांचे कडे दि.६.३.२००७ रोजी अर्ज करुन, ५९६, गंगाराम निवास, भायखळा, मुंबई-२७ इमारतीच्या गच्चीच्या दुरुस्तीसंबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१४.८.२००७ च्या पत्रान्वये दिलेली माहिती अपूर्ण असल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता (उत्तर) सोनावाला बिल्डिंग, शिंदेवाडी, दादर, मुंबई यांचेकडे दि. ३.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१८.४.२००७ रोजी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिका-यांनी कारवाई केली नाही, माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २१.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम

अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता (उत्तर) मुंबई, श्री.पी.पी.त्रिवेदी, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ई विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई तसेच अपिलकार श्री. मोहन खोत हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री. मोहन खोत यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ई विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांचेकडे दि.६.३.२००७ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

(अ) ५९६, गंगाराम निवास, भायखळा, मुंबई-२७ इमारतीच्या गच्चीच्या दुरुस्ती अंदाजपत्रकात आर्किटेक्टचे नांव, पत्ता व त्याची फी याचा उल्लेख नाही. त्याची माहिती देण्याबाबत.

(ब) सदरहू अंदाजपत्रकात " w.c.Block " च्या दुरुस्तीचा समावेश कसा करण्यात आला याची माहिती (w.c.Block दुरुस्ती २००४-०५ मध्ये सदरहू इमारतीची म्हाडातर्फे दुरुस्ती चालू असतानाच करण्यात आलेली आहे याची नोंद घ्यावी.)

(क) क्रमांक (ब) मधील निकृष्ट दर्जाच्या झालेल्या दुरुस्ती कामामुळे सतत गेली दोन वर्षे w.c.Block च्या भिंतीतून सांडपाण्याच्या गळतीमुळे इमारतीचे होणारे नुकसान व रहिवाशंना होणारा त्रास याबाबत सातत्याने काळाचौकी म्हाडा कार्यालयाला सप्टेंबर, २००५ पासून लेखी कळविण्यांत आले असून त्याची अद्यापि कार्यवाही न झाल्याची माहिती.

(ड) क्रमांक (क) बेजबाबदार कामास जबाबदार व्यक्तिचे नाव, हुद्दा व पत्ता याची माहिती.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी दि. १४.३.२००७ च्या पत्रान्वये अपुरी माहिती दिली. क, ड ची माहिती नाकारली. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने उ प मुख्य अभियंता, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, यांचेकडे दि.३.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१८.४.२००७ रोजी सुनावणी आयोजित करुन पुढीलप्रमाणे आदेश पारित केले.

" माहितीच्या अर्जातील क व ड बाबत कार्यकारी अभियंता यांनी तक्रारीबाबत ५९६, गंगाराम इमारत, भायखळयाच्या गच्चीच्या दुरुस्तीची अर्जदारासमवेत पहाणी करावी. सन २००५ मध्ये ज्या एजन्सीमार्फत दुरुस्तीचे काम करण्यात आले आहे त्यामध्ये दोष आहेत का, डब्लू सी ब्लॉक मधून लिकेज आहे का ? सदर लिकेज/ दुरुस्ती कामातील दोष दूर करण्याच्या दृष्टीने संबंधित एजन्सीकडून दुरुस्तीचे काम करुन घ्यावे व दोष दूर करुन अपिलकारास सुधारित माहिती द्यावी. "

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, ५९६ गंगाराम निवास, भायखळा या इमारतीच्या गच्चीच्या दुरुस्तीचे काम मे. दिपक कोतवाल आणि असोसिएट यांनी केले आहे. परंतु निकृष्ट दर्जाच्या झालेल्या दुरुस्ती कामामुळे सतत गेली दोन वर्षे डब्लू. सी. ब्लॉकच्या भिंतीतून सांडपाण्याच्या गळतीमुळे इमारतीचे नुकसान होत असून रहिवाशांना त्रास होतो. त्यामुळे याबाबत काळाचौकी म्हाडा कार्यालयात सप्टेंबर, २००५ पासून लेखी कळविण्यांत आले असून, दुरुस्तीची कार्यवाही करण्यात येत नाही अशी अपिलकाराची मुख्य तक्रार आहे. संबंधित एजन्सीकडून कामाची दुरुस्ती केली किंवा कसे याबाबत अपिलातील कागदपत्रावर माहिती उपलब्ध नसल्याने अपिलीय अधिका-यांनी दि. १८.४.२००७ च्या आदेशानुसार दिलेल्या सूचनासंबंधी केलेल्या कारवाईची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत अपिलकारास द्यावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२१/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७४७/०२**

**श्री. एरिक लुईस गोन्सालवीस,** **------ अपीलकर्ता**
**राजपूत रिअलेटर्स कंपाऊंड,**
**राठोडी गांव, मालाड मार्वे रोड,**
**मालाड (प.), मुंबई- ४०० ०९५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/ उत्तर विभाग कार्यालय, मालाड (प.), मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/ उत्तर विभाग कार्यालय, मालाड (प.), मुंबई.**

**------- उत्तरवादी**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. एरिक लुईस गोन्सालवीस**,** यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, पी/उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मालाड, मुंबई यांचेकडे दि. १४.३.२००७ रोजी अर्ज करुन राठोडी व्हिलेज मधील सर्व्हे क्र.७७ व ६८ मधील २० वर्षांपूर्वी झाडांची अमानुषपणे कत्तल करणा-यावर ताबडतोबीने उचित कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, आर/उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, लिबर्टी गार्डन, मालाड, मुंबई यांचेकडे दि. १६.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २२.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, पी/उत्तर विभाग, श्री. एम.एम.क्षीरसागर, जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, श्री.विजयकुमार शहा हे हजर होते. सुनावणीची नोटीस यु.पी.सी.ने पाठवूनही अपिलकार सुनावणीकरिता हजर नव्हते.

अपिलकार श्री. एरिक लुईस गोन्सालवीस यांनी माहितीच्या अधिकारात दि. १४.३.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

" राठोडी व्हिलेज मधील सर्व्हे क्र.७७ तसेच सर्व्हे क्र.६८ मधील २० वर्षापूर्वीची जुनी मोठी झाडे राजपूत रिअलेटर्स प्रा.लि. यांनी दि. २८.२.२००७ रोजी बुलडोझरने तोडून टाकली असून, जमीन काही बांधकामासाठी वापरण्याची शंका व्यक्त करुन यासंबंधी एकूण १० मुद्यांची अनुषंगिक माहिती मागितली होती. "

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात राठोडी व्हिलेज, मालाड (प.) येथील सर्व्हे क्र.७७ व सर्व्हे क्र.६८ मधील जुनी २० वर्षापूर्वीची झाडे राजपूत रिअलेटर्स प्रा.लि. यांनी बुलडोझर लावून तोडली आहेत. त्यांच्या विरुध्द नियमानुसार कठोर कारवाई करण्याची अपिलकाराची मुख्य मागणी दिसते. तसेच यासंबंधी अपिलकाराने अनुषंगिक १० मुद्यांबाबत माहिती मागितली. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहित कालावधीत अपिलकारास माहिती दिली नाही, ही गंभीर बाब आहे. तरी या प्रकरणी मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून अपिलकारास मागणीप्रमाणे आवश्यक माहिती ३० दिवसांचे आत जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी. भविष्यात माहिती अधिकाराच्या अर्जासंबंधी विहित कालावधीत माहिती देण्याची जन माहिती अधिकारी यांनी दक्षता घ्यावी. प्रथम अपिलावर विहित कालावधीत सुनावणी आयोजित करुन उचित आदेश पारित करण्याची प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशी उभयतांना समज देण्यात येत आहे. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,/दिनांक :-२२/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६७७/०२**

**श्री. अशोककुमार मारुती शिंदे,** **-------अपीलकर्ता**
**अवंती अंबर बिल्डिंग, अंबर तळमजला,**
**आ.दा.रोड., मलबार हिल, मुंबई- ४०० ००६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**इलाखा शहर,सार्वजनिक बांधकाम विभाग**
**मुंबई विकास विभाग इमारत, ३ रा मजला,**
**जुने जकात घर आवार, मुंबई-४०० ०२३.** **--------उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. अशोककुमार मारुती शिंदे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इलाखा शहर, सार्वजनिक बांधकाम विभाग, जुने जकात घर, मुंबई यांचेकडे दि. २८.३.२००७ रोजी अर्ज करुन विभागीय लेखापाल यांनी नोंदविलेल्या आक्षेपा बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांचेकडे दि.१४.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२१.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक ाअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई, श्री. अ.ब.गायकवाड, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इलाखा शहर, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री.एच. एस. पाटील तसेच अपिलकार श्री.अशोककुमार शिंदे हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.अशोककुमार शिंदे यांनी माहितीच्या अधिकारात दि.२८.३.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इलाखा शहर, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांचेकडे खालील माहिती मागितली.

(१) करारनामा करण्यापूर्वी बेरोजगार अभियंता, मजूर सोसायटी व निविदा यांचे प्रमाण ३३%, ३३%, ३४% प्रमाणाबाबत विभागीय लेखापालांनी घेतलेल्या आक्षेपाची प्रत. (२) सन २००४ ते २००७ या आर्थिक वर्षातील निविदांची संख्या, बेरोजगार अभियंत्यांना किती, मजूर सोसायटयांना किती तसेच निविदामार्फत किती करारनामाची संख्या, (३) सी.ओ.पी. साठी मोठया रकमेचे रोखीने चेक काढलेल्या रकमेबाबत विभागीय लेखापालांनी घेतलेला आक्षेप, (४) सर्वश्री कथळे, परदेशी, चव्हाण, गायकवाड, इतर शाखा अभियंता, उप विभागीय अभियंता मोजमापे स्वहस्ते न लिहिता इतर अनधिकृत व्यक्तिकडून लिहून घेतात याबाबत शासनाची परवानगी आहे का ? कार्यकारी अभियंता यांना अधिकार दिले आहेत का ? विभागीय लेखापाल यांनी घेतलेल्या लेखा आक्षेपाची प्रत, (५) सन २००४ ते २००७ या कालावधीत भांडारावर झालेल्या खर्चाची प्रत्येक उप विभाग/ शाखानिहाय माहितीची प्रत. (६) अंदाज व बिले मंजूर करताना निविदा काढलेल्या साहित्यासाठी रिबीटने टक्केवारी कशी मंजूर केली त्याची प्रत, शासनाकडून मंजुरी घेतली का ? त्याची प्रत.

वरील विवेचन लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास माहिती द्यावी व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अन्यथा, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० (१) मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द शास्तीची कारवाई करण्यात येईल. भविष्यात माहितीच्या अर्जावर विहित कालावधीत माहिती देण्याची जन माहिती अधिकारी यांनी तसेच प्रथम अपिलावर विहित कालावधीत सुनावणी आयोजित करुन उचित आदेश पारित करण्याची दक्षता घ्यावी अशी उभयतांना समज देण्यात येत आहे.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२१/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१६८/०२**

**श्री. कौस्तुभ दत्तात्रय गोखले,** **------ अपीलकर्ता**
**सिध्दी विनायक प्रसाद,**
**डॉ.शामाप्रसाद मुखर्जी रोड,**
**डोंबिवली (पूर्व), ता.कल्याण,**
**जि.ठाणे- ४२१ २०१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा निबंधक,**
**उच्च न्यायालय, मुंबई यांचे कार्यालय,**
**उच्च न्यायालय, मुंबई ३ ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उच्च न्यायालय, मुंबई यांचे कार्यालय,**
**उच्च न्यायालय, मुंबई - ४०० ०३२.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. कौस्तुभ दत्तात्रय गोखले, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे दि.२४.४.२००६ रोजी अर्ज करुन मुंबई उच्च न्यायालयात दाखल विविध दाव्यात याचिकाकर्ता अथवा सामनेवाले यांनी दाव्यात दाखल केलेली कागदपत्रे बनावट व खोटी आहेत असे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर न्यायालयाने याबाबत केलेल्या कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा निबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे दि.२१.५.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २.९.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २६.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी, उच्च न्यायालय, मुंबई हे हजर होते. सुनावणीची नोटीस युपीसीने दि.२.८.२००८ रोजी पाठवूनही अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.कौस्तुभ गोखले यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी, उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे दि. २४.४.२००६ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली.

(१) मुंबई उच्च न्यायालयात दाखल विविध दाव्यात याचिकाकर्ता अथवा सामनेवाले यांनी दाव्यात दाखल केलेली कागदपत्रे बनावट व खोटी आहेत असे न्यायालयाच्या निदर्शनास आणू दिल्यानंतर न्यायालयाने याबाबत केलेल्या कारवाईची माहिती मिळावी.

(२) गेले १० वर्षात एकूण किती दाव्यांमध्ये उपरोक्त बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आली याची वार्षिक विगतवारी मिळावी व त्यावर करण्यात आलेल्या कारवाईची माहिती मिळावी.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत मागितलेली माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. २१.५.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, न्याय व्यवस्थेला लागू करण्याची बाब विचाराधीन होती. सदर माहितीचा अधिकार कायदा उच्च न्यायालयास दि.९.१२.२००६ पासून लागू करण्यात आला. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची अंमलबजावणी करण्याकरिता मा. उच्च न्यायालयाने दि.१६.१२.२००४ च्या अधिसूचनेनुसार उच्च न्यायालय व उच्च न्यायालयाच्या अधिपत्याखालील इतर न्यायालयात जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी पदनिर्देशित (Desigaate) करण्यात आले. अपिलकाराने दि. २४.४.२००६ च्या अर्जान्वये माहितीच्या अधिकारात सादर केलेला अर्ज उच्च न्यायालयात (Appllete Side) प्राप्त झाला नसल्यामुळे माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी लेखी उत्तर सादर केले. अपिलकाराचे दि.२९ मे,२००६ चे प्रथम अपील उच्च न्यायालयात दि.३० मे,२००६ रोजी प्राप्त झाले. त्यावेळी माहितीचा अधिकार कायदा उच्च न्यायालयात लागू करण्यात आला नव्हता. सदर कायद्याची अंमलबजावणी करण्याकरिता जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी पदनिर्देशित करण्यात आले नव्हते. दि. १६.१२.२००६ च्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द केल्यानुसार जन माहिती/ प्रथम अपिलीय अधिकारी पदनिर्देशित करण्यांत आले. सदर वस्तुस्थिती लक्षात घेता अपिलकाराने सादर केलेल्या प्रथम अपिलावर कार्यवाही झालेली नाही. वर नमूद केलेली वस्तुस्थिती लक्षात घेता द्वितीय अपील

अमान्य करण्यांत यावे अशी जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी लेखी उत्तर सादर करुन विनंती केली. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, देशातील सर्व राज्यांमध्ये दि.१२.१०.२००५ पासून लागू केला. सदर बाब लक्षात घेता सदर कायदा लागू झाल्यानंतर अपिलकाराने दि.२४.४.२००६ रोजी अर्ज केला. त्यानंतर दि.२१.५.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर कायद्याच्या अंमलबजावणीकरिता मा. उच्च न्यायालयाने आता दि.१६.१२.२००६ च्या राजपत्रान्वये प्रथम अपिलीय अधिकारी/जन माहिती अधिकारी पदनिर्देशित केले आहेत. या परिस्थितीत अपिलकाराने मागितलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्या पासून ४५ दिवसांच्या आंत अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२६/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१६९/०२**

**श्री. कौस्तुभ दत्तात्रय गोखले,** **------ अपीलकर्ता**
**सिध्दी विनायक प्रसाद,**
**डॉ.शामाप्रसाद मुखर्जी रोड,**
**डोंबिवली (पूर्व), ता.कल्याण,**
**जि.ठाणे- ४२१ २०१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा निबंधक,**
**उच्च न्यायालय, मुंबई यांचे कार्यालय,**
**उच्च न्यायालय, मुंबई ३ ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उच्च न्यायालय, मुंबई यांचे कार्यालय,**
**उच्च न्यायालय, मुंबई - ४०० ०३२.** **------- उत्तरवादी**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. कौस्तुभ दत्तात्रय गोखले, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी, उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे दि. २४.४.२००६ रोजी अर्ज करुन ६५ व ६५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांचे एकूण किती खटले गेले १५ वर्षात प्रलंबित आहेत याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा निबंधक, उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे दि.२१ मे, २००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२.९.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २६.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, उच्च न्यायालय, मुंबई, श्री. ए.एस.स्वामी, प्रथम अपिलीय अधिकारी तथा निबंधक, उच्च न्यायालय, मुंबई हे हजर होते. सुनावणीची नोटीस दि. ३१.७.२००८ रोजी यु.पी.सी.ने पाठवूनही अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.कौस्तुभ गोखले यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी, उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे दि. २४.४.२००६ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

(१) वय वर्षे ६५ व ६५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांच्या उच्च न्यायालयातील दाव्यासंबंधी त्यांच्या नावासमोर वय नमूद करण्याबाबत संबंधित व्यक्ती/ वकीलांना मा. उच्च न्यायालयाने दि. १.१२.२००३ च्या नोटीसी नुसार सूचना दिल्या आहेत. त्याप्रमाणे अभिलेख तयार झाले असल्यास त्याची प्रत.

(२) दि. १.१२.२०००३ च्या नोटीसीप्रमाणे ६५ व ६५ वर्षावील ज्येष्ठ नागरिकांचे एकूण किती खटले गेले १५ वर्षात प्रलंबित आहेत. त्याची वर्षवार विगतवारी मिळावी. तसेच किती दाव्याबाबत निकाल लागले व किती प्रलंबित आहेत, याची विगतवारी.

अपिलकाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २.९.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, दि.१२.१०.२००५ पासून देशातील सर्व राज्यांना लागू केला. सदर कायदा न्याय व्यवस्थेला लागू करण्याची बाब विचाराधीन होती. दि.९.१२.२००६ पासून हा कायदा मा.उच्च न्यायालय व त्यांचे अधिपत्याखालील इतर न्यायालयांना लागू करण्यांत आला. या कायद्याची अंमलबजावणी करण्याकरिता मा. उच्च न्यायालयाने दि. १६.१२.२००६ च्या राजपत्रात प्रसिध्द केल्यानुसार जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी पदनिर्देशित केली. अपिलकाराचा अर्ज दि. २४.४.२००६ व प्रथम अपील दि. २१.५.२००६ चे म्हणजे दि. १६.१२.२००६ च्या राजपत्रापूर्वीचे असल्याने त्यावर कार्यवाही झालेली नाही. सदर वस्तुस्थिती लक्षात घेऊन द्वितीय अपील गुणवत्तेनुसार अमान्य करण्यात यावे असे जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी लेखी उत्तर सादर करुन युक्तिवाद केला.

मा. उच्च न्यायालय व त्यांचे अधिपत्याखालील न्यायालयांना उशिराने म्हणजे दि. ९.१२.२००६ पासून केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम लागू करण्यांत आला. अपिलकाराने यापूर्वीच अर्ज करुन, प्रथम अपील दाखल करुन माहिती मागितली, असा मुद्दा उपस्थित करुन अपिलकाराची मागणी नाकारणे उचित होणार नाही. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, दिनांक १२ ऑक्टोबर, २००५ पासून देशात लागू करण्यांत आला आहे. सदर बाब लक्षात घेता मा. उच्च न्यायालयातील ज्येष्ठ नागरिकांच्या दाव्याबाबतची अनुषंगिक माहिती अपिलकाराने मागितली आहे. सदर माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांच्या आत अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२६/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६७६/०२**

**श्री. रमाकांत एन.पुरंदरे,** **------ अपीलकर्ता**
**वसंत निवास, के.डब्लू. चितळे पथ,**
**दादर, मुंबई- ४०० ०२८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सह सचिव/ उप सीचव,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**निवास व्यवस्था नियंत्रक व अवर सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासकीय कुटीर क्र.८, फ्री प्रेस जर्नल मार्ग,**
**मंत्रालय, मुंबई -४०० ०२१.** **------- उत्तरवादी**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. रमाकांत एन.पुरंदरे**,** यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा निवास व्यवस्था नियंत्रक व अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई यांचेकडे दि.१३.११.२००६ रोजी अर्ज करुन वसंत निवास मागील बाजूस असलेली तळमजल्यावरील खोली, दादर गल्ली, भवानी शंक रोड, दादर, मंबई या जागेबाबतची अधिग्रहनातून मुक्ततेबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह/ उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि. २.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ५.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २१.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सदर सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, श्री.प्र.या.बैले, जन

माहिती अधिकारी तथा निवास व्यवस्था नियंत्रक, व अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, श्री. एम.के.भोये हजर होते. सुनावणीची नोटीस यु.पी.सी.ने पाठवूनही अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.रमाकांत पुरंदरे यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा निवास व्यवस्था नियंत्रक व अवर सचिव यांचेकडे दि. १३.११.२००६ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

"वसंत निवास मागील बाजूस असलेली तळमजल्यावरील खोली, दादर गल्ली, भवानी शंक रोड, दादर, मंबई जागेबाबतची अधिग्रहनातून मुक्ततेबाबतच्या आदेशाची प्रत. दावा क्र. सी-४/आर-९/बी-११६/वसंत निवास, दि. २४.११.१९५४, क्र. सी-४/आर-९/बी-११६, वसंत निवासी, दि. २३.१२.१९५४, जमीन मालकास दरमहा रु.१२.०८ मोबदला निश्चित केल्याबाबतच्या पत्राची प्रत."

अपिलकाराने मागितलेली माहिती शोधणे सोईचे व्हावे म्हणून अधिगृहीत जागेसंबंधी काही विस्तृत कागदपत्रे उदा. जागेचे वाटप आदेश, शासकीय वाटपदाराचे नांव, खाते क्रमांक अथवा जागेबाबतची कागदपत्रे अपिलकाराकडे जन माहिती अधिकारी यांनी दि. १२.१२.२००६ च्या पत्रानुसार मागितली. अपिलकाराने दि.९.१.२००७ च्या पत्रान्वये काही कागदपत्र जन माहिती अधिका-यास दिली. जागेबाबतच्या दस्तऐवजाचा कार्यालयामध्ये शोध घेण्यात आला. त्याबातच्या नोंदी कार्यालयामध्ये कोठेही आढळून आल्या नाहीत. त्यामुळे अपिलकारास माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी दि. १२.२.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले.

जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, यांचेकडे दि. २.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. १७.३.२००७ रोजी सुनावणी घेतली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, अपिलकार हजर होते. अपिलकाराने दि. २.२.२००७ च्या पत्रासोबत सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे कार्यालयामध्ये पुन्हा जाणिवपूर्वक शोध घेण्यात आला. परंतु, संबंधित कागदपत्रे आढळून आली नाहीत. अपिलकाराच्या म्हणण्यानुसार सदर जागा सन १९५३-५४ मध्ये अधिग्रहित झाली.

अपिलकाराने मागणी केलेल्या जागेबाबतच्या नोंदी कार्यालया मधील दस्तऐवजामध्ये कोठेही आढळून न आल्यामुळे अपिलकारास मागणीप्रमाणे कागदपत्र उपलब्ध करुन देता आली नाहीत. हा जन माहिती अधिका-यांचा निर्णय कायम ठेवून प्रथम अपिलीय अधिका-यांनी प्रथम अपील खारीज केले.

वरील विवेचन लक्षात घेता अपिलकाराने मागणी केलेली कागदपत्र उपलब्ध करुन देण्याकरिता जन माहिती अधिका-यांनी जाणिवपूर्वक शोध घेतला असता त्यांना आवश्यक ती कागदपत्र शोधूनही उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे अपिलकाराची मागणी योग्य प्रकारे विचार न करता फेटाळण्यात आली आहे असे आढळून येत नाही. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यात जन माहिती अधिका-यांनी कुचराई केलेली दिसून येत नाही. अशा परिस्थितीत जन माहिती अधिका-यांनी दिलेले उत्तर, त्यावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेला निर्णय यामध्ये फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२६/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६६६/०२**

**श्री. अरुण गणपत भोवर,**
**रुम नं.५३२६, इमारत क्र. १६७,**
**अरुण निवारा सहकारी संस्था मर्या.**
**कन्नमवार नगर नं.१,**
**विक्रोळी (पूर्व), मुंबई- ४०० ०८३.**

**------ अपीलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपनिबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन,वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**विभागीय सहायक निबंधक, सहकारी संस्था,**
**मुंबई विभाग, मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,**
**जी.पी.ओ.समोर, मुंबई -४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव/अध्यक्ष,**
**अरुण निवारा सहकारी संस्था मर्या.**
**बिल्डिंग नं.१६७, कन्नमवार नगर नं.१,**
**विक्रोळी (पूर्व), मुंबई- ४०० ०८३.**

**------- उत्तरवादी**

## - विवेचन -

अपिलकार श्री. अरुण गणपत भोवर व श्री.सुभाष तुकाराम पाटकर, यांनी जन माहिती अधिकारी तथा सचिव, अरुण निवारा सहकारी गृहनिर्माण संस्था, बि.क्र.१६७, कन्नमवार नगर क्र.१, विक्रोळी यांचेकडे दि.२२.४.२००७ व दि.२७.४.२००७ रोजी अर्ज करुन भागपत्र का दिले नाही, यासंबंधीची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने समाधानकारक माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे, मुंबई यांचेकडे दि.२७.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१६.५.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. परंतु आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.११.६.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२०.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-१ श्री. बी.के.हांडे तसेच अपिलकार श्री.अरुण भोवर व श्री.सुभाष पाटकर हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.अरुण भोवर व श्री.सुभाष पाटकर यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा सचिव, अरुण निवारा सहकारी गृहनिर्माण संस्था, बि.क्र.१६७, कन्नमवार नगर क्र.१, विक्रोळी यांचेकडे दि.२७.४.२००७ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

(१) अपिलकार अरुण निवारा सहकारी संस्थेचे मूळ सभासद असूनही मागणी करुनसुध्दा त्यांना संस्थेचे भागपत्र अद्याप का दिले नाही याचा खुलासा.

(२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,१९६० चे कलम १०१ अन्वये आदेशाप्रमाणे श्री.भोवर यांची रु. १९,२६०/- व श्री.पाटकर यांची रु,३०,८२९/- रक्कम घेण्यास कोणत्या ठरावाद्वारे नाकारली.

(३) अपिलकार संस्थेची मासिक वर्गणी संस्थेच्या बँकेतील खात्यावर नियमितरित्या भरतात. तरी त्याची पावती व नोंद दिली नाही. अपिलकारास थकबाकीदार दाखविले जाते. अपिलकाराने भरलेल्या रकमेचा लेखापरिक्षक अहवालात उल्लेख का करीत नाहीत याची माहिती.

(४) केस क्र.सीसी III /८००/१९८५, केस क्र.सीसी III/८०१/१९८५ या न्यायालयीन प्रकरणची माहिती.

(अ) वरील दोन्ही न्यायालयीन प्रकरणे मागे घेताना अरुण निवारा सहकारी संस्था आणि विरुध्द पार्टी-५ सभासद यांच्यात झालेला लेखी करार व न्यायालयाने त्याला दिलेली मान्यता यासंबंधीची माहिती.

(ब) न्यायालयाने दिलेला निर्णय व कोणत्या अटी मान्य करुन न्यायालयीन प्रकरण मागे घेतले याची माहिती.

(क) वरील दोन्ही न्यायालयीन प्रकरणात अपिलकार आरोपी होते. अपिलकारास अज्ञानात ठेऊन फसवून प्रकरण कोणत्या नियमाने मागे घेतले.

(ड) वरील दोन्ही प्रकरण सहकारी न्यायालयात दाखल करताना उपनिबंधक सहकारी संस्था यांची घेतलेली मान्यता, त्याच्या फोटो प्रती.

अपिलकाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा सचिव, अरुण निवारा को.ऑप.हौ. सोसायटी लि. कन्नमवार नगर क्र.१, विक्रोळी, मुंबई यांनी दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय

अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे, मुंबई यांचेकडे दि.२७.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलावर दि.१६.५.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.११.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता अपिलकाराने दि.२२.४.२००७ व २७.४.२००७ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती विहित कालावधीत जन माहिती अधिका-याने उपलब्ध करुन दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी प्रथम अपिलावर सुनावणी आयोजित करुनही आदेश पारित केले नाहीत. अपिलकार सर्वश्री भोवर व पाटकर यांनी जुलै ते मार्च,२००० व जानेवारी,८४ ते मार्च,२००० पर्यंतचे धनादेश संस्थेला दिले आहेत. परंतु, संस्थेने रितसर पावती दिलेली नाही. एप्रिल,२००० ते ऑगस्ट, २००१ कालावधीचे धनादेश संस्थेला दिले. परंतु संस्था धनादेश स्वीकारत नाही. म्हणून उपनिबंधक सहकारी संस्था यांनी रक्कम परस्पर बँकेत संस्थेच्या खाती जमा करण्याबाबत अपिलकारास सूचना दिल्या. त्यानुसार अपिलकारांनी बँकेत संस्थेच्या खात्यावर परस्पर रकमा जमा केल्या. अपिलकारांनी त्यांची राहिलेली थकबाकी भरली नाही तर दोन्ही सभासदांचे विरुध्द कारवाई करण्यात येईल असे जन माहिती अधिकारी तथा सचिव, अरुण निवारा सहकारी गृहनिर्माण संस्था, यांनी अपिलकारास कळविल्याचे दिसते. सदर परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे, मुंबई यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत प्रथम अपिलावर आदेश पारित करण्यांत यावेत. अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी. अरुण निवारा सहकारी संस्था सहकार्य करीत नसल्यास आवश्यकतेप्रमाणे संस्थेविरुध्द महाराष्ट्र सहकार कायद्यानुसार कारवाई करावी अशी आयोगाची शिफारस आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२९/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६६९/०२**

**श्री. राजेंद्र श्रीराम विरकर,** **------ अपीलकर्ता**
**डी-५७, धर्मनगर इं.व को.ऑप.हौ.सो.लि.**
**शिवसृष्टी कॉलनी, कुर्ला (पूर्व),मुंबई- ४०० ०८३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-१.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. राजेंद्र श्रीराम विरकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा अपर निबंधक (वसूली व नियोजन) सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे यांच्याकडे दि. ९.११.२००६, ३०.११.२००६ व दि. १.१२.२००६ रोजी अर्ज करुन श्री. कैलास वाबळे, उप निबंधक, सहकारी संस्था, एल विभाग, मुंबई यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी परवानगी मागितली होती. जन माहिती अधिका-याने माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांच्याकडे दि. १६.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ५.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २०.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, श्री.सी.बी.चौधरी, जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था, पुणे, श्री.मिलिंद टांकसाळे तसेच अपिलकार श्री.राजेंद्र विरकर हे हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.राजेंद्र विरकर यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था, पुणे, यांच्याकडे अर्ज करुन श्री.कैलास वाबळे, उप निबंधक, सहकारी संस्था, एल विभाग, मुंबई यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी परवानगी मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. १६.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही.

अपिलकाराचा दि.३०.११.२००६ चा माहितीच्या अधिकाराखाली दाखल केलेला अर्ज सहकार आयुक्तालय, पुणे यांच्याकडे पाठविण्यांत आला. सदर अर्जावर श्री.मिलिंद टांकसाळे शासकीय माहिती अधिकारी, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि. १६.१.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. अपिलकाराने दि. १६.२.२००७ च्या अपील अर्जात श्री.कैलास वाबळे, उप निबंधक, सहकारी संस्था, एल विभाग, मुंबई आणि श्री. सुभाष काशीकर, अपर निबंधक, (वसूली व नियोजन) सहकारी संस्था, पुणे यांच्याविरुध्द शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ नुसार कार्यवाही करण्याबाबत विनंती केली. अपिलकाराच्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने सहकार आयुक्त, निबंधक, सहकारी संस्था, म.रा.पुणे यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या असल्याचे श्री.सी.बी.चौधरी, उप सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, यांनी दि.२.३.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले.

अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता असे दिसून येते की, धर्मनगर इं.व को.ऑप.हौ.सो.लि , कुर्ला या प्रकरणी श्री. के.बी.वाबळे उप निबंधक, सहकारी संस्था यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील तरतुदीनुसार कार्यवाही न करता संस्थेच्या माजी सचिवांविरुध्द संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याबाबत कळविले. यामुळे संबंधित तक्रारदराने त्याची नाहक बदनामी झाल्याचे तक्रारीत नमूद केले. संस्थेविरुध्द वैधानिक कार्यवाही करणे आवश्यक असतानाही त्याचा वापर न करता श्री.वाबळे यांनी प्रशासकीय स्वरुपाची कार्यवाही केली. म्हणून श्री.वाबळे यांना भविष्यात अशा प्रकारची सदोष कार्यवाही होणार नाही याची दखल घेण्याबाबत त्यांना दि. ५.६.२००८ च्या ज्ञापना अन्वये कडक समज देण्यात आली असल्याचे दिसून येते.

अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ५.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल करुन शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध करण्यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम, २००५ प्रकरण (३) अन्वये संबंधित प्राधिकारी आणि इतर अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द कलम १० (३) नुसार शिस्तभंगाची केलेली कार्यवाही याचा तपशील मिळण्याबाबत मागणी केली होती. सहकार आयुक्त, तथा निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अपिलकाराच्या मागणीप्रमाणे संबंधित अधिका-यांविरुध्द कार्यवाही केली असल्याचे दिसून येते. परंतु याबाबतची माहिती अपिलकारास उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. तरी या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून अपिलकाराने मागणी केलेली माहिती ३० दिवसांच्या आंत अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी.

**<u>आदेश</u>**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-३०/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/५०८/०२**

**श्री. राजेश मलिक,** **------ अपीलकर्ता**
**राजधानी डेअरी फार्म वैसंत रोड,**
**खोतवाडी, सांताक्रूझ, मुंबई- ४०० ०५४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सहायक महापालिका आयुक्त,**
**एच/पश्चिम विभाग,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**सांताक्रूझ (पश्चिम) मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,**
**एच/पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सांताक्रूझ (पश्चिम) मुंबई.** **------- उत्तरवादी**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. राजेश मलिक, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालयाकडे दि.२४.११.२००६ रोजी अर्ज करुन सांताक्रूझ येथील पंचशील अपार्टमेंट, ५२० तळमजला येथे श्री.मोहमद आय. पटेल हे अवैधरित्या बांधकाम करीत असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. सदर प्रकरणी माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता सहायक अभियंता (इ.व का.) एच/पूर्व, प्लॉट नं.१३७, टी.पी.एफ.५, प्रभात कॉलनी, सांताक्रूझ, मुंबई यांना नेमण्यात आले असल्याचे, तसेच अपिलकाराचा अर्ज त्यांचेकडे पाठविला असल्याचे व अपिलीय अधिकारी तथा सहायक अभियंता, एच/ पूर्व विभाग असल्याचे महापालका आयुक्तांच्या स्वीय सहायकाने अपिलकारास दि.४.१२.२००६ च्या पत्रान्वये कळविले. जन जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही, त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक अभियंता, सांताक्रूझ (पूर्व) यांचेकडे दि. २७.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे

दि. २८.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १५.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणी करिता जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, एच/पूर्व, सांताक्रूझ हे हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलकाराने मागितलेली माहिती सहायक अभियंता, एच/पश्चिम, सांताक्रूझ यांचे कार्यालयाशी संबंधित असल्याने अपिलकाराचा दि.२४.११.२००६ चा अर्ज त्या कार्यालयाकडे पाठविला. सदर बाब लक्षात घेऊन या प्रकरणी सुनावणी पुढे ढकलण्यात आली व दि. १८.८.२००८ रोजी आयोजित करण्यांत आली. सदर सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक महापालिका आयुक्त, एच (पश्चिम) विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सांताक्रूझ (प.), मुंबई तसेच अपिलकार यांना यु.पी.सी.ने सुनावणीची नोटीस पाठविण्यांत आली. परंतु सुनावणीकरिता कोणीही हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकाराने दि.२४.११.२००६ च्या अर्जान्वये सांताक्रूझ (प.)येथील ५२० तळमजला पंचशील अपार्टमेंट, पहिली हसनाबाद लेन येथे श्री.मोहमद पटेल हे अवैधरित्या बांधकाम करतात. त्याबाबतची अनुषंगिम माहिती मागितली होती. एच/ पश्चिम विभाग यांनी महानगरपालिका अधिनियम कलम ३५१ अनुसार श्री.पटेल यांना नोटीस दिली होती. त्यानंतर श्री.पटेल यांनी न्यायालयाकडून स्थगिती मिळविली. या प्रकरणाचा एच/पश्चिम विभाग आणि आयुक्त, महानगरपालिका कार्यालय यांच्यामध्ये झालेल्या संपूर्ण पत्रव्यवहाराच्या प्रतिंची अपिलकाराने दि.२४.११.२००६ च्या अर्जान्वये मागणी केली होती. सदर अवैध बांधकामाबाबत अपिलकाराने सहायक अभियंता, एच/पूर्व विभाग, महानगरपालिका कार्यालय, सांताक्रूझ यांचेकडे माहिती मागितली होती. सदर प्रकरण एच/पूर्व विभागाशी संबंधित नसल्याने अपिलकाराचा माहितीच्या अधिकारातील दि.२४.११.२००६चा अर्ज जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, एच/पश्चिम विभाग यांचेकडे पुढील आवश्यक

कार्यवाहीसाठी पाठविला असल्याचे दि.१५.७.२००८ च्या सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, एच/पूर्व विभाग, श्री.व्ही. जे. देसाई यांनी सांगितले. त्यामुळे सदर प्रकरणी सुनावणी पुढे ढकलून दि. १८.८.२००८ रोजी ठेवली. सदर सुनावणी करिता एच/पश्चिम विभागाचे अधिकारी हजर झाले नाहीत. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, एच/पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सांताक्रूझ (प.) यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-३०/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६९६/०२**

**श्रीमती जयश्री चंद्रकांत बाबर, ------ अपीलकर्ता**
**अजना इस्टेट, चाळ नं.१२, रुम नं.४,**
**भाटीया हॉस्पिटलसमोर, भांडूप व्हिलेज रोड,**
**भांडूप (पश्चिम), मुंबई- ४०० ०७८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
**राज्य मानवी हक्क आयोग,**
**ॲडमिनिस्ट्रेटीव्ह स्टाफ कॉलेज कंपाऊंड,**
**हजारीमल सोमाणी मार्ग,**
**सी.एस.टी.समोर, मुंबई -४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा निबंधक,**
**राज्य मानवी हक्क आयोग,**
**ॲडमिनिस्ट्रेटीव्ह स्टाफ कॉलेज कंपाऊंड,**
**हजारीमल सोमाणी मार्ग,**
**सी.एस.टी.समोर, मुंबई -४०० ००१. ------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्रीमती जयश्री चंद्रकांत बाबर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा निबंधक, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग यांच्याकडे दि.३.५.२००७ रोजी अर्ज करुन प्रकरण क्र.२०४४ संबंधी भांडूप व तुर्भे पोलिसांच्या विरोधात केलेल्या तक्रार अर्जावर राज्य मानवी हक्क आयोगाने केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाच्या प्रती मिळण्याबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१६.५.२००७ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव, राज्य मानवी हक्क आयोग यांचेकडे दि. ६.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २७.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव, राज्य मानवी हक्क आयोग, श्री.मफीऊल हुसेन, जन माहिती अधिकारी तथा निबंधक, राज्य मानवी हक्क आयोग, श्री.लक्ष्मीकांत टिकें, तसेच अपिलकार श्रीमती जयश्री बाबर हे हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्रीमती जयश्री बाबर यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा निबंधक, राज्य मानवी हक्क आयोग यांचेकडे दि. ३.५.२००७रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

(१) दि. २५.११.२००२ रोजी केस नं.२०४४/०२ मध्ये दि. १९.३.२००३ व दि. ४.२.२००४ रोजी भांडूप व तुंर्भे पोलिसांच्या विरोधातील दिलेल्या तक्रार अर्जाच्या पूर्ण रिपोर्टच्या/ चौकशीच्या प्रती.

(२) दि. ४.१०.२००६ ची केस नं.९४६/१६/०६-०७ मध्ये केस दि. १६.१०.२००६ ला बोर्डावर घेतली. मुंबई पोलीस आयुक्तांनी तक्रार दडपलीच्या विरोधातील तपासाचा/ चौकशी रिपोर्टच्या प्रती.

अपिलकारास दि. ३.५.२००७ च्या अर्जानुसार नक्की कोणता अहवाल/ माहिती हवी आहे हे स्पष्ट होत नाही. याबाबत स्पष्टीकरण द्यावे. अथवा आयोगाच्या कार्यालयात हजर होऊन प्रकरणाशी संबंधित कागदपत्रांची तपासणी करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य शुल्क भरुन प्राप्त कराव्यात असे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास दि. १६.५.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपिलकाराचे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने दि. ६.६.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव, राज्य मानवी हक्क आयोगाकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १८.६.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीची दि.१२.६.२००७ ची नोटीस अपिलकारास दि.१९.६.२००७ रोजी मिळाल्याने अपिलकार सुनावणीकरिता उपस्थित राहू शकले नाहीत. अपिलकाराने माहिती दिली नाही. सुनावणीकरिता Short Notice देऊन बोलाविले. यामुळे अपिलकार सुनावणीस हजर राहू शकले नाहीत. यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता अपिलकारास दि. ३.५.२००७ च्या अर्जानुसार नेमकी कोणती माहिती हवी आहे याचा जन माहिती अधिका-यांना बोध झाला नाही. त्यामुळे संबंधित कागदपत्रांची व्यक्तिशः

तपासणी करुन माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता अपिलकारास जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयात बोलाविले. परंतु अपिलकार कागदपत्र तपासणीसाठी कार्यालयात हजर झाल्या किंवा कसे हे अपिलातील कागदपत्रावरुन खातरजमा होत नाही. तरी या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधित कागदपत्रांची तपासणी करावी. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी मागणीनुसार उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती विहित शुल्क आकारुन अपिलकरास द्याव्यात.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-३०/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६९८/०२**

**श्रीमती जयश्री चंद्रकांत बाबर, ------ अपीलकर्ता**
**अजना इस्टेट, चाळ नं.१२, रुम नं.४,**
**भाटीया हॉस्पिटलसमोर, भांडूप व्हिलेज रोड,**
**भांडूप (पश्चिम), मुंबई- ४०० ०७८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी, वांद्रे कार्यालय,**
**जिल्हा भ्रष्टाचार विरोधी कमिटी,**
**मुंबई उपनगर जिल्हा, वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**जिल्हाधिकारी, वांद्रे कार्यालय,**
**जिल्हा भ्रष्टाचार विरोधी कमिटी,**
**मुंबई उपनगर जिल्हा, वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१. ------- उत्तरवादी**

## - विवेचन -

अपिलकार श्रीमती जयश्री चंद्रकांत बाबर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांचेकडे दि.३.५.२००७ रोजी अर्ज करुन दि.१९.६.२००६ च्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांचेकडे दि.८.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य

माहिती आयोगाकडे दि.२१.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२७.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीची नोटीस यु. पी.सी.ने पाठवूनही प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपिलकार श्रीमती बाबत सुनावणीसाठी हजर होत्या.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकाराने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांचेकडे दि.३.५.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

दि.१९.६.२००६ रोजी कर्नल डॉ.रमेश वासुदेव, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन महाराष्ट्र यांच्या वतीने अपिलकाराने तक्रार अर्ज करुन चौकशी अहवालाची मागणी केली होती. अपिलकाराचा दि.१९.६.२००६ चा अर्ज अभिलेखाची पडताळणी करुनही प्राप्त झाल्याचे दिसून आलेला नाही. त्यामुळे अपिलकारास माहिती पुरविणे शक्य नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१०.५.२००७ च्या पत्रान्वये कळविले. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांचेकडे दि.७.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.६.२००७ रोजी द्वितीयअपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने दि. १९.६.२००६ रोजी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडे तक्रार अर्ज केला. त्यांचे पती श्री. चंद्रकांत बाबत यांनी अपिलकाराचा हुंडयासाठी छळ करुन घटस्फोट झाला नसताना दुसरे लग्न केले. अपिलकार व त्यांच्या मुलाची फसवणूक केली. श्री.चंद्रकांत बाबर नाव बदलून मा.मंत्री, सहकार यांच्या कार्यालयात स्वीय सहायक म्हणून कार्यरत आहेत. मा.उच्च न्यायालयात केलेली तक्रार प्रॉसिक्यूटरमार्फत केस चालविण्याचे न्यायाधिशांच्या सचिवाने अपिलकारास कळविले. श्री.झी. व्ही. कोंगडमकर, निबंधक यांनी अपिलकारास सेशन कोर्टात वकीलामार्फत रीव्हीजन केस चालविण्याबाबत कळविण्यात आले असे अपिलकाराने दि.१९.६.२००६ च्या अर्जात नमूद केलेले दिसते. यावरुन अपिलकार व त्यांचे पती श्री.चंद्रकांत बाबर यांच्यातील कौटुंबिक वाद दिसतो. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांचेकडे या कौटुंबिक वादासंबंधी माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित दिसून येत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२७/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६९९/०२**

**श्रीमती जयश्री चंद्रकांत बाबर,** **------ अपीलकर्ता**
**अजना इस्टेट, चाळ नं.१२, रुम नं.४,**
**भाटीया हॉस्पिटलसमोर, भांडूप व्हिलेज रोड,**
**भांडूप (पश्चिम), मुंबई- ४०० ०७८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त प्रबंधक,**
**लोक आयुक्तांचे कार्यालय, पहिला मजला,**
**नविन प्रशासकीय इमारत,**
**मंत्रालयासमोर, मुंबई -४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रबंधक,**
**लोक आयुक्तांचे कार्यालय, पहिला मजला,**
**नविन प्रशासकीय इमारत,**
**मंत्रालयासमोर, मुंबई -४०० ०३२.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्रीमती जयश्री चंद्रकांत बाबर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रबंधक, लोक आयुक्तांचे कार्यालय, मुंबई यांचेकडे दि.५.५.२००७ रोजी अर्ज करुन पती विरोधात अपिलकाराने दि.२.३.१९९३ व दि. २८.१०.२००५ रोजी लोक आयुक्त कार्यालयात केलेल्या तक्रारीसंबंधी चौकशी करुन अंमलबजावणी न करता प्रलंबित ठेवल्या. यासंबंधीच्या अहवालाची मागणी केली. जन माहिती अधिका-याने दि.३१.५.२००७ च्या आदेशान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त प्रबंधक, लोक आयुक्त कार्यालय, मुंबई यांचेकडे दि.१५.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२८.६.२००७ रोजी सुनावणी आयोजित करुन दि.१३.७.२००७ रोजी सविस्तर आदेशं पारित केले. दरम्यान अपिलकाराने राज्य माहिती आयोगा कडे दि.२१.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर

दि.२७.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रभारी निबंधक, लोक आयुक्त कार्यालय, मुंबई श्री.स.ता.राणे तसेच अपिलकार श्रीमती जयश्री बाबर उपस्थित होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्रीमती बाबर यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रबंधक, लोक आयुक्तांचे कार्यालय, मुंबई यांचेकडे दि.५.५.२००७ रोजी अर्ज करुन पुढीलप्रमाणे माहिती मागितली होती. अपिलकाराने त्यांचे पती विरोधात दि.२.३.१९९३ व दि. २८.१०.२००५ रोजी लोक आयुक्त कार्यालयात केलेल्या तक्रारीसंबंधी चौकशी करुन अंमलबजावणी न करता प्रलंबित ठेवल्या. याबाबत माहिती मागितली होती.

अपिलकाराने सन १९९३ मध्ये क्र.उलोआ/कॉम/११०४/१९९३ (एन एस बी) अन्वये तक्रार नोंदविली होती. तक्रार मोघम स्वरुपाची होती. त्या समर्थनार्थ अपिलकाराने शपथपत्र दाखल केले नाही. त्यामुळे अपिलकाराची तक्रार दि.२३.३.१९९४ रोजी निकालात काढली. सन १९९३ ची प्रकरणे तीन वर्षाहून अधिक कालावधीची असल्याने लोक आयुक्त कार्यालयाने नष्ट केली. त्यामुळे याबाबत अपिलकारास माहिती देणे शक्य नाही. दि. २८.१०.२००५ च्या तक्रारीसंबंधीची कागदपत्र अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध करुन दिली व तसे दि.३१.५.२००७ च्या आदेशान्वये अपिलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रभारी प्रबंधक, लोक आयुक्त कार्यालय यांचेकडे दि. १५.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २८.६.२००७ रोजी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले. दरम्यान अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी दि. २८.१०.२००५ च्या तक्रार क्रमांक उलोआ/ कॉम/६६४४/२००५ (टे.२०) बाबतची माहिती दि. २०.७.२००७ च्या पत्रान्वये पुरविण्यात आली. तक्रार क्र. उलोआ/ कॉम/११०४/१९९३ (एन.एस.बी.) संबंधीची कागदपत्र तीन वर्षाहून अधिक कालावधीची असल्याने ती लोकआयुक्त कार्यालयाने नष्ट केली असल्याने याबाबतची माहिती, जन माहिती अधिकारी देऊ शकत नाहीत. यावरुन सदर प्रकरणी जन माहिती अधिका-याने माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत कार्यवाही केली असून, प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील निकालात काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२७/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७४५/०२**

**श्री.अब्दुल कादीर अन्सारी,** ------ **अपीलकर्ता**
**४/२९, मार्गदर्शन, एन.एस.फडके रोड,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०६९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,**
**पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, पापु-०१,**
**मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, पापु-०१,**
**मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.** ------- **उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. अब्दुल कादीर अन्सारी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडे दि.८.५.२००७ रोजी अर्ज करुन सन १९९७ मध्ये अपिलकारास निलंबित करुन विभागीय चौकशी का करण्यात आली नाही याबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.५ जून,२००७ च्या पत्रान्वये दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडे दि. १३.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२६.६.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ९.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २२.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्री.सु.वि.कोळेकर,

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्री.श.वि.दुर्वे हे हजर होते. सुनावणीची नोटीस यु.पी.सी.ने पाठवूनही अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिका-यांनी सादर केलेला लेखी अहवाल व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.अब्दुल कादीर अन्सारी यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिका-यांकडे दि.८.५.२००७ रोजी अर्ज करुन अपिलकारास सन १९९७ मध्ये निलंबित करुन विभागीय चौकशी का करण्यात आली नाही याबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी खालीलप्रमाणे माहिती दिली.

" आपणावर म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९ नुसार दि. १४ ऑगस्ट, १९९७ च्या आदेशान्वये आपणाविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली होती. तथापि, त्यानंतर आपणांस मुदतपूर्व सेवानिवृत्त करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने विभागीय चौकशीची कार्यवाही करण्यांत आली नाही. "

जन माहिती अधिका-यांनी खोटी माहिती दिली म्हणून अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव यांचेकडे दि. १३.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली.

" आपणांस दि. ५.६.२००७ च्या पत्रान्वये पाठविण्यात आलेली माहिती ही विभागात उपलब्ध कागदपत्र व अभिलेख्याच्या आधारे माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे माहिती अधिका-याविरुध्द कार्यवाही करण्याबाबतची आपली विनंती मान्य करता येत नाही. "

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकार श्री. अन्सारी यांना अनधिकृतपणे कार्यालयात गैरहजर रहाण्याच्या कारणावरुन दि. ४ जून, १९९७ च्या आदेशान्वये निलंबित करण्यांत आले होते. त्यानंतर त्यांना दि. ४.११.२००७ च्या ज्ञापनान्वये शासकीय सेवेत तात्काळ रुजू होण्याबाबत कळविले. अपिलकाराचे निलंबन दि. १० जून, १९९८ च्या आदेशान्व्ये रद्द करण्यांत आले. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ६५ च्या पोटनियम (१) बी खालील परंतुकान्वये नियुक्ती प्राधिका-यांना तीस वर्षाची अर्हताकारी सेवा झालेल्या कर्मचा-यांना लोकहिताच्यादृष्टीने सेवानिवृत्त करता येते. सदर अधिकारात अपिलकारास दि.३१.१.२००० पासून सेवानिवृत्त करण्यात आले. या परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती लक्षात घेऊन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या निर्णयात कोणताही बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई/दिनांक :-२२/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७०३/०२**

**श्री. विजय के.मंथेना,** **------ अपीलकर्ता**
**इमारत क्र.७, रुम क्र.३४,**
**अब्दुल मेन्शन वेल्फेअर सोसायटी,**
**हरियानावाला लेन, स्टेशन रोड,**
**कुर्ला (प.), मुंबई- ४०० ०७०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एल विभाग,**
**१ ला मजला, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत,**
**सं.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (प.),मुंबई -४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,**
**इमारत व कारखाने,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एल विभाग,**
**१ ला मजला, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत,**
**सं.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (प.),मुंबई -४०० ०३२.** **--------उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. विजय के.मंथेना, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का.) एल विभाग/ बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय, कुर्ला, मुंबई यांचेकडे दि.१७.२.२००७ रोजी अर्ज करुन श्री.दिगंबर मा.नाईक यांनी त्रिभुवनदास इमारत क्र.८, तळमजला +१ अशा स्वरुपाचे किंग्ज नावाचे दुकानाचे अनधिकृत बांधकाम केले याबाबत अनुषंगिक १० मुद्दयांबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि. १२.३.२००७ च्या पत्रान्वये दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय

अधिकारी तथा सहायक आयुक्त, एल विभाग/ बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय, कुर्ला, मुंबई यांचेकडे दि. ७.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचे प्रथम अपिलीय अधिका-यांनी समर्थन केले. माहिती मिळाली नसल्याने अपिलकाराने दि.१८.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२७.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का.) एल विभाग/ बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय, कुर्ला, मुंबई, श्री.नि.भा.फुटाणे, श्री.पी.के.कांबळे तसेच अपिलकार श्री.विजय मंथेना हे हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री. विजय मंथेना यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. १७.२.२००७ रोजी अर्ज करुन दि. दिगंबर मा. नाईक यांनी अनधिकृतपणे केलेल्या बांधकामासंबंधी एकूण १० मुद्दयांबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने अपिलकारास दि.१२.३.२००७ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने तसेच प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता श्री. दिगंबर नाईक यांनी त्रिभुवनदास इमारत क्र.८ तळमजला + १ अशा स्वरुपाचे किंग्जशुज नावाचे दुकानाचे बांधकाम केले. तसेच हे दुकान सार्वजनिक मलनिःस्सारण वाहिनीच्यावर बांधण्यात आले. याबाबत अपिलकाराने दि. २८.६.२००६ रोजी केलेल्या तक्रारीनुसार म.न.पा.अधिनियम, ३५१ अन्वये नोटीस बजावली असून, पुढील कायदेशीर कारवाई चालू असल्याचे अपिलकारास दि.२५.७.२००६ च्या पत्रान्वये तसेच सदर बांधकामास कोठल्याही प्रकारची परवानगी देण्यात आलेली नाही असे दि.१२.५.२००६ च्या पत्राने जन माहिती अधिका-याने कळविले. तसेच श्री. नाईक यांनी मलनिःस्सारण वाहिनीवरील बांधकाम स्वतःहून काढून टाकले अशी माहिती दिली. किंग्जशूज दुकानाचे बांधकाम अधिकृत असून त्याचे अभिलेख दिले. कोणतेही बांधकाम दि. ४.१२.२००६ रोजी करण्यात आलेले नसून फक्त मलनिःस्सारण वाहिनीवरील बांधकाम काढून टाकण्यात आले. तसेच काढून

टाकण्यात आलेले बांधकाम अनधिकृत नव्हते अशी दि. १२.३.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिलेली दिसते. सदर बांधकाम अनधिकृत नव्हते तर या बांधकामास परवानगी दिली होती का ? बांधकाम अनधिकृत नव्हते तर म.न.पा.अधिनियम, ३५१ अन्वये नोटीस का बजावण्यात आली. याचा अपिलातील कागदपत्रावरुन बोध होत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, वर नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तरातील विसंगती दिसून येते. हे लक्षात घेता सदर विसंगती दूर करुन सदर बांधकाम अधिकृत की अनधिकृत याबाबत अनुषंगिक माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती द्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२७/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६३८/०२**

**श्री.प्रदीप नाईक,** **------ अपीलकर्ता**
**१९-ए, चुन्नीलाल चाळ,**
**ए.जी.पवार, लेन नं.२,**
**भायखळा (पूर्व), मुंबई- ४०० ०२७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य,**
**डॉ.आंबेडकर कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड**
**इकॉनॉमिक्स, वडाळा, मुंबई -४०० ०३१.**

**जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक,**
**डॉ.आंबेडकर कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड**
**इकॉनॉमिक्स, वडाळा, मुंबई -४०० ०३१.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. प्रदीप नाईक, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक, डॉ.आंबेडकर कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड इकॉनॉमिक्स, वडाळा, मुंबई यांचेकडे दि. २.१२.२००६ रोजी अर्ज करुन महाविद्यालयाच्या दुरुस्ती आणि इतर बाबीवर गेल्या ६ वर्षात एकूण किती खर्च केला याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य डॉ.आंबेडकर कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड इकॉनॉमिक्स, वडाळा, मुंबई यांचेकडे दि. ५.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दि. १३.२.२००७ रोजी सकाळी ११.३० ते दुपारी १.३० या वेळेत भेटण्याबाबत दि. १७.१.२००७ च्या पत्रान्वये

विनंती केली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १३.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, डॉ. आंबेडकर कॉलेज, वडाळा, मुंबई, डॉ. सिध्दार्थ रा. कांबळे, जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक, ॉ. आंबेडकर कॉलेज, वडाळा, मुंबई, तसेच अपिलकार श्री.प्रदीप नाईक हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.प्रदीप नाईक यांनी माहितीच्या अधिकारात दि.२.१२.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक, डॉ.आंबेडकर कॉलेज, वडाळा, मुंबई यांचेकडे अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

(१) महाविद्यालय दुरुस्ती

(२) संगणक खरेदी

(३) रंग रंगोटी

(४) पटांगण दुरुस्ती

(५) फर्निचर खरेदी/ दुरुस्ती

(६) बगिच्यावर केलेला खर्च

(१) महाविद्यालयाने दुरुस्ती आणि इतर बाबींवर एकूण किती खर्च केला ?

(२) खर्च करण्यापूर्वी कोणाची मंजुरी घेतली ?

(३) मंजुरी घेतलेल्या बैठकीचे इतिवृत्त

(४) प्रत्येक बाबीवर केलेल्या खर्चाचे ठेकेदार कोण होते त्यांची नांवे व पत्ते ?

(५) ठेकेदारास शासनाची मान्यता आहे काय ? असल्यास मान्यतेची प्रत.

(६) प्रत्येक बाबीवर सन २००० ते २००१ पासून अर्थिक वर्षनिहाय आणि प्रत्येक बाब निहाय झालेल्या खर्चाचे स्वतंत्र विवरण पत्र तयार करण्यांत यावे.

जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक डॉ. आंबेडकर कॉलेज, वडाळा, मुंबई, यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, डॉ. आंबेडकर कॉलेज, वडाळा, मुंबई, यांचेकडे दि. ५.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. सुनावणी आयोजित केली नाही. परंतु माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास कॉलेजमध्ये दि. १३.२.२००७ रोंजी सकाळी ११.३० ते दुपारी १.३० या वेळेत प्रत्यक्ष भेटण्याबाबत कळविले होते. त्यानुसार अपिलकार प्रथम अपिलीय अधिका-यांना भेटले किंवा कसे हे अपिलातील कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. तेव्हा या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत अपिलकारास मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१३/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६८६/०२**

**श्रीमती पुष्पा जोहार,** **------ अपीलकर्ता**
**६२, साईनारा, कफ परेड,**
**कुलाबा, मुंबई- ४०० ००५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त,**
**अे वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**मिंट रोड, आर.बी.आय.जवळ,**
**फोर्ट, मुंबई -४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक अभियंता (इमारत व कारखाने),**
**अे वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**मिंट रोड, आर.बी.आय.जवळ,**
**फोर्ट, मुंबई -४०० ००१.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्रीमती पुष्पा जोहार, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इमारत व कारखाने), ए विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, फोर्ट, मुंबई यांचेकडे दि. ९.४.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती. नवीन सर्व्हे क्र.९७६५ कीटरीज रोड, १७ कफ परेड, कुलाबा, मुंबई-१ येथील साईनारा इमारतीच्या आवारातील प्लॉट क्र.९ आणि १० येथील पार्कींगच्या मोकळया जागेत शेड बांधण्यात आले. (१) लोखंडी शेडच्या बांधकामाकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या परवान्याची सविस्तर माहिती. (२) सदर शेड बांधकामासाठी परवानगी दिली असल्यास सर्व संबंधित कागदपत्रांसह परवान्याची साक्षांकित प्रत, (३)परवानगी दिली नसेल तर बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर शेड व शेड मालकाविरुध्द करण्यात आलेल्या कारवाईची साक्षांकित प्रत, (४) बृहन्मुंबई

महानगरपालिकेने शेड विरोधात कार्यवाही केली नसल्यास त्याबाबतच्या कारणाच्या कागदपत्राच्या प्रतींची मागणी केली होती. याबाबतची माहिती कार्यालयात उपलब्ध नाही असे जन माहिती अधिका-याने दि. २७.४.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले.

यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, ए विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, फोर्ट, मुंबई यांचेकडे दि. २१.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ४.६.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीकरिता उपस्थित असल्याने सुनावणी झाली नाही. त्यानंतर पुन्हा सुनावणी आयोजित करण्यांत आली नाही. आदेश पारित करण्यात आले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २०.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा विशेष सहायक आयुक्त, ए विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, फोर्ट, मुंबई, तसेच अपिलकार श्रीमती पुष्पा जोहर हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, साईनारा इमारतीच्या आवारातील पार्कीगच्या मोकळया जागेत शेड बांधकाम बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या परवानगीने केले किंवा कसे याबाबतची अनुषंगिक माहिती अपिलकाराने मागितली आहे. तेव्हा या प्रकरणी शेड मालकाने सदर बांधकामास महानगरपालिकेची परवानगी घेतली होती किंवा कसे याबाबतची अनुषंगिक माहिती अपिलकारास उपलब्ध करुन देण्याचा मुख्य मुद्दा आहे. याबाबतची माहिती कार्यालयात उपलब्ध नाही एवढे उत्तर देवून मुद्दा संपत नाही. तक्रारीबाबत योग्य त्या यंत्रणेमार्फत तपासणी करुन तक्रारीची शहानिशा करणे हे जन माहिती अधिका-याच्या कर्तव्याचाच एक भाग आहे. तरी या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, कथित शेड बांधकामाबाबत अपिलकाराने मागितलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६८०/०२**

**श्री.प्रदीप शंकर चव्हाण,** **------ अपीलकर्ता**
**३३/३७, वरळी बी.डी.डी.चाळ,**
**डॉ.जी.एम.भोसले मार्ग,**
**वरळी, मुंबई- ४०० ०१८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई -४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**उत्तर मुंबई विभाग, अंधेरी, मुंबई.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री.प्रदीप शंकर चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उत्तर मुंबई विभाग, अंधेरी, मुंबई यांचेकडे दि.३.१.२००७ रोजी अर्ज करुन, शा.नि.क्र.सीएटी-०१/०५/प्र.क्र.२६/इमारती-२, दि.३१.३.२००५ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई यांचेकडे दि.३.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांकडून पूर्णपणे माहिती मिळाली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२१.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,

सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री.अ.ब.गायकवाड, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री.एस.एम.लोलगे, तसेच अपिलकार श्री.प्रदीप चव्हाण हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.प्रदीप चव्हीाण यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, यांचेकडे दि. ३.१.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

" दि. ३१.३.२००५ च्या शासन निर्णयानुसार नोंदणीकृत कंत्राटदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजूर सहकारी संस्था या तिन्ही संवर्गामध्ये रु.५.०० लक्ष किंमतीची कामे अनुक्रमे ३४%, ३३%, व ३३% तसेच रु.५.०० ते १५.०० लक्ष किंमतीची कामे अनुक्रमे ६६%, ३४%. सदर टक्केवारीनुसार जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील विभागामध्ये कामाचे वाटप करण्यात आले आहे का ? असेल तर संपूर्ण यादी. नसेल तर का नाही ? याचा तपशील मागविला होता. "

जन माहिती अधिका-याने अपिलकारास दि. ८.३.२००७ व दि.१७.३.२००७ च्या पत्रासोबत सविस्तर माहिती फोटो प्रतीसह उपलब्ध करुन दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे दि. ३.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकारास त्यांच्या दि.३.१.२००७ च्या अर्जानुसार जन माहिती अधिका-यांनी दि.८.३.२००७ व दि. १७.३.२००७ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती फोटो प्रतीसह पुरविलेली दिसते. तेव्हा अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी समर्पक व नियमानुसार माहिती दिली असल्याने मी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२१/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६७८/०२**

**श्री.प्रदीप शंकर चव्हाण,** **------ अपीलकर्ता**
**३३/३७, वरळी बी.डी.डी.चाळ,**
**डॉ.जी.एम.भोसले मार्ग,**
**वरळी, मुंबई- ४०० ०१८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई -४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**उत्तर मुंबई विभाग, अंधेरी, मुंबई.** **------- उत्तरवादी**

## - विवेचन -

अपिलकार श्री.प्रदीप शंकर चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उत्तर मुंबई विभाग, अंधेरी, मुंबई यांचेकडे दि.३.१.२००७ रोजी अर्ज करुन, शा.नि.क्र.सीएटी-०१/०५/प्र.क्र.२६/इमारती-२, दि.३१.३.२००५ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई यांचेकडे दि.३.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांकडून पूर्णपणे माहिती मिळाली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२१.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरता प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,

सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री.अ.ब.गायकवाड, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री.एस.एम.लोलगे, तसेच अपिलकार श्री.प्रदीप चव्हाण हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.प्रदीप चव्हीाण यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, यांचेकडे दि. ३.१.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

" दि. ३१.३.२००५ च्या शासन निर्णयानुसार नोंदणीकृत कंत्राटदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजूर सहकारी संस्था या तिन्ही संवर्गामध्ये रु.५.०० लक्ष किंमतीची कामे अनुक्रमे ३४%, ३३%, व ३३% तसेच रु.५.०० ते १५.०० लक्ष किंमतीची कामे अनुक्रमे ६६%, ३४%. सदर टक्केवारीनुसार जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील विभागामध्ये कामाचे वाटप करण्यात आले आहे का ? असेल तर संपूर्ण यादी. नसेल तर का नाही ? याचा तपशील मागविला होता. "

जन माहिती अधिका-याने अपिलकारास दि. ८.३.२००७ व दि.१७.३.२००७ च्या पत्रासोबत सविस्तर माहिती फोटो प्रतीसह उपलब्ध करुन दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे दि. ३.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकारास त्यांच्या दि.३.१.२००७ च्या अर्जानुसार जन माहिती अधिका-यांनी दि.८.३.२००७ व दि. १७.३.२००७ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती फोटो प्रतीसह पुरविलेली दिसते. तेव्हा अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी समर्पक व नियमानुसार माहिती दिली असल्याने मी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२१/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६७९/०२**

**श्री.प्रदीप शंकर चव्हाण,** **------ अपीलकर्ता**
**३३/३७, वरळी बी.डी.डी.चाळ,**
**डॉ.जी.एम.भोसले मार्ग,**
**वरळी, मुंबई- ४०० ०१८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई -४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मध्य मुंबई विभाग, वरळी, मुंबई -४०० ०१८.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री.प्रदीप शंकर चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सा.बां.वि. मध्य मुंबई, वरळी, यांचेकडे दि.८.२.२००७ रोजी अर्ज करुन शा.नि.क्र.सीएटी-०१/०५/प्र.क्र.२६/इमारती-२, मंत्रालय, मुंबई, दि.३१.३.२००५ च्या अंमजबजावणीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२९.१.२००७ च्या पत्रान्वये दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सा.बां.वि. मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई यांचेकडे दि. ३.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २१.३.२००७ रोजी सुनावणी आयोजित करुन दि.२३.३.२००७ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २१.८.२००८ रोजी

सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सा.बां.वि. श्री. अ.ब.गायकवाड, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सा.बां.वि. श्री.सी.बी.पाटील, तसेच अपिलकार श्री.प्रदीप चव्हाण हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्राची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.चव्हाण यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचेकडे दि.८.२.२००७ रोजी अर्ज करुन दि. ३१.३.२००५ च्या अंमजबजावणीबाबत पुढील मुद्दयांची माहिती मागितली होती.

मुद्दा क्र.१ :- शासन निर्णय प्रत्येक शासकीय अधिका-यांस बंधनकारक असतांना आपणास त्याच्या पालनाचे महत्व का वाटले नाही ?

मुद्दा क्र.२ :-मजूर सहकारी संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंता याना कामाची यादी कळवून करारनामा होईपर्यंत लागणारा कालावधी जाहीर निविदा घेवून लागणा-या कालावधीपेक्षा कमी आहे का ?

मुद्दा क्र.३ :- तातडीची दुरुस्तीची कामे करण्यासाठी शासन निर्णय धाब्यावर बसविण्याचा अधिकार आपल्या कार्यकक्षेत येतो का ?

मुद्दा क्र. ४ :- शासन निर्णयांचे योग्य पालन के केल्यामुळे पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटार यांच्यावर झालेल्या अन्यायाचे परिमार्जन कसे करण्यांत येईल ?:

जन माहिती अधिका-याने दि. २९.१.२००७ च्या पत्रान्वये दिलेल्या माहितीने अपिलकाराचे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता यांचेकडे दि. ३.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी आयोजित करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी पुढीलप्रमाणे आदेश पारित केले.

" माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ (९) मध्ये नमूद केल्यानुसार अपिलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे स्वरुप बघता ती विस्तृत व मोठया प्रमाणात आणि बरीच असल्याने, उत्तरवादीचे कार्यालयातील दैनंदिन काम सांभाळून त्यांना माहिती जमा करणे व संबंधितास देणे यासाठी

काही कालावधी लागणे शक्स आहे. यास्तव, उत्तरवादिने अपिलकर्त्यास दिनांक २६.३.२००७ रोजीची दुपारी ०४.०० ची वेळ इलाखा शहर विभाग व मध्य मुंबई विभाग यांनी २८.३.२००७ रोजी दुपारी ४.०० वाजताची वेळ दिली. अपिलकर्त्यास उत्तरवादिनी उपलब्ध असलेली माहिती दाखवावी व त्या माहितीमधील आवश्यक वाटणा-या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती द्याव्यात. "

वरील विवेचन लक्षात घेता अर्जावर जन माहिती अधिका-यांनी दिलेले उत्तर समर्पक असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या उत्तरामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२१/०८/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७०२/०२**

**श्री.अनिलकुमार शर्मा,** **------ अपीलकर्ता**
**९-बी, अपोलो देवी सहकारी गृहनिर्माण संस्था,**
**दिक्षित रोड, विलेपार्ले (पूर्व)**
**मुंबई- ४०० ०५७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१.** **------- उत्तरवादी**

## - विवेचन -

अपिलकार श्री. अनिल कुमार शर्मा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक सहकारी संस्था, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांचेकडे दि.६.१२.२००६ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती. (१) सिटी सर्व्हे क्र,७३ अंधेरी येथील साईस्थ सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या किती पात्र व अपात्र सभासदांना सदनिकांचे वाटप करण्याउत आले, (२) झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत इमारतीत पात्र सभासदांना गाळें वाटप करण्यात आले त्या परिशिष्ट II ची प्रत, (३) अपात्र व्यक्तिंना गाळे वाटप करण्यात आले आहेत का ? (४) साईस्थ संस्थेचे कार्यालय भाडे तत्वावर इतरांना भाडयाने दिले आहे का ?: (५) पात्र व्यक्ती यादीवर असताना अपात्र व्यक्तिंना वाटप करण्यात आलेले गाळे बाजारभावाने विक्री करण्यांत आले का ? इत्यादी माहिती मागितली होती.

मागितलेली माहिती संस्था पातळीवरील असल्याने अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिका-यांनी संस्थेस सूचना दिल्या. संस्थेने माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांचेकडे दि.९.२.२००७

रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २८.२.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. संस्थेने गाळे वाटपाची यादी दिली नाही. संस्थेकडून गाळे वाटपाची यादी जन माहिती अधिका-यांनी प्राप्त करुन घ्यावी व ती अपिलकारास द्यावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित करुन अपील निकालात काढले. प्रथम अपिलीय अधिका-याने पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने दि. २२.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २७.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिका-यांच्यावतीने सहकारी अधिकारी श्रेणी-२, श्री.भरत काकड हजर होते. सुनावणीची नोटीस यु.पी.सी.ने पाठवूनही अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी सहकारी अधिकारी श्रेणी-२ यांनी सादर केलेला लेखी अहवाल व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मागितलेली माहिती संस्था पातळीवरील असल्याचे नमूद करुन जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत संस्थेस सूचना दिल्या. प्रथम अपिलीय अधिका-यांनीही पात्र गाळेधारकांची यादी संस्थेकडून मागवून अपिलकारास उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिका-यांना सूचना दिल्या. शेवटी दि.२.१.२००८ रोजी पात्र गाळेधारकांची यादी अपिलकारास जन माहिती अधिका-याने उपलब्ध करुन दिली. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत गाळे वाटपाकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून परिशिष्ट- II मध्ये पात्र व्यक्तिंची यादी तयार करण्यात येते. अपिलकाराने परिशिष्ट ज्ञII ची यादी, किती अपात्र व्यक्तिंना गाळेवाटप करण्यात आले इ. माहिती मागितली होती. परिशिष्ट-II ची यादी जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत अपिलकारास दिली नाही हे सिध्द होते. तरी केंद्रिय माहितीचा अधिकारी अधिनियम, २००५ मधील कलम २० (१) अन्वये जन माहिती अधिका-यांना शास्ती का लावणत येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत राज्य माहिती आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून खुलासा करावा. अन्यथा पुढील उचित कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२७/०८/२००८.**

श्रीमती पूनम विजय मत्ते,
लघुलेखक निम्नश्रेणी,
राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई,
दिनांक :- १४/०८/२००८.

प्रति,

मा. उप सचिव,
राज्य माहिती आयोग,
बृहन्मुंबई.

मा. महोदय,

मला दिनांक १६ ऑगस्ट, २००८ रोजी महत्वाचे काम असल्यामुळे मी कार्यालयात उपस्थित राहू शकत नाही. तरी कृपया माझी या दिवसाची नैमित्तिक रजा मंजूर करण्यांत यावी, ही नम्र विनंती. तसदीबद्दल क्षमस्व.

आपली विश्वासू,

( पूनम वि. मत्ते )